७० वर्ष

दैनिक संध्या

नि:पक्ष समीक्षणाचे....निर्भीड दैनिक

शुक्रवार, दि. ३० जानेवारी २०२६

www.dainikesandhya.com www.youtube.com/@sandhyalivenews

संस्थापक : कै. वसंत काणे | नोंदणी क्रमांक : १६६३/१९५७ | पुणे आवृत्ती | पाने : ८ | अंक : ०३६ | Gmail : news.sandhya@gmail.com | किंमत : ७ रूपये

## तगाद्याला कंटाळून व्यावसायिकाचा आत्महत्येचा प्रयत्न

पुणे (दै. संध्या) : अवैध सावकारी, अमानुष व्याजदर, मारहाण, बंदुकीचा धाक आणि जबरदस्तीने जमीन बळकावण्याचा धक्कादायक प्रकार उरुळी कांचन परिसरात उघडकीस आला असून, या छळाला कंटाळून एका तरुण व्यावसायिकाने सोरतापवाडी (ता. हवेली) येथील कार्यालयात विष प्राशन करून आत्महत्येचा प्रयत्न केल्याची गंभीर घटना समोर आली आहे. या प्रकरणी उरुळी कांचन पोलीस ठाण्यात चार जणांविरोधात गंभीर स्वरूपाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. महादेव विठ्ठल जरांडे (वय 36,रा. स्वरगंधार सोसायटी, उरुळी कांचन) असे पीडिताचे नाव आहे. सध्या ते कोरेगाव मूळ येथील चिंतामणी हॉस्पिटलमध्ये आयसीयूमध्ये उपचार घेत असून, मृत्यूशी झुंज देत असतानाच त्यांनी पोलिसांसमोर थरकाप उडवणारा जबाब नोंदविला आहे. त्यानुसार आनंता पवार, माऊली पवार, दिपाली साळुंखे आणि विजय पांडुरंग गोते यांच्यावर उरुळी कांचन पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### ढिंग-टांग




- बारामतीतील विद्या प्रतिष्ठानच्या मैदानावर शासकीय इतमामात अंत्यसंस्कार, दोन्ही मुलांनी दिला मुखाग्नी
- अवघ्या महाराष्ट्राच्या अश्रुंचा बांध फुटला, बारामती पोरकी झाली
- राहुल नार्वेकर आणि रामदास आठवले यांनी अजितदादांना श्रद्धांजली वाहिली
- देव आपल्याला हे नुकसान सहन करण्याची शक्ती देवो : धीरज देशमुख

# अजित पवार पंचतत्वात विलीन



बारामती (दै. संध्या)

महाराष्ट्राचे माजी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यावर गुरुवारी बारामतीतील विद्या प्रतिष्ठान मैदानावर अंत्यसंस्कार करण्यात आले. पार्थ आणि जय पवार यांनी चितेला मुखाग्नी दिला. तेव्हा उपस्थित असलेल्या हजारो समर्थकांचे आणि कार्यकर्त्यांचे डोळे पाणावले होते.

पत्नी सुनेत्रा पवार यांनी पतीच्या पार्थिवावर गंगाजल अर्पण करून अंतिम निरोप दिला. यावेळी शरद पवार, सुप्रिया सुळे, गृहमंत्री अमित शहा, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह देशभरातील विविध पक्षांचे नेते उपस्थित होते.

महाराष्ट्रासह इतर राज्यांतील लोकही अजित पवारांच्या अंत्यसंस्काराला उपस्थित होते. काल रात्री उशिरा बारामतीत लोक येऊ लागले. सकाळी अनेक भागात वाहतूक कोंडी झाली. समर्थक दुचाकी, ट्रॅक्टर-ट्रॉली आणि बसेसमधून आले. अंत्ययात्रा एक ते दोन किलोमीटरपर्यंत पसरली.

महाराष्ट्र पोलिस दलातर्फे हवेत फैरी झाडून आणि बिगुल वाजवून अजित पवारांना अखेरची मानवंदना देण्यात आली.

बारामती येथे बुधवारी सकाळी 8.46 वाजता झालेल्या भीषण विमान अपघातात उपमुख्यमंत्री अजित पवार (66 वर्षे 6 महिने 6 दिवस) यांचे निधन झाले. त्यांच्यासोबत वैमानिक सुमीत कपूर, सहवैमानिक शांभवी पाठक, अंगरक्षक विदीप जाधव आणि फ्लाइट अटेंडंट पिंकी यादव होते. त्यातील एकही जण वाचू शकला नाही.

### राष्ट्रवादी काँग्रेस मुख्यमंत्र्यांना नावे देणार?

राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनानंतर त्यांच्याकडे असलेल्या खात्यांची जबाबदारी कुणाकडे दिली जाणार याचा निर्णय होण्याची शक्यता आहे. अजित पवारांकडे असलेली खाती कुणाकडे द्यावीत याबाबत राष्ट्रवादी काँग्रेसकडून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांना पत्र देण्यात येण्याची शक्यता आहे. अजित पवारांकडे अर्थ, क्रीडा आणि राज्य उत्पादन शुल्क खात्यांची जबाबदारी होती. ही तीनही खाती राष्ट्रवादीच्या वाट्याची असल्याने ती आपल्याकडेच राहावीत यासाठी राष्ट्रवादी प्रयत्नशील आहे. त्यामुळे ही खाती राष्ट्रवादीतील कोणत्या मंत्र्याकडे देण्यात यावीत यासाठी मुख्यमंत्र्यांना पत्र देण्यात येणार असल्याची माहिती विश्वसनीय सूत्रांनी दिली. अजितदादांकडे अर्थ खात्यासारखं महत्त्वाचं खातं होतं. त्यामुळे त्यांच्याकडील खाती कुणाकडे द्यावीत यासाठी राष्ट्रवादीच्या ज्येष्ठ नेत्यांमध्ये महत्वाची चर्चा सुरू असल्याची माहिती आहे.

### ब्रेकिंग न्यूज

#### अदिती तटकरे ढसा-ढसा रडल्या

पुणे (दै. संध्या) : उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अकाली निधनामुळे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षावर दुःखाचा डोंगर कोसळला असून, आपल्या या कणखर नेत्याला गमावल्याची भावना पक्षातील प्रत्येक नेत्याच्या मनात दाटून आली आहे. राज्याच्या महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे आपल्या भावना व्यक्त करताना अक्षरशः ढसा-ढसा रडल्याचे पाहायला मिळाले. एका वृत्तवाहिनीला बोलताना अदिती तटकरे भावुक झाल्याचे पाहायला मिळाल्या. त्या म्हणाल्या, आम्ही आमचा नेता गमावला. त्यांना परत बघता येणार नाही. हे कधीही न भरून निघणारे दुःख आहे. त्यांनी नेहमीच आम्हा सगळ्यांना पाठबळ दिले, आधार दिला. चांगले काम केले तर प्रशंसा करायचे. थोड्या कुठे चुका झाल्या तर हक्काने वडिलांसारखे ओरडायचे, मार्गदर्शन करायचे. एक दिवस असा गेला नाही की, दादांचे नाव तोंडातून निघाले नसेल. आम्ही यापुढे काम करत असताना प्रत्येक बाबतीत त्यांची आठवण येत राहील, असे म्हणताना तटकरेंना रडू कोसळले.

#### साहेबांना 'गिफ्ट' द्यायचे राहून गेले

पुणे (दै. संध्या) : महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांचा बुधवारी विमान अपघातात दुर्दैवी अंत झाला. त्यांच्या निधनामुळे संपूर्ण महाराष्ट्रात हळहळ व्यक्त केली जात आहे. मुंबईहून बारामतीच्या विमानतळावर लँड करत असतानाच त्यांच्या विमानाचा भीषण अपघात झाला आणि होत्याचे नव्हते झाले. आता अजित पवारांच्या अनेक आठवणी त्यांच्या जवळचे नेते व सहकारी सांगत आहेत. असाच एक किस्सा राष्ट्रवादीचे नेते अंकुश काकडे यांनी सांगितला आहे. 12 डिसेंबरला दोन राष्ट्रवादी एकत्र येण्याचे गिफ्ट शरद पवारांना देण्याचे अजित पवारांच्या मनात होते, असे काकडे यांनी सांगितले आहे. अजित पवारांची एक आठवण सांगताना अंकुश काकडे म्हणाले, राजकारणातील माझी आणि अजित दादांची सुरुवात एकाच वेळेला झाली. दोघेही जिल्हा बँकेत एकत्रित निवडून आलो. मग राजकारणात अनेक वर्ष काम केले. दादा हे आमचे नेते नेहमी राहिले, पवार साहेबांचा राजकीय वारसा घेऊन दादांनी केलेले काम महाराष्ट्र विसरू शकणार नाही.

## मोदी-फडणवीसांनी अजित पवारांवरील आरोप मागे घ्यावेत : राऊत

मुंबई (दै. संध्या)

उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या दुर्दैवी विमान अपघातातील निधनानंतर देशभरातून शोक व्यक्त केला जात असतानाच, भाजपकडून देण्यात आलेल्या पानभर श्रद्धांजली जाहिरातींवरून नवा राजकीय वाद उफाळून आला आहे. उद्धव ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी भाजपवर जोरदार टीका करत, जाहिराती देणे ही श्रद्धांजली नाही, तर अजित पवारांवर लावलेले 70 हजार कोटींचे आरोप मागे घेणे हीच खरी श्रद्धांजली ठरेल, असा थेट हल्लाबोल केला आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनाही राऊत यांनी यावेळी स्पष्ट सल्ला दिला आहे.



उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनानंतर महाराष्ट्राच्या राजकारणात शोककळा पसरली असली, तरी त्याचवेळी आरोप-प्रत्यारोपांचाही नवा अध्याय सुरू झाला आहे. भारतीय जनता पक्षाने अजित पवार यांना श्रद्धांजली अर्पण करण्यासाठी विविध वर्तमानपत्रांमध्ये पानभर जाहिराती प्रसिद्ध केल्या. या जाहिरातींमधून अजित पवार यांच्या कार्याचा गौरव करण्यात आला.

## सुनेत्रा पवारांना उपमुख्यमंत्री करा : मंत्री नरहरी झिरवाळ

मुंबई (दै. संध्या)

- NCP नेते प्रफुल्ल पटेल, छगन भुजबळांनी घेतली सुनेत्रा पवारांची भेट

अजित पवार यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार होत असतानाच राष्ट्रवादी काँग्रेसच्या राजकारणात मोठी खळबळ उडवणारे वक्तव्य समोर आले आहे. राष्ट्रवादीचे नेते नरहरी झिरवाळ यांनी थेट सुनेत्रा पवार यांना राज्याचे उपमुख्यमंत्रीपद देण्याची मागणी करत अजित पवार यांच्या पश्चात निर्माण झालेल्या नेतृत्वाच्या प्रश्नावर स्पष्ट भूमिका मांडली आहे. झिरवाळ यांच्या या विधानानंतर राज्याच्या राजकारणात आणि राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये नव्या हालचालींना वेग येण्याची चिन्हे दिसू लागली आहेत. दुसरीकडे राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते प्रफुल्ल पटेल आणि छगन भुजबळ यांनी सुनेत्रा पवार यांची भेट घेतल्याचे समोर आले आहे. मात्र, ही भेट नेमकी कशाबद्दल होती, याची माहिती अजून पुढे आली नाही.



राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या पार्थिवावर गुरुवारी बारामती येथील विद्या प्रतिष्ठानच्या मैदानात शासकीय सन्मानात अंत्यसंस्कार करण्यात आले. बुधवारी बारामतीत झालेल्या भीषण विमान अपघातात अजित पवार यांचे निधन झाले होते. त्यांच्या अंतिम दर्शनासाठी आणि अंत्यसंस्कारासाठी बारामतीत हजारोंचा जनसागर उसळला होता. सर्वसामान्य नागरिकांपासून ते राजकीय नेत्यांपर्यंत, प्रत्येकाच्या डोळ्यांत अश्रू होते. आपल्या लाडक्या 'दादा'ला अखेरचा निरोप देताना संपूर्ण बारामती भावुक झाली होती.

अजित पवार यांच्या पार्थिवाला त्यांचे पुत्र पार्थ पवार आणि जय पवार यांनी मुखाग्नी दिला. चिता पेटताना उपस्थितांची मने सुन्न झाली होती.

अंत्यसंस्काराच्या संपूर्ण विधी दरम्यान पार्थ पवार आणि जय पवार हेच प्रमुखपणे समोर उभे राहून सर्व मान्यवरांच्या भेटी घेत होते. राष्ट्रवादी काँग्रेसचे वरिष्ठ नेते आणि पवार कुटुंबातील इतर सदस्य खाली बसून होते. त्यामुळे अनेकांच्या नजरा पार्थ आणि जय पवार यांच्यावर खिळल्या होत्या. अजित पवार यांचे राजकीय वारसदार म्हणून हे दोघे पुढे येणार, असे संकेत यातून मिळाल्याची चर्चा सुरू झाली.

## दृश्यमानता कमी तर CCTV फुटेज इतके स्पष्ट कसे?

### राष्ट्रवादीतल्या नेत्यांनी मौन का बाळगले? अजितदादांच्या अपघातावरून सुषमा अंधारेंचा सवाल

पुणे (दै. संध्या)

महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे बुधवारी विमान अपघातात निधन झाले. बारामती विमानतळावर त्यांचे विमान लँड होत असतानाच भीषण अपघात झाला आणि होत्याचे नव्हते झाले. विमान लँड करत असताना दृश्यमानता कमी असल्याने अपघात झाल्याचे बोलले जात आहे. परंतु, यावरून आता शिवसेना ठाकरे गटाच्या नेत्या सुषमा अंधारे यांनी शंका उपस्थित केली आहे.

सुषमा अंधारे यांनी ट्विट करत म्हटले की, बारामती विमानतळावर कमी दृश्यमानता होती म्हणून अपघात झाला असे अनेकजण अपघाताचे कारण सांगत आहेत. पण खूप दूरच्या सीसीटीव्हीमध्ये



विमान घिरट्या घालताना स्पष्ट दिसत होते. जर तिथे धुक्याचे वातावरण असेल तर सीसीटीव्हीतील घिरट्या घालतानाचे फुटेज इतके स्पष्ट कसे? असा सवाल अंधारे यांनी उपस्थित केला आहे.

पुढे सुषमा अंधारे म्हणाल्या, काल लगेच यावर बोलणे संकेताला धरून नसले तरी तृणमूल काँग्रेसच्या अध्यक्षा श्रीमती ममता बॅनर्जी यांनी उपस्थित केलेले प्रश्न अत्यंत महत्त्वाचे आहेत. ही चौकशी झालीच पाहिजे किंवा ही चौकशी आम्ही अगदी आंतरराष्ट्रीय स्तरावर सुद्धा करू असे सत्ताधाऱ्यांमधला एकही नेता ठामपणे का बोलत नाही? अजितदादांच्या नंतर पक्षातील जेष्ठता क्रम असणारे प्रफुल्ल पटेल, हसन मुश्रीफ किंवा दिलीप वळसे पाटील यांनी मौन का बाळगले आहे? साहेबांचे राष्ट्रवादीतले ही ज्येष्ठ नेते यावर का बोलत नाहीत? असे प्रश्न सुषमा अंधारे यांनी उपस्थित केले आहेत.

दरम्यान, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केंद्राकडे पत्र पाठवून या अपघाताची चौकशी करण्याची मागणी केली होती. त्यांच्या मागणीनुसार केंद्रीय उड्डाण मंत्री किंजरापु राममोहन नायडू यांनी चौकशी होणार असल्याचे स्पष्ट केले आहे. त्यानुसार याची चौकशी एएआयबी संस्थेकडून तपास सुरू करण्यात आल्याची माहिती समोर आली आहे.

महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांचा बुधवारी विमान अपघातात दुर्दैवी अंत झाला. त्यांच्या निधनामुळे संपूर्ण महाराष्ट्रात हळहळ व्यक्त केली जात आहे. मुंबईहून बारामतीच्या विमानतळावर लँड करत असतानाच त्यांच्या विमानाचा भीषण अपघात झाला. या अपघातात अजित पवारांसह विमानातील सर्वांचाच मृत्यू झाला आहे. आता हा अपघात नेमका कशामुळे झाला, याची चौकशी करण्याची मागणी करण्यात आली होती. त्यानुसार आता याची चौकशी एएआयबी या संस्थेने सुरू केली असल्याची माहिती समोर आली आहे.

## अजित पवारांच्या विमान अपघाताची चौकशी सुरू; केंद्राकडून दखल

मुंबई (दै. संध्या)

महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांचा बुधवारी विमान अपघातात दुर्दैवी अंत झाला. त्यांच्या निधनामुळे संपूर्ण महाराष्ट्रात हळहळ व्यक्त केली जात आहे. मुंबईहून बारामतीच्या विमानतळावर लँड करत असतानाच त्यांच्या विमानाचा भीषण अपघात झाला. या अपघातात अजित पवारांसह विमानातील सर्वांचाच मृत्यू झाला आहे. आता हा अपघात नेमका कशामुळे झाला, याची चौकशी करण्याची मागणी करण्यात आली होती. त्यानुसार आता याची चौकशी एएआयबी या संस्थेने सुरू केली असल्याची माहिती समोर आली आहे. विमान अपघात तपास ब्यूरो (AAIB) या संस्थेने अपघाताची चौकशी सुरू केली असून त्याचा अहवाल



आल्यानंतर तो राज्य सरकारलाही पाठवण्यात येणार आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या अपघाताची चौकशी करावी असे पत्र केंद्रीय उड्डाण मंत्री किंजरापु राममोहन नायडू यांना लिहिले होते. त्या पार्श्वभूमीवर या अपघाताची चौकशी सुरू करण्यात आली आहे.

# जिल्हा परिषद–पंचायत समिती निवडणुकांचे मतदान व निकाल पुढे ढकलले

मुंबई (दै. संध्या)

राज्यातील 12 जिल्हा परिषदा आणि त्याअंतर्गत 125 पंचायत समित्यांच्या सार्वत्रिक निवडणुकांच्या वेळापत्रकात Maharashtra State Election Commission यांनी बदल जाहीर केला आहे. राज्यात जाहीर करण्यात आलेल्या तीन दिवसांच्या दुखवट्याच्या पार्श्वभूमीवर हा निर्णय घेण्यात आला असून, त्यानुसार 5 फेब्रुवारीला होणारे मतदान आता 7 फेब्रुवारी 2026 रोजी होणार आहे. तसेच मतमोजणीची तारीख 9 फेब्रुवारी 2026 अशी निश्चित करण्यात आली आहे.

राज्य निवडणूक आयोगाने



या निवडणुकांसाठी 13 जानेवारी 2026 रोजी सविस्तर निवडणूक कार्यक्रम जाहीर केला होता. त्यानुसार नामनिर्देशनपत्रे दाखल करणे, माघारी, निवडणूक चिन्ह वाटप आणि अंतिम उमेदवारांची यादी प्रसिद्ध करण्याची प्रक्रिया पूर्ण झाली आहे. मात्र मतदान, मतमोजणी आणि निवडून आलेल्या सदस्यांची नावे राजपत्रात प्रसिद्ध करणे हे टप्पे अद्याप शिल्लक होते.

उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनानंतर राज्य शासनाने 28 ते 30 जानेवारी 2026 या कालावधीत तीन दिवसांचा दुखवटा जाहीर केला. या कालावधीत सार्वजनिक कार्यक्रम टाळण्याचे निर्देश असल्याने निवडणूक प्रक्रियेतील उर्वरित टप्प्यांच्या तारखांमध्ये बदल करणे आवश्यक ठरले.

जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकांबाबत माननीय सर्वोच्च न्यायालयाने 31 जानेवारी 2026 नंतर केवळ दोन आठवड्यांची मुदतवाढ दिल्याने, निवडणूक प्रक्रिया ठरलेल्या कालमर्यादेत पूर्ण करणे बंधनकारक होते. या सर्व बाबींचा विचार करून राज्य निवडणूक आयोगाने मतदान व मतमोजणी पुढे ढकलण्याचा निर्णय घेतला.

आयोगाच्या निर्देशानुसार संबंधित जिल्हाधिकारी 31 जानेवारी 2026 रोजी सुधारित निवडणूक कार्यक्रमाची अधिकृत अधिसूचना प्रसिद्ध करतील. त्यानुसार 7 फेब्रुवारी 2026 रोजी सकाळी 7.30 ते सायंकाळी 5.30 या वेळेत मतदान होईल.

नव्या कार्यक्रमानुसार जाहीर प्रचाराची समाप्ती 5 फेब्रुवारी रोजी रात्री 10 वाजता होईल. 9 फेब्रुवारी 2026 रोजी सकाळी 10 वाजता मतमोजणी सुरू होणार असून, निकाल जाहीर झाल्यानंतर संबंधित ठिकाणची आचारसंहिता तात्काळ संपुष्टात येईल.

मतमोजणी पूर्ण झाल्यानंतर निवडून आलेल्या जिल्हा परिषद व पंचायत समिती सदस्यांची नावे 11 फेब्रुवारी 2026 पर्यंत शासन राजपत्रात प्रसिद्ध केली जाणार आहेत. यामुळे या निवडणुकांची संपूर्ण प्रक्रिया फेब्रुवारीच्या दुसऱ्या आठवड्यात पूर्ण होणार आहे.

### वाद्य, फटाके नको, घरोघरी जाऊन हात जोडा

दोन शिवसेना आणि दोन राष्ट्रवादी एकत्र येऊन महाआघाडीचा नवा प्रयोग झालेल्या बार्शी तालुक्यात अजित पवारांच्या निधनानंतर राजकीय वातावरण भावुक झालं आहे. बार्शीचे आमदार दिलीप सोपल आणि भाजप नेते राजेंद्र राऊत यांनी प्रतिक्रिया देत अजित दादांच्या आठवणी, बार्शीबद्दलचे स्नेहबंध सांगितले. तर, निवडणूक प्रचाराचा धुरळा उडला असतानाच अशी दुर्घटना घडल्याने निवडणूक प्रचारातही दोन्ही नेत्यांनी आदर्शवत बदल केला आहे. दोन्ही नेत्यांनी कार्यकर्त्यांना आवाहन करत, साध्या पद्धतीने प्रचार करावा, कुठेही वाद्य किंवा फटाकेबाजी करू नये, केवळ लोकांच्या गाठीभेटी घेऊन प्रचार करावा अशी विनंती करण्यात आली आहे. त्यामुळे, अजित पवारांच्या निधनाने सध्याच्या निवडणुकीचा पॅटर्नही बदलल्याचं दिसून येत आहे. विशेष म्हणजे, निवडणूक प्रचारासाठी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि दोन्ही उपमुख्यमंत्री बार्शीत येणार होते. मात्र, आता या तीन नेत्यांपैकी कुणीही बार्शीत प्रचाराला येणार नसल्याचे समजते.

# संपादकीय

## शब्दाला जागणारा नेता

महाराष्ट्राच्या राजकारणात अजित पवार हे नाव साडेतीन दशके सातत्याने चर्चेत राहिले. लोकसभेची अल्पकालीन कारकीर्द वगळता ते सातत्याने बारामती मतदारसंघातून निवडून आले. विकासाची दूरदृष्टी, परखड, स्पष्टवक्ता, प्रशासनावर पकड आणि राज्याच्या प्रश्नांची जाण असलेल्या अजितदादांचे विमान अपघातात निधन झाले. बारामतीचा विकास पाहता आमदार कसा असावा, याचे ते ज्वलंत उदाहरण होते. शरद पवार यांचे पुतणे म्हणून राजकारणात प्रवेश करणारे अजित पवार केवळ त्यांच्या वारशावर उभे राहिले नाहीत, तर स्वतःची वेगळी ओळख, शैली आणि ताकद निर्माण करून गेले. स्पष्टवक्तेपणा, आक्रमक निर्णयक्षमता आणि प्रशासकीय अनुभव यामुळे ते समर्थकांसाठी ‘कामाचा नेता’ होते. अजित पवार म्हणजे एक कडक प्रशासक, वित्तीय शिस्तीचा आग्रह धरणारा आणि निर्णय घेताना फारसा भावनिक न होणारा नेता अशी त्यांची ओळख. उपमुख्यमंत्री आणि अर्थमंत्री म्हणून त्यांनी अनेक वेळा राज्याचा अर्थसंकल्प हाताळला. सिंचन, पाणीवाटप, कृषी अर्थकारण आणि पायाभूत सुविधा हे त्यांचे मुख्य कार्यक्षेत्र राहिले. ग्रामीण महाराष्ट्रात, विशेषतः पश्चिम महाराष्ट्रात त्यांचा मोठा प्रभाव राहिला. २०१९ मधील पहाटेच्या शपथविधीपासून नंतरच्या राजकीय घडामोडींपर्यंत त्यांनी संपूर्ण महाराष्ट्राचे लक्ष वेधून घेतले. त्यानंतर पुन्हा राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये परतणे आणि नंतर पक्षातच फूट पाडत वेगळ्या गटासह सत्तेत सहभागी होणे, या घटनांनी त्यांच्या राजकारणातील व्यवहार्य आणि सत्ताकेंद्रित दृष्टिकोन अधोरेखित केला. समर्थकांच्या मते अजित पवार हे वास्तववादी राजकारणी होते. ‘सत्तेत राहिल्याशिवाय काम करता येत नाही’ हा त्यांचा अप्रत्यक्ष संदेश अनेकांना व्यवहार्य वाटल्यामुळेच अनेक आमदार, नेते आणि कार्यकर्ते त्यांच्या मागे ठामपणे उभे राहिले. अजित पवार यांचे नेतृत्व हे करिष्म्यापेक्षा नियंत्रणावर आधारित होते. ते भावनिक भाषणांपेक्षा आकडेवारी, योजना आणि निधी यांवर अधिक भर देत. अधिकारी वर्गावर पकड ठेवणे, निर्णयांची अंमलबजावणी करून घेणे आणि विरोधाला थेट सामोरे जाणे ही त्यांची शैली होती. अजित दादा हे महाराष्ट्राच्या राजकारणातील दुर्लक्ष करता न येणारे व्यक्तिमत्त्व. घेतलेले निर्णय, उचललेली पावले आणि निर्माण केलेले वाद यामुळे ते नेहमीच चर्चेच्या केंद्रस्थानी राहिले. स्पष्टवक्तेपणा, कठोर प्रशासकीय भूमिका आणि आक्रमक राजकारण यासाठी ओळखले जाणारे अजित पवार हे महाराष्ट्राच्या राजकीय जीवनातील अत्यंत महत्त्वाचे व्यक्तिमत्त्व होते. त्यांनी महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री म्हणून अनेक वेळा जबाबदारी सांभाळली. वित्त खाते, नियोजन विभाग यांसारखी महत्त्वाची खाती त्यांनी हाताळली. अर्थसंकल्पीय बाबींवरील प्रभुत्व आणि आकडेवारीवरील पकड यामुळे ते एक कुशल प्रशासक म्हणून ओळखले जात. त्यांची कार्यशैली अत्यंत शिस्तप्रिय आणि कधी कधी कठोर मानली जाते. कामात दिरंगाई किंवा हलगर्जीपणा त्यांना सहन व्हायचा नाही. अधिकाऱ्यांना थेट सूचना देणे, वेळेवर निर्णय घेणे आणि कामाचा पाठपुरावा करणे हे त्यांच्या नेतृत्वाचे वैशिष्ट्य. पाणी व्यवस्थापन आणि सिंचन क्षेत्र हे अजित पवार यांच्या राजकारणातील महत्त्वाचे विषय राहिले. दुष्काळी भागासाठी पाणी उपलब्ध करून देणे, कालवे, धरणे आणि सिंचन प्रकल्प राबवणे यावर त्यांनी विशेष भर दिला. काही प्रकल्पांवरून त्यांच्यावर टीकाही झाली, चौकशी झाली; मात्र त्यांनी नेहमीच आपण घेतलेले निर्णय विकासासाठीच होते, अशी भूमिका मांडली. अजित पवार यांच्या वाट्याला राजकारणातील चढउतार आले. पक्षांतर्गत मतभेद, सत्तास्थापनेदरम्यान घेतलेले धक्कादायक निर्णय तसेच राजकीय भूमिका बदल यामुळे ते कायम चर्चेत राहिले. लोकसभा, विधानसभेत किंवा सार्वजनिक सभांमध्ये मुद्देसूद आणि थेट भाषेत बोलत. अलंकारिक भाषेपेक्षा वास्तववादी आणि कधीकधी बोचऱ्या शब्दांचा वापर ही त्यांची खरी ओळख. ग्रामीण भागातील जनतेला ही शैली आपलीशी वाटते. सामाजिक आणि आर्थिक विकासाच्या बाबतीत अजित पवार यांचा दृष्टिकोन प्रामुख्याने व्यवहार्य राहिला. त्यांच्या व्यक्तिमत्त्वावर शरद पवार यांच्या राजकीय शिस्तीचा आणि दूरदृष्टीचा प्रभाव होता; मात्र अजित पवार यांनी स्वतःची स्वतंत्र, आक्रमक आणि कधी कधी बंडखोर अशी प्रतिमा निर्माण केली.

## संस्कृत सुभाषित

अप्युन्मत्तात्प्रलपतो बालाच्च परिजल्पत: सर्वत:
सारमादद्यादश्मभ्य इव कांचनम ॥
(उद्योगपर्व, अध्याय ३४, ३२, महाभारत)

अर्थ : वेडाच्या लहरीत बरळणाऱ्या वेड्यापासून, बोबडे बोल बोलणाऱ्या बालकापासून, सर्वापासून, दगडांतून सोने निवडावे त्याप्रमाणे चांगले तेवढे ग्रहण करावे.

## गुरु वचन

### कर्मयोगासाठी कौशल्य असणे आवश्यक

माणसाला त्याने केलेल्या कर्मानुसार फळ मिळत असते. परंतु बऱ्याजणांची तक्रार असते की, आपण दिवसभर राबूनही कसेबसे पोटापुरते मिळते, तर तेच काम करणारा आपला शेजारी मात्र सुखात असतो. तसेच तो काम केल्यानंतर समाधानीही दिसतो. गीतेत भगवंतानेही म्हटले आहे की कर्मयोग याचा अर्थ कौशल्याने वा शास्त्रीय पध्दतीने काम करणे. कर्मानुष्ठानाचा विधी व्यवस्थित समजून घेतल्यासच माणसाला उत्तम फळ मिळू शकते. सर्व कर्मांचा उद्देश मनामध्ये पूर्वीपासून असलेली शक्ती प्रकट करणे व आत्मा जागृती करणे, प्रत्येक माणसामध्ये पूर्ण ज्ञान व पूर्ण शक्ती असते. निरनिराळी कर्मे या महान शक्ती जागृत करण्याचे व प्रकट करण्याचे फक्त साधन आहे. या साधनाचा आपण किती कौशल्याने वापर करतो यावर त्याचे फळ अवलंबून असते.

## उपदेशकथा



### चंद्राचे सौंदर्य

एका माणसाला चंद्राचे सौंदर्य आणि चंद्रकिरणांचा नाजुकपणा समजावा अशी इच्छा झाली म्हणून तो एका शेतामध्ये गेला. रात्रीची वेळ संथपणे वारे वहात होते. आजूबाजूला कोणी नव्हते. शांत वातावरण आजूबाजूला पसरले होते. अशावेळी तो माणूस आकाशातील चंद्राकडे पाहू लागला पण आकाशातील चंद्र आणि जमिनीवरील तो माणूस यांच्यामध्ये एक सुंदर झाड येत होते. चंद्र पाहण्याचे विसरून जाऊन तो माणूस ते झाड पाहण्यात रमून गेला. काही वेळाने चंद्राची आठवण होऊन तो आकाशात पाहू लागला पण तोपर्यंत चंद्र मावळला होता. चिन्मय जाणिवेचे ज्ञान होणे अतिशय महत्त्वाचे आहे.

कथा उपदेश : माणूस दृश्य वस्तूंचे ज्ञान करून घेण्यात आयुष्य घालवतो. शेवटी खरे ज्ञान मिळविण्याचे राहून जाते.

## पंचांग

| | |
|---|---|
| पंचांग | योग:वैधृति १६:५८:०१ |
| ३० जानेवारी २०२५ | करण:बालव ११:०९:२३ |
| शुक्रवार | करण:कौलव २१:४६:४७ |
| विक्रम संवत्– २०८२ | सूर्य:मकर |
| माघ शके संवत्– १९४७ | चन्द्र:मिथुन |
| संवत्सर – विश्वावसूनाम | हिजरी सन् – १४४६ |
| अयन– उत्तरायणारंभ | मुस्लिम मास – शाबान |
| मास– माघ | तारीख – १० |
| ऋतु– सौर शिशिर | विशेष |
| शुक्ल पक्ष | प्रदोष |
| तिथि:द्वादशी ११:०९:२३ | महात्म गांधी पुण्यतिथी |
| नक्षत्र:आर्द्रा २७:२७:०७+ | हुतात्मा दिन |

## दै. ‘संध्या’ धमाल सूडोकु क्र. ८४५

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | 5 | | | 1 | | 2 | | |
| 6 | | | | | | | | 5 |
| 9 | | 2 | | | | | | 1 |
| 3 | 2 | | 4 | | 1 | 7 | 5 | |
| 1 | | | 3 | | 2 | | | 9 |
| | 6 | 9 | 7 | | 8 | | 3 | 2 |
| 2 | | | | | | 4 | | 3 |
| 5 | | | | | | | | 7 |
| | | 4 | | 3 | | | 9 | |

### : सूडोकु :

खेळाचे नियम : प्रत्येक उभी लाइन, आडवी लाइन आणि ३–३ च्या वर्गात १ ते ९ पर्यंतची संख्या भरा. परंतु ही अट आहे की, नंबरची पुनरावृत्ति कोणत्याही उभ्या किंवा आडव्या लाइन आणि चौकानात आली नाही पाहिजे. प्रत्येक कोडयाचे केवळ एकच उत्तर आहे.या कोडयाला भरण्यासाठी आपण पेन्सिलचा आणि खोड रबराचा उपयोग केला तर ते आपल्यासाठी अधिक सुविधा जनक होईल.

– उत्तर उद्याच्या अंकात

### सूडोकु क्र. ८४४ चे उत्तर

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 2 | 8 | 5 | 9 | 3 | 7 | 4 | 6 | 1 |
| 9 | 4 | 6 | 2 | 5 | 1 | 3 | 7 | 8 |
| 7 | 1 | 3 | 4 | 8 | 6 | 2 | 5 | 9 |
| 5 | 9 | 4 | 8 | 1 | 2 | 7 | 3 | 6 |
| 6 | 7 | 2 | 5 | 9 | 3 | 8 | 1 | 4 |
| 1 | 3 | 8 | 6 | 7 | 4 | 5 | 9 | 2 |
| 3 | 2 | 7 | 1 | 6 | 8 | 9 | 4 | 5 |
| 4 | 5 | 1 | 3 | 2 | 9 | 6 | 8 | 7 |
| 8 | 6 | 9 | 7 | 4 | 5 | 1 | 2 | 3 |

## इतिहासात आजचा दिवस

### आंतरराष्ट्रीय

- १६४९ – इंग्लंडचा राजा चार्ल्स पहिल्याचा शिरच्छेद.
- १८३५ – रिचर्ड लॉरेन्स नावाच्या माथेफिरू माणसाने अमेरिकेचा अध्यक्ष अँड्रु जॅक्सनचा खून करण्याचा प्रयत्न केला. लॉरेन्सची दोन्ही पिस्तुले ऐनवेळी बिघडली. चिडलेल्या जॅक्सनने लॉरेन्सला काठीने मारून पळवून लावले.
- २००७ – बांगलादेशाच्या ४७ संशयित मच्छिमारांना ओरिसा तटाला लागुन असलेल्या सागरी संरक्षण हद्दीत अटक.
- २००७ – भारताच्या वायूदल प्रमुखपदी फली होमी मेजर यांची नियुक्ती.

### राष्ट्रीय

- १९४८ – नथुराम गोडसेने महात्मा गांधींचा पिस्तुलाने खून केला.

### जन्म

- १३३ – मार्कस सेव्हेरस डिडियस ज्युलियानस, रोमन सम्राट यांचा जन्म.
- १८८२ – फ्रँकलिन डिलानो रूझवेल्ट, अमेरिकन अध्यक्ष यांचा जन्म.
- १८९४ – बोरिस तिसरा, बल्गेरियाचा राजा यांचा जन्म.
- १९१० – चिदंबरम् सुब्रमण्यम्, भारतीय राजकारणी यांचा जन्म.
- १९२७ – ओलोफ पाल्मे, स्वीडनचा पंतप्रधान यांचा जन्म.
- १९३७ – बोरिस स्पास्की, रशियन बुद्धिबळपटू यांचा जन्म.

### निधन

- ११८१ – टाकाकुरा, जपानी सम्राट यांचे निधन.
- १६४९ – चार्ल्स पहिला, इंग्लंडचा राजा यांचे निधन.
- १८६७ – कोमेइ, जपानी सम्राट यांचे निधन.
- १९४८ – महात्मा गांधी यांचे निधन.

## : SMS :

A baby is born
in Africa,
What will be the
color of its teeth?
Think?
?
Babies are born
without TEETH,
Dont think like
a GENIUS.

## हवामानाचा अंदाज

| | | |
|---|---|---|
| औरंगाबाद | २७.९ | १८ |
| अहमदनगर | २७.५ | १८ |
| अकोला | ३०.६ | १९.१ |
| अमरावती | २९.३ | १७.७ |
| बीड | ३१.१ | १९.१ |
| भंडारा | २९.२ | १३.९ |
| बुलढाणा | १८.२ | ९.५ |
| चंद्रपूर | ३०.३ | १८.२ |
| चेन्नई | ३०.५ | २४.१ |
| नवी दिल्ली | १८.५ | ११ |
| धुळे | ३०.२ | २०.३ |
| गोंदिया | २९ | १६.२ |
| जळगाव | ३०.६ | १८.४ |
| कोल्हापूर | २९.२ | १९.१ |
| लातूर | २८.६ | १९.४ |
| मुंबई | २६.५ | २२.६ |
| नागपूर | २८.९ | १६.३ |
| नांदेड | ३० | २०.४ |
| नंदूरबार | २६.५ | १९.६ |
| नाशिक | २८ | १६.८ |
| पुणे | २७.२ | १६.७ |
| पंढरपूर | २९.९ | १९.९ |
| सातारा | २८.८ | १५ |
| सांगली | २९.७ | १९.७ |
| सोलापूर | २९.८ | १९.८ |
| वर्धा | ३०.३ | १६.३ |

## आजचे राशिभविष्य

**मेष :** शुभ रंग:लाल, शुभ दिशा:उत्तर लोकांशी संपर्क वाढवून आपण आपल्या योजना पूर्णत्वास न्याल.

**तुळ :** तुळ : शुभ रंग:केसरी, शुभ दिशा : उत्तर विश्वासदर्शक वातावरण राहील. स्वत:च्या प्रयत्नाने समाजात मान मिळेल.

**वृषभ :** शुभ रंग : पिवळा, शुभ दिशा : दक्षिण व्यापार चांगला चालेल. कार्यक्षेत्रात नवीन कामाच्या योजनेमुळे फायदा होईल.

**वृश्चिक :** शुभ रंग: हिरवा, शुभ दिशा:उत्तर नवीन कामाची आखणी कराल. फायदेशीर बातम्या ऐकण्यास मिळतील.

**मिथुन :** शुभ रंग:निळा, शुभ दिशा:दक्षिण जीवनसाथीच्या सहकार्याने कौटुंबिक समस्या दूर होतील. फायदेशीर चर्चा घडून येईल.

**धनु :** शुभ रंग: निळा, शुभ दिशा: उत्तर प्रतिष्ठित व्यक्तींच्या उदारपणामुळे आपली कार्यक्षमता वाढणार आहे. कामकाजात सुधारणा होईल.

**कर्क :** शुभ रंग:जांभळा, शुभ दिशा: पश्चिम नातेवाईकांशी असलेले संबंध मर्यादित ठेवा. मुलांच्या प्रकृतीत सुधारणा होईल.

**मकर :** शुभ रंग: गुलाबी, शुभ दिशा: पूर्व आपली कार्यकुशलता व इतरांच्या सहयोगाने कामात यश मिळेल. आपले विचार योग्य असतील. कर्मचाऱ्यांवर लक्ष ठेवा.


**सिंह :** शुभ रंग:गुलाबी शुभ दिशा:पश्चिम साहित्य वाचनाची गोडी वाढणार आहे.आधिकारी लोकांशी नवीन संबंध जुळतील.

**कुंभ :** शुभ रंग: पिवळा, शुभ दिशा: पूर्व सहनशिलता कमी होऊ देऊ नका. आर्थिक अडचणी येऊ शकतील. व्यापार, नौकरीमधील स्थिती मध्यम राहील.

**कन्या :** शुभ रंग:पांढरा, शुभ दिशा: पश्चिम अविवाहितांना लग्नाचे प्रस्ताव येतील. कामकाजाचे क्षेत्र विस्तारीत होईल.

**मीन :** शुभ रंग: पांढरा, शुभ दिशा: पूर्व रचनात्मक कार्यात प्रगती होईल. मुलांच्या इच्छा पूर्ण होतील. फायद्याच्या संधी मिळतील. मित्रांची मदत मिळेल.

## ‘दै. संध्या’ जम्बो शब्दकोडे क्र. ८४५



### आडवे शब्द

१. सज्जनांच्या नेहमीच विरूद्ध
४. चाणक्यनीती
१०. लगत, शेजारी–शेजारी
११. समूह, संच
१२. शेतावरील कर
१३. इमारतीच्या पायात भरण्याचा राडारोडा
१५. चुलता
१६. घोड्याला आवर घालणारी वादी
१७. उष्ण, कढत
१९. नेमाने वारी करणारा
२०. धनुष्य, नावाडी
२१. साहित्यातील नऊ भावना
२४. सरळ लांब वासा
२५. यज्ञ
२६. फार उष्ण व थंड नसलेले
२८. अनाथांना आश्रय देणारी संस्था
२९. निरर्थक बडबड
३१. छंद, आवाज
३२. ’अपना हाथ ----!’
३३. सध्याचे युग
३४. मोठी बहीण
३५. वर्ष, सन
३६. उजाड
३८. कान व डोळे यामधील भाग
४०. नुकतेच निधन झालेले प्रसिद्ध नाटककार– --- सरकार
४२. कौसल्यापुत्र
४३. जनावरांचा समूह
४४. हिंमत, धैर्य
४६. एक उबदार व सन्मानाचे वस्त्र
४७. दुप्पट (इंग्रजी)
४९. मध्यस्थ
५१. हिंदीत कीव, करूणा
५३. शर्विलक
५४. नोकर
५६. परग्रहावर जाणारे वाहन
५९. मेहरबानी
६०. बरोबर आलेली मंडळी
६३. जमीनजुमला
६६. श्रीमंत
६७. फोडामधील द्रव
६९. अवाढव्य, प्रचंड
७१. धैर्य
७२. मोठा समुद्र
७३. सूत काढण्याचे साधन
७४. वरपांगी, दिखाऊ

### उभे शब्द

१. केशरचनेचा एक प्रकार, दुहेरी विण
२. टक, दृष्टी
३. सनसनाटी
४. दुसऱ्याला कर्जबाजारी करणारा धंदा
५. मळलेला
६. टप्प्याटप्प्याने केलेला प्रवास
७. अस्थिर, डळमळीत
८. अर्पिलेली वस्तू
९. आळशांनी लक्षात घ्यायचा पंडित नेहरूंचा संदेश
१२. क्षुधावर्धक गरम पेय
१४. विटीदांडूच्या खेळातील खड्डा
२०. हिंदीत सावली
२१. रोख
२२. नवरदेव
२३. पोरका
२४. सक्तमजुरीची शिक्षा
२७. बंदी
२८. उपासमारीची स्थिती
३०. जम
३३. चिवचिवाट
३४. संगीतातील ठेका
३५. वर्षानुवर्षे
३७. सारखा
३८. कपडालत्ता
३९. गार, थंड
४१. संगीतातील एक राग
४४. अगम्य
४५. नूतन
४८. फणसाचा एक प्रकार
५०. कीव, करूणा
५२. रत्न
५५. गव्हाचे जाडसर पीठ
५७. लग्नातील नवरा मुलगा
५८. देशी दारू
६१. सैन्यातील एक हुद्दा
६२. सामान
६४. बातमीदार
६५. मुलायम
६८. षट, पाचनंतरचा आकडा
६९. नंतर
७०. पराभव, माळ
७१. प्रामाणिक

उत्तर उद्याच्या अंकात

### जम्बो शब्दकोडे क्र. ८४४ चे उत्तर

आडवे उत्तर : १.हनुमान ५.लाकडी ८.संताप ११.कमालकिमान १३.समरांगण १५.वासा १६.वार्ताहर १७.परत १८.तानसेन २१.वाळू २३.माला २४.नामवंत २६.हरिभक्तपरायण २८.रचना २९.राणी ३०.पाट ३२.नशा ३३.कात ३५.पाक ३६.पंकज ३७.खोपट ३८.अंतरपाट ३९.परकर ४१.संप्रदाय ४२.आसमान ४४.जनक ४५.सरबत ४६.रहित ४७.जननमरण ५०.मादक ५२.खार ५४.गाढव ५५.थापी ५६.गजरा ५७.शेरास सवाशेर ५९.सणक ६०.पाव ६१.दावा ६२.थर ६४.नाखवा ६५.रनवे ६६.जळाऊ ६७.नस

उभे उत्तर : १.नुकसान ३.मामा ४.नल ५.लामा ६.कनवाळू ७.समर ८.संगत ९.ताण १०.खडतर १२.किल्ली १३.सहचारिणी १४.घर १५.वातावरण १७.पलायन १९.सेनानायक २०.नम २१.वात २२.रक्तपात २३.मारा २५.वंदन २६.हरमाखोर २७.पट ३१.सकटनिकट ३३.काटकसर ३४.बातमी ३५.पापा ३६.पंतप्रधान ४०.रणरण ४३.माहितगार ४३अ.नत ४४.जलद ४५.सरतेशेवटी ४७.जनगणना ४८.नवरा ५०.मावसभाऊ ५१.कथाकथन ५२.खासदार ५३.रसवान ५८.शेपू ६३.रस

RNI No. 1663/1957 (DAILY SANDHYA) |
दैनिक संध्या पब्लिकेशन्स प्रा. लि. यांच्या मालकीचे हे दैनिक मुद्रक व प्रकाशक ज्योती नाळे यांनी सामना प्रेस (प्रबोधन प्रकाशन) सिंहगड रोड, वडगांव खुर्द पुणे–४११०४१ येथे छापून, १०३८ आकार भवन, दुसरा मजला, टिळक रोड, पुणे – ४११००२ येथे प्रसिद्ध केले.
संपादिका : ज्योती नाळे (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) (फोन : ०२०–२४४७९२९२)
Daily “Sandhya” News paper is owned by Dainik Sandhya Publications Pvt. Ltd. Printed & Published by Jyoti Nale, Printed at Saamana Press (Prabodhan Prakashan) Pvt. Ltd. Sihagad Road, Vadgaon Khurd, Pune 411 041, published at 1038, Aakar Bhavan, Tilak Road, Pune 411002. Editor - Jyoti Nale.

## थोडक्यात पण महत्वाचे...



### अजित पवार–सुनेत्रा पवार : राजकारणाच्या पलीकडचा 37 वर्षांचा विश्वासाचा संसार

पुणे (दैनिक संध्या) : महाराष्ट्राच्या राजकारणात चर्चेत असलेले उपमुख्यमंत्री अजितदादा पवार हे जसे कठोर निर्णयांसाठी ओळखले जायचे, तसेच त्यांच्या वैयक्तिक आयुष्यात मात्र ते तितकेच कौटुंबिक, संवेदनशील आणि प्रेमळ पती असल्याचे बारामतीकरांनी नेहमीच अनुभवले. त्यांच्या राजकीय जीवनातील अनेक कठीण प्रसंगांत पत्नी सुनेत्रा यांनी त्यांना खंबीर साथ दिली. या दोघांचा तब्बल 37 वर्षांचा संसार आजच्या पिढीसाठी नात्यांचे मोल शिकवणारा ठरला. सुखी संसारातील एकाची साथ मात्र अखेर बुधवारी (दि. 28) सुटली. ज्येष्ठ नेते शरद पवार, तत्कालीन मंत्री पद्मसिंह पाटील या दोघांच्या मैत्रीतून अजित पवार व सुनेत्रा यांचा विवाह ठरला. खरे तर हे अरेंज मॅरेज. प्रेमाचा गोड प्रवास असा संसार दोघांनी केला; मात्र विमान अपघात झाल्याने अजित पवार यांचे निधन झाले आणि या सुखी संसाराला दृष्ट लागली. अजित पवार आणि सुनेत्रा पवार यांचा विवाह 1985 मध्ये अरेंज मॅरेज पद्धतीने झाला. लग्नानंतर हळूहळू वाढत गेलेले प्रेम, समजूतदारपणा आणि परस्पर आदर, यामुळे हे नाते आजही भक्कमपणे उभे राहिले होते. राजकारणातील व्यस्तता, संघर्ष, टीका-आक्षेप यांचा कधीही संसारावर परिणाम होऊ दिला नसल्याने हेच त्यांच्या नात्याचे मोठे वैशिष्ट्य ठरले. राजकीय चढ-उतार असोत किंवा वैयक्तिक जबाबदाऱ्या, सुनेत्रा पवार यांनी कायम अजितदादांच्या पाठीशी उभे राहणे पसंत केले. नुकत्याच एका कार्यक्रमात विचारलेल्या “अजितदादा तुमच्यासाठी कधी ‘नॉटरिचेबल’ असतात का?” या प्रश्नावर त्यांनी दिलेले उत्तर लक्षवेधी ठरले, “ते कितीही कामात असले तरी माझ्यासाठी आणि कुटुंबासाठी कधीच नॉटरिचेबल नसतात.” यातून त्यांच्या नात्यातील विश्वास आणि जिव्हाळा स्पष्टपणे दिसून येतो. राज्याच्या राजकारणात मध्यवर्ती भूमिका बजावत असतानाही कुटुंबासाठी वेळ काढणे, ही अजित पवार यांची खासियत असल्याचे सुनेत्रा पवार आवर्जून सांगत असायच्या. हे दोघे जाहीर कार्यक्रमानिमित्त एकत्र आल्यानंतर अजित पवार हे नेहमीच भाषणात विनोद करायचे. खा. सुनेत्रा यांना खासदार केल्यानंतर पवार कुटुंबात दोन खासदार झाल्याचेही अजित पवार म्हणाले होते. कामाच्या व्यापात देखील घरातील जबाबदाऱ्यांकडे दुर्लक्ष न करता कुटुंबासोबत वेळ घालवणे त्यांना महत्त्वाचे वाटते, हीच बाब त्यांच्या संसाराला बळ देणारी ठरली. संसार म्हटले की प्रेमाबरोबर थोडीशी नाराजीही असतेच. अजितदादा वेळेवर जेवत नाहीत, कामात स्वतःच्या आरोग्याकडे दुर्लक्ष करतात, ही सुनेत्रा पवार यांची एकमेव प्रेमळ तक्रार होती. राजकारणामुळे वेळ कमी मिळत असला तरी, जेव्हा जेव्हा संधी मिळते तेव्हा कुटुंबासोबत फिरणे, निसर्गाच्या सान्निध्यात वेळ घालवणे अजितदादांना आवडत असायचे. पण, या दोघांच्या संसाराला बुधवारी दृष्ट लागली. एक चाक निखळले गेले.

### ‘मनगटात ताकद आहे’: पुण्यातील अजित पवारांची शेवटची पत्रकार परिषद



पुणे (दैनिक संध्या) : महापालिका निवडणुकीची घोषणा झाल्यानंतर उपमुख्यमंत्री अजित पवार पुण्यात ठाण मांडून होते. महापालिका निवडणुकीच्या प्रचाराच्या शेवटानंतर डेक्कन भागातील ताथवडे क्लार्क्स इन या हॉटेलमधील त्यांची पुण्यातील शेवटची पत्रकार परिषद ठरली. यावेळी ‘आमच्या मनगटात ताकद असून, पुणेकरांना दिलेले आश्वासन पूर्ण करू,’ असा विश्वास त्यांनी व्यक्त केला होता. अजित पवार यांनी 30 ते 40 मिनिटे ही पत्रकार परिषद घेत पुणेकरांना आपली भूमिका पटवून देण्याचा प्रयत्न केला. त्यांनी पत्रकारांच्या सर्वच प्रश्नांना उत्तरे दिली. तसेच काही प्रश्नांची उत्तरे देताना हजरजबाबीपणाही दाखवला. महापालिका निवडणुकीत दोन्ही राष्ट्रवादी एकत्र लढत असल्या तरी पत्रकार परिषदेच्या ठिकाणी लावण्यात आलेल्या बॅनरवर तुतारीचे चिन्ह नव्हते. याबाबत विचारले असता त्यांनी ग्रामीण शैलीत उत्तर दिले. “सगळं काही मीच बघू का?” असे म्हणत त्यांनी मिश्कील उत्तर दिले. त्यांच्या उत्तरामुळे उपस्थितांमध्ये हशा पिकला. वेळ पडली तर भाजपसोबत जाणार का, असा प्रश्न विचारला असता पवार म्हणाले, “तुम्ही तो विचार का करता?” आमची महापालिकेत एकहाती सत्ता येईल, असा ठाम विश्वास त्यांनी व्यक्त केला. तसेच किती जागा निवडून येतील, असा प्रश्न विचारला असता पवार म्हणाले, “165 पैकी आम्ही दोघेच असू. दोन्ही महापालिकांमध्ये आमचाच महापौर होईल.” दिवस-रात्र जिवाचे रान केले आहे. लोकांचा चांगला प्रतिसाद मिळाला आहे. मात्र, तो मतांत किती रूपांतरित होतो, हे पाहावे लागेल, असेही त्यांनी सांगितले. “1999 मध्ये आघाडीचे सरकार आल्यानंतर कृष्णा खोरे महामंडळाची जबाबदारी माझ्याकडे आली. आधीच्या सरकारच्या काळात पुरंदर उपसा सिंचन योजनेचा खर्च 330 कोटी रुपये दाखवण्यात आला होता. मी तो कमी करून 220 कोटींवर आणला. त्यातील 100 कोटी पक्षनिधीसाठी आणि 10 कोटी अधिकाऱ्यांनी वाढवले होते, असे मला सांगण्यात आले. ही फाइल आजही माझ्याकडे आहे. हे प्रकरण बाहेर आले असते तर मोठा हाहाकार माजला असता,” अशी टीका अजित पवार यांनी 1995 च्या युती सरकारवर केली होती.

# AssetPlus ला ₹१७५ कोटींचा भांडवली निधी

**भारतातील ‘असिस्टेड वेल्थ मॅनेजमेंट’चे भविष्य घडवण्यासाठी नेक्सस व्हेंचर पार्टनर्स यांच्या नेतृत्वाखाली गुंतवणूक**

पुणे (दै. संध्या) :

भारतातील आघाडीच्या पूर्णपणे डिजिटल-असिस्टेड वेल्थ मॅनेजमेंट प्लॅटफॉर्मपैकी एक असलेल्या ॲसेटप्लस (AssetPlus) ने ₹१७५ कोटींच्या निधी उभारणीची घोषणा केली आहे. ही फंडिंग फेरी नेक्सस व्हेंचर पार्टनर्स यांच्या नेतृत्वाखाली झाली असून, यामध्ये एट रोड्स व्हेंचर्स, नितीन कामथ यांचा रेनमॅटर फंड आणि बुपिंदर सिंग यांचाही सहभाग आहे. भारतात वितरक-केंद्रित, शाश्वत वेल्थ मॅनेजमेंट पायाभूत रचना उभारण्याच्या AssetPlus च्या दीर्घकालीन उद्दिष्टातील हा महत्त्वाचा टप्पा मानला जात आहे.

केवळ व्यवहार किंवा साधनांपुरते संपत्ती निर्माण मर्यादित नसते, या मूलभूत विश्वासावर AssetPlus ची स्थापना झाली आहे. तंत्रज्ञान मानवी सल्ल्याची जागा न घेता त्याची ताकद वाढवेल, अशा समग्र ‘असिस्टेड वेल्थ मॅनेजमेंट’ परिसंस्थेची उभारणी कंपनी करत आहे. विश्वासार्ह आणि प्रमाणित वितरकांना सक्षम करून भारतीय कुटुंबांना अधिक परिणामकारक, सातत्यपूर्ण आणि व्यापक पातळीवर सेवा देता यावी, हा कंपनीचा मुख्य उद्देश आहे.

AssetPlus चे सहसंस्थापक व मुख्य कार्यकारी अधिकारी विश्रांत सुरेश म्हणाले, “आमचे उद्दिष्ट केवळ आणखी एक वितरण प्लॅटफॉर्म उभारण्याचे कधीच नव्हते. मानवी सल्ला आणि तंत्रज्ञानाद्वारे मिळणारी विस्तारक्षमता यांचा संगम साधणारी वेल्थ मॅनेजमेंट पायाभूत रचना आम्ही उभारत आहोत. दीर्घकालीन दृष्टीकोनातून भारताच्या वेल्थ इकोसिस्टमला बळकटी देण्यावर विश्वास ठेवणाऱ्या गुंतवणूकदारांसोबत ही दृष्टी वेगाने प्रत्यक्षात आणण्यासाठी हा निधी महत्त्वाचा ठरेल.”

उभारण्यात आलेला निधी कंपनीचा तंत्रज्ञान प्लॅटफॉर्म अधिक सक्षम करण्यासाठी, उत्पादनांची व्याप्ती वाढवण्यासाठी आणि समग्र वेल्थ मॅनेजमेंटला पाठबळ देणाऱ्या उपक्रमांसाठी वापरण्यात येणार आहे. म्युच्युअल फंड हे केंद्रस्थानी असले तरी, आरोग्य विमा आणि टर्म प्लॅन्ससारख्या सुविधांद्वारे एकाच प्लॅटफॉर्मवर संपूर्ण आर्थिक उपाय देण्याची क्षमता AssetPlus वितरकांना उपलब्ध करून देते.

भारतातील गुंतवणूक क्षेत्रात सध्या मोठा संरचनात्मक बदल होत आहे. गुंतवणूकदारांचा सहभाग वाढत असून, जागरूकता वाढली आहे आणि लाखो नवोदित गुंतवणूकदार बाजारात प्रवेश करत आहेत. मात्र, ‘डू-इट-युअरसेल्फ’ (DIY) पद्धतीच्या मर्यादाही आता स्पष्ट होत आहेत. बाजारातील अस्थिरता, भावनिक निर्णय, विखुरलेली आर्थिक उत्पादने आणि दीर्घकालीन नियोजनाचा अभाव यामुळे केवळ प्रवेश पुरेसा नसल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे गुंतवणूकदारांना मार्गदर्शन, संदर्भ आणि सातत्याची अधिक गरज भासत आहे.

AssetPlus च्या मते, भारतातील संपत्ती निर्मितीचा पुढचा टप्पा ‘असिस्टेड मॉडेल्स’द्वारेच पुढे जाईल, जिथे तंत्रज्ञान वितरकांना जोखीम-संतुलित व उद्दिष्ट-केंद्रित गुंतवणूक सल्ला देण्यासाठी सक्षम करेल. उत्पादनांची विक्री न करता, जीवनाच्या विविध टप्प्यांनुसार आर्थिक निर्णय घेण्यास मदत करणारा हा प्लॅटफॉर्म सल्ला, अनुपालन, ऑपरेशन्स आणि विविध आर्थिक उपाय एकाच अखंड अनुभवात एकत्र आणतो.

AssetPlus चे सहसंस्थापक व मुख्य तंत्रज्ञान अधिकारी अवनीश राज म्हणाले, “मोठ्या प्रमाणावर वेल्थ मॅनेजमेंटसाठी विश्वासार्हता आणि भरोसा अत्यंत महत्त्वाचा आहे. वितरकांचा अडथळा कमी करून त्यांना ग्राहकांसोबत अधिक वेळ घालवता यावा, यासाठी आम्ही प्रणाली विकसित करत आहोत. हा निधी भविष्यासाठी सज्ज आणि मजबूत तंत्रज्ञानात गुंतवणूक करण्यास मदत करेल.”

पुढील काळात १० कोटी भारतीय कुटुंबांना सेवा देण्याच्या दीर्घकालीन ध्येयाशी AssetPlus कटिबद्ध आहे. तंत्रज्ञान, प्रशिक्षण आणि समग्र वेल्थ मॅनेजमेंट परिसंस्थेद्वारे नवीन पिढीतील वितरकांना सक्षम करून, भारताच्या आर्थिक समावेशन आणि घरगुती संपत्ती निर्मितीच्या पुढील टप्प्यात महत्त्वाची भूमिका बजावण्याचा कंपनीचा मानस आहे.

## ग्लोबल कॅपॅबिलिटी सेंटर्स मधील सीएमएची धोरणात्मक भूमिका अधोरेखित करणारी राईज इंडिया लीडरशिप समिट

पुणे (दै. संध्या) :




दि इन्स्टिट्यूट ऑफ कॉस्ट अकाउंटंट्स ऑफ इंडिया (ICMAI) यांच्या वतीने पुणे येथे “RISE इंडिया लीडरशिप समिट” चे आयोजन करण्यात येणार असून, या परिषदेची संकल्पना “ग्लोबल कॅपॅबिलिटी सेंटर्स (GCCs) मधील धोरणात्मक नेतृत्व : मूल्यनिर्मितीचे शिल्पकार म्हणून CMAs” अशी आहे. या परिषदेच्या माध्यमातून GCCs ची बदलती भूमिका आणि कॉस्ट व मॅनेजमेंट अकाउंटंट्स (CMAs) यांचे वाढते धोरणात्मक योगदान अधोरेखित करण्यात येणार आहे. अशी माहिती ICMAI चे करिअर काउन्सेलिंग अँड प्लेसमेंट कमिटीचे अध्यक्ष CMA विनय रंजन यांनी पत्रकार परिषदेत दिली.

पत्रकार परिषदेला CMA चैतन्य मोहरीर, सचिव – ICMAI-WIRC तसेच CMA श्रीकांत इप्पलपल्ली, अध्यक्ष – ICMAI पुणे चॅप्टर आदि मान्यवर उपस्थित होते. ही समित उद्या (30 जानेवारी 2026 रोजी) हॉटेल विवांता, पुणे येथे सायंकाळी 4 ते रात्री 8 या दरम्यान होणार आहे. ICMAI चे करिअर काऊन्सेलिंग अँड प्लेसमेंट कमिटीचे अध्यक्ष CMA विनय रंजन यांनी सांगितले की, ICMAI कडून केवळ GCCs साठी आयोजित करण्यात येणारी ही पहिलीच परिषद आहे. पूर्वी GCCs प्रामुख्याने खर्च नियंत्रण व आर्थिक अहवालांपुरते मर्यादित होते; मात्र आजच्या घडीला त्यांच्याकडून धोरणात्मक नियोजन, कार्यप्रदर्शन व्यवस्थापन, जोखीम प्रशासन (रिस्क गव्हर्नन्स) आणि डिजिटल क्षमतांचा प्रभावी वापर अपेक्षित आहे. या सर्व गरजा पूर्ण करण्यासाठी CMAs अत्यंत सक्षम आहेत.

CMAs कडे खर्च व नफा विश्लेषण, धोरणात्मक नियोजन, कार्यप्रदर्शन मोजमाप आणि निर्णय सहाय्य (Decision Support) यांचे सखोल ज्ञान असल्याने ते जागतिक CFOs आणि व्यवसाय नेत्यांसाठी महत्त्वाचे धोरणात्मक भागीदार ठरत आहेत. मार्जिन ऑप्टिमायझेशन, फायनान्स ट्रान्सफॉर्मेशन, ॲनालिटिक्स, गव्हर्नन्स तसेच ESG-संलग्न निर्णयप्रक्रिया यांसारख्या क्षेत्रांत CMAs ची भूमिका अधिक ठळकपणे दिसून येत आहे.

या समिटला विविध आघाडीच्या GCC कंपन्यांचे प्रतिनिधी, CFOs आणि HR प्रमुख उपस्थित राहणार असून, उद्योग संवाद आणि नेतृत्वात्मक चर्चेसाठी हे एक महत्त्वाचे व्यासपीठ ठरणार आहे.

## अजित दादांच्या विमान अपघाताच्या चौकशीबाबत मोठी घोषणा

पुणे (दै. संध्या) :

महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या Learjet 45 विमान अपघाताच्या चौकशीसाठी केंद्रीय हवाई उड्डाण मंत्रालयाने तीन सदस्यीय समिती स्थापन केली आहे.

ही टीम AAIB ची असून, त्यासोबत DGCA ची आणखी एक तीन सदस्यीय टीमही अपघातस्थळी दाखल झाली आहे. AAIB चे डायरेक्टर जनरल स्वतः घटनास्थळी पोहोचले आणि पाहणी केली. मंत्रालयाने X वर जारी केलेल्या स्टेटमेंटनुसार, अपघातग्रस्त विमानाचा ब्लॅक बॉक्स सापडला असून, त्याचे विश्लेषण सुरू आहे. ब्लॅक बॉक्समधून शेवटच्या क्षणातील आवाज, फ्लाइट डेटा आणि वैमानिकांच्या संवादाची माहिती मिळेल, ज्यावरून अपघाताचे नेमके कारण समजेल.

**मुख्य फोकस कशावर?**

AAIB नियम २०२५ च्या रूल ५ आणि ११ नुसार तपास सुरू.
कालमर्यादा आणि पारदर्शकताला सर्वोच्च प्राधान्य;
SOP नुसार प्रक्रिया.
दाट धुके/कमी दृश्यमानता, वैमानिकांचे निर्णय, बारामती विमानतळाच्या ऑपरेशनल मर्यादा (uncontrolled airfield), लँडिंगचा दुसरा प्रयत्न असफल होणे.
विमानाचा ढिगारा ताब्यात घेणे, एअरफ्रेम, इंजिन लॉगबुक, देखभाल रेकॉर्ड, क्रू क्वालिफिकेशन, प्रमाणपत्रे यांची तपासणी.
DGCA कडून क्रू आणि विमानाशी संबंधित कागदपत्रे मागवली;
रडार डेटा, CCTV फुटेज, ATC टेप रेकॉर्डिंग आणि हॉटलाइन संवादांचे विश्लेषण होणार.

विमान ऑपरेटरच्या ऑफिसमध्ये AAIB अधिकाऱ्यांनी कर्मचाऱ्यांची चौकशी सुरू केली; देखभाल आणि एअरवर्थिनेस रेकॉर्ड ताब्यात घेतले. अजित पवार यांच्या पार्थिवावर आज सकाळी ११ वाजता बारामती येथील विद्या प्रतिष्ठानच्या मैदानावर शासकीय इतमामात अंत्यसंस्कार करण्यात आले. आपल्या लाडक्या नेत्याला अखेरचा निरोप देण्यासाठी संपूर्ण बारामतीत जनसागर लोटल्याचे पाहायला मिळाले.

## मोठी संधी दिल्याचे आभार मानायचे राहून गेले, नगरसेवकाचा कंठ दाटला


पुणे (दै. संध्या) :

प्रशासकीय यंत्रणेवर मजबूत पकड असलेला नेता म्हणून राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांची ख्याती होती. पहाटे सहाला अजित दादा बाहेर पडायचे ते थेट रात्री ११ वाजेपर्यंत त्यांचे कामकाज सुरू असायचे. महापालिका निवडणुकीत अजित पवार पायाला भिंगरी बांधून उमेदवारांच्या प्रचारार्थ निवडणुकीत उतरले.

पुणे शहरात अनेक ठिकाणी त्यांनी सभा, प्रचार रॅली घेतली. पुणे महापालिकेत राष्ट्रवादीचे उमेदवार निवडून आणण्यासाठी अजित दादांनी जीवाचे रान केले. त्यांची कारकीर्द झंझावाती राहिली. अनेक मोठे निर्णय त्यांनी त्यांच्या कार्यकीर्दीत घेतले. विमान अपघाताची घटना घडण्यापूर्वी अजित दादांनी पक्षासाठी संघटनात्मक निर्णय घेतला होता. पुणे महानगरपालिकेतील विरोधी पक्षनेतेपदी ॲड. निलेश निकम यांची नियुक्ती करण्याचा निर्णय त्यांनी मंगळवारीच जाहीर केला होता. त्यानंतर दुसऱ्याच दिवशी विमान अपघाताची दुर्देवी घटना घडली आणि अजित पवार यांचे निधन झाले. त्यांच्या निधानाने मोठा आघात ॲड नीलेश निकल यांच्यावर झाला आहे. विश्वास दाखवत त्यांची अजित पवार यांनी विरोधी पक्षनेतेपदी निवड केली होती. याचे आभार मानण्याची संधीच नियतीने निलेश निकम यांच्याकडून हिरावून घेतली आहे. पुणे महापालिकेत विरोधी पक्षनेतेपदी कोणाची वर्णी लागणार याची जोरदार चर्चा होती. अनेकांची नावे चर्चेत होती.

## मेडिकव्हर हॉस्पिटल्स येथे युटेरिन आर्टरी एम्बोलायझेशन प्रक्रिया यशस्वी

पुणे (दै. संध्या) :



मेडिकव्हर हॉस्पिटल्स, भोसरी – पुणे येथे दुय्यम प्रसूतीनंतर झालेल्या तीव्र रक्तस्रावामुळे गंभीर अवस्थेत दाखल झालेल्या ३४ वर्षीय महिलेवर अत्याधुनिक आणि जीवनरक्षक उपचार यशस्वीपणे करण्यात आले. वेळेत घेतलेल्या वैद्यकीय निर्णयामुळे रुग्णाचा जीव वाचवण्यात आला तसेच तिचे गर्भाशय सुरक्षित ठेवण्यात डॉक्टरांना यश आले. ही महिला IVF पद्धतीने जुळ्या बाळांची आई झाली होती. नियोजित सिझेरियन शस्त्रक्रियेनंतर १३ व्या दिवशी तिला अचानक मोठ्या प्रमाणात योनीमार्गातून रक्तस्राव, पोटदुखी, चक्कर येणे आणि अशक्तपणा जाणवू लागला. तपासणीत तिची प्रकृती गंभीर असून दुय्यम प्रसूतीनंतरचा रक्तस्राव असल्याचे स्पष्ट झाले.

अल्ट्रासाऊंड तपासणीत गर्भाशयात चिकटलेले अपरा ऊतक असल्याचा संशय व्यक्त करण्यात आला. या अवस्थेत मोठ्या प्रमाणात रक्तस्राव होण्याचा धोका असून गर्भाशय काढून टाकण्याची शस्त्रक्रिया करावी लागू शकत होती. मात्र रुग्णाचे वय कमी असून भविष्यातील मातृत्व जपणे महत्त्वाचे असल्याने डॉक्टरांनी गर्भाशय सुरक्षित ठेवणारा उपचार करण्याचा निर्णय घेतला. याबाबत माहिती देताना डॉ. मधुश्री माने, कन्सल्टंट – स्त्रीरोग व प्रसूतीशास्त्र, म्हणाल्या, “रुग्णाची अवस्था अतिशय गंभीर होती आणि प्रत्येक मिनिट महत्त्वाचे होते. पारंपरिक शस्त्रक्रियेऐवजी गर्भाशय वाचवणारा आणि तात्काळ परिणाम देणारा उपाय म्हणून आम्ही युटेरिन आर्टरी एम्बोलायझेशनचा निर्णय घेतला.”

स्त्रीरोग, अतिदक्षता आणि इंटरव्हेन्शनल रेडिओलॉजी विभागांच्या समन्वयातून ही प्रक्रिया यशस्वीपणे पार पडली. या प्रक्रियेमुळे दोन्ही गर्भाशय धमनींमधील रक्तप्रवाह नियंत्रित करण्यात आला आणि रक्तस्राव पूर्णतः थांबला.

या उपचाराबाबत डॉ. अमृता वर्मा, इंटरव्हेन्शनल रेडिओलॉजिस्ट, म्हणाल्या, “युटेरिन आर्टरी एम्बोलायझेशन ही कमी आघात करणारी, सुरक्षित आणि प्रभावी उपचारपद्धती आहे. योग्य वेळी ही प्रक्रिया केल्यास जीव वाचवण्यासोबतच गर्भाशय सुरक्षित ठेवणे शक्य होते.”

उपचारानंतर रुग्णाला आयसीयूमध्ये निरीक्षणाखाली ठेवण्यात आले. आवश्यक रक्तघटकांचे संक्रमण आणि औषधोपचार देण्यात आले. रुग्णाची प्रकृती स्थिर झाल्यानंतर कोणताही अतिरिक्त रक्तस्राव झाला नाही आणि तिची तब्येत हळूहळू सुधारत गेली. या यशस्वी उपचारामुळे रुग्णाचा जीव वाचण्यासोबतच तिचे गर्भाशय सुरक्षित राहिले.

# आयएसएसटीच्या “लाईफ लेसन्स थ्रू स्पोर्ट्स” उपक्रमात जॉन्टी रोड्स यांचे प्रेरणादायी मार्गदर्शन

पुणे (दै. संध्या) :



इन्स्टिट्यूट ऑफ स्पोर्ट्स सायन्स अँड टेक्नॉलॉजी (ISST), पुणे यांच्या ‘ह्युमन्स इन स्पोर्ट्स’ या प्रमुख उपक्रमांतर्गत जागतिक क्रिकेट दिग्गज श्री. जॉन्टी रोड्स यांच्या उपस्थितीत एक प्रेरणादायी आणि विचारप्रवर्तक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. हा कार्यक्रम बावधन येथील आयलीझियम क्लब येथे पार पडला, ज्यांनी या कार्यक्रमासाठी व्हेन्यू पार्टनर म्हणून सहकार्य केले.

१६ जानेवारी २०२६ रोजी पार पडलेल्या या कार्यक्रमात विद्यार्थी, पालक, शिक्षक, क्रीडा उद्योगातील व्यावसायिक तसेच क्रीडा क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. ‘लाईफ लेसन्स थ्रू स्पोर्ट्स’ या विषयावर आधारित हा संवादात्मक सत्र मानसिकता, चिकाटी, नेतृत्व आणि दीर्घकालीन विकास यांवर केंद्रित होता. संपूर्ण कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आयएसएसटीच्या संचालक (ऑपरेशन्स) सौ. तन्वी लुणावत यांनी अत्यंत प्रभावीपणे केले.

जागतिक क्रिकेटमधील सर्वोत्तम क्षेत्ररक्षकांपैकी एक म्हणून ओळखले जाणारे श्री. जॉन्टी रोड्स यांनी आपल्या क्रिकेट प्रवासातील अनुभव सांगताना संघभावना, प्रक्रियेवर विश्वास आणि वैयक्तिक कामगिरीपेक्षा सामूहिक योगदानाचे महत्त्व अधोरेखित केले. त्यांनी विद्यार्थ्यांना संबोधित करताना सांगितले की, खेळ जीवनातील मूल्ये घडवतो आणि ती मैदानाच्या पलीकडेही उपयोगी ठरतात.

या वेळी बोलताना श्री. जॉन्टी रोड्स म्हणाले: “संघाचा भाग असणे म्हणजे केवळ स्वतःची कामगिरी नव्हे, तर इतरांच्या प्रगतीसाठी योगदान देणे आणि त्यांना पुढील पातळीवर नेण्यासाठी मदत करणे होय. खेळ आपल्याला निकालापेक्षा प्रक्रियेवर लक्ष केंद्रित करायला शिकवतो. आपण सर्व काही योग्य पद्धतीने केले तरी काही गोष्टी आपल्या नियंत्रणाबाहेर असतात. मात्र शिस्त, सातत्य आणि प्रक्रियेवर विश्वास ठेवल्यास दीर्घकालीन यश निश्चित मिळते.”

कार्यक्रमात बोलताना आयएसएसटीचे संस्थापक संचालक डॉ. विपुल लुणावत यांनी ‘लाईफ लेसन्स थ्रू स्पोर्ट्स’ या उपक्रमामागील संकल्पना स्पष्ट केली. ते म्हणाले: “खेळातील यश सरळ रेषेत मिळत नाही. अपयश म्हणजे पराभव नव्हे, तर शिकण्याची संधी असते. नेतृत्व म्हणजे अधिकार नव्हे, तर जबाबदारी. आणि उत्कृष्टता हा एक क्षण नसून एक सवय आहे.”

डॉ. लुणावत यांनी पुढे नमूद केले की, ‘लाईफ लेसन्स थ्रू स्पोर्ट्स’ हा केवळ व्याख्यानमालिका नसून अनुभव आणि आकांक्षा यांच्यातील संवाद आहे, जो विद्यार्थ्यांना वेगाने बदलणाऱ्या क्रीडा उद्योगासाठी तयार करतो.

या संध्याकाळी आयएसएसटी स्पोर्ट्स लीग ५.० संदर्भातही थोडक्यात उल्लेख करण्यात आला. ही विद्यार्थी-चालित बहुक्रीडा लीग असून ती विद्यार्थ्यांना व्यवस्थापन, नेतृत्व आणि प्रत्यक्ष अनुभव देणारे एक महत्त्वाचे व्यासपीठ आहे. जरी पुरस्कार वितरण समारंभात ११ क्रीडा प्रकारांतील उत्कृष्ट कामगिरीचा सन्मान करण्यात आला असला, तरी संपूर्ण कार्यक्रमाचा केंद्रबिंदू शिकणे, मानसिकता आणि मानवी विकास हाच होता.

कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलनाने झाली. यामध्ये श्री. जॉन्टी रोड्स, डॉ. विपुल लुणावत, आयएसएसटीच्या अध्यक्षा सौ. उज्ज्वला लुणावत तसेच टिळक महाराष्ट्र विद्यापीठ ट्रस्टच्या उपाध्यक्ष डॉ. प्रणती टिळक यांची प्रमुख उपस्थिती होती. याच वेळी आयएसएसटीच्या खारघर, नवी मुंबई येथील नव्या कॅम्पसच्या प्रारंभाची अधिकृत घोषणा करण्यात आली. आयएसएसटीचा नवी मुंबईतील विस्तार टिळक महाराष्ट्र विद्यापीठाच्या (TMV) सततच्या मार्गदर्शन आणि संस्थात्मक पाठबळामुळे शक्य झाला आहे. TMV च्या विश्वास आणि सहकार्यामुळे खारघर येथील TMV कॅम्पसमध्ये आयएसएसटीचे शैक्षणिक कार्यक्रम सुरू होणे शक्य झाले असून, हा आयएसएसटीच्या वाढीतील एक महत्त्वाचा टप्पा आहे.

बावधन येथील आयलीझियम क्लबने व्हेन्यू पार्टनर म्हणून दिलेल्या उत्कृष्ट सुविधांमुळे हा कार्यक्रम प्रेरणा, शिक्षण आणि साजरीकरण यांचा सुंदर संगम ठरला.

‘ह्युमन्स इन स्पोर्ट्स’सारख्या उपक्रमांद्वारे आयएसएसटी भविष्यासाठी सज्ज, नैतिक आणि विचारशील क्रीडा व्यावसायिक घडवण्याच्या आपल्या बांधिलकीला अधिक बळकटी देत आहे. खेळ हा केवळ कामगिरीपुरता मर्यादित नसून तो जीवनाचा सर्वोत्तम शिक्षक आहे, हा संदेश या कार्यक्रमातून ठळकपणे समोर आला.

## थोडक्यात पण महत्वाचे...



## सस्टेनेबल एव्हिएशन फ्युएल पुरवठ्यासाठी अकासा एअरसोबत केली स्वाक्षरी

मुंबई (दैनिक संध्या) : भारतातील अग्रगण्य राष्ट्रीय ऊर्जा कंपनी इंडियन ऑइल कॉर्पोरेशन लिमिटेडने विंग्स इंडिया २०२६ दरम्यान भारतातील सर्वात वेगाने वाढणारी विमान कंपनी अकासा एअरसोबत भविष्यात सस्टेनेबल एव्हिएशन फ्युएल(एसएएफ) पुरवठ्याचा शोध घेण्यासाठी लेटर ऑफ इंटेंट (एलओआय) वर स्वाक्षरी केली. या लेटर ऑफ इंटेंट अंतर्गत, एसएएफच्या संभाव्य पुरवठ्यामार्फत एअरलाइनच्या शाश्वततेच्या उद्दिष्टांना पाठिंबा देण्यासाठी दोन्ही कंपन्यांमध्ये सहकार्याचा एक आराखडा तयार करण्याचा प्रस्ताव आहे. एसएएफ हे हवाई प्रवासातून होणाऱ्या जीवनचक्रातील हरितगृह वायू उत्सर्जन कमी करण्यासाठी एक महत्त्वपूर्ण उपाय आहे आणि विमान वाहतूक क्षेत्राच्या नेट-झिरो उत्सर्जनाच्या दिशेने होणाऱ्या संक्रमणामध्ये महत्त्वाची भूमिका बजावेल, अशी अपेक्षा आहे. "हा एलओआय कमी-कार्बन इंधनांचा विस्तार करण्याच्या आणि आमच्या ग्राहकांना त्यांच्या ऊर्जा संक्रमणामध्ये सहाय्य करण्याच्या आमच्या बांधिलकीचे प्रतिबिंब आहे.इंधन उत्पादन,पुरवठा आणि लॉजिस्टिक्समधील आमच्या तज्ज्ञतेचा लाभ घेत, एसएएफ चा लवकरात लवकर वापर सुरू करण्यासाठी आम्ही अर्थपूर्ण भूमिका बजावण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे," असे इंडियन ऑइल कॉर्पोरेशन लिमिटेडचे कंट्री हेड (एव्हिएशन बिझनेस) शैलेश धर यांनी सांगितले. या एलओआय नुसार, दोन्ही कंपन्या संभाव्य एसएएफ पुरवठ्याचे प्रमाण, वितरण स्थळे आणि कालमर्यादा यांचे मूल्यमापन करण्यासोबतच मान्यताप्राप्त शाश्वत कच्चा माल आणि उत्पादन पद्धतींच्या वापरावरही संयुक्तपणे काम करतील.

## लोकनेते अजितदादा पवार यांना यवतमध्ये भावपूर्ण श्रद्धांजली; जनमानसावर शोककळा

यवत (पुणे) (दैनिक संध्या) : महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री आणि खंबीर नेतृत्व अजितदादा पवार यांच्या दुर्दैवी अपघाती निधनाने संपूर्ण राज्यावर शोककळा पसरली आहे. आपल्या लाडक्या नेत्याला श्रद्धांजली वाहण्यासाठी यवत (ता. दौंड) येथे आज दि. 29 जानेवारी रोजी सायंकाळी पाच वाजता श्री काळभैरवनाथ मंदिर परिसरात सर्वपक्षीय शोकसभेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी विविध क्षेत्रातील मान्यवरांनी आणि ग्रामस्थांनी उपस्थित राहून दादांच्या आठवणींना उजाळा देत त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली. अजितदादांच्या निधनाचे वृत्त समजताच यवत परिसरातील जनजीवन विस्कळीत झाले. दादांबद्दलचे प्रेम आणि आदर व्यक्त करण्यासाठी येथील व्यापाऱ्यांनी काल,दि. २८ जानेवारी रोजी आपली दुकाने बंद ठेवून 'दुखावटा' पाळला. यावेळी रस्ते ओस पडले होते आणि प्रत्येकाच्या चेहऱ्यावर आपल्या हक्काच्या नेत्याला गमावल्याचे दुःख स्पष्टपणे दिसत होते.राज्याचे नेतृत्व पोरके झाले' अशी शोकसभेतील भावना पहायला मिळाली.' दि 29 जानेवारी रोजी सायंकाळी काळभैरवनाथ मंदिरासमोर भरलेल्या शोकसभेत राजकीय, सामाजिक क्षेत्रातील मान्यवरांनी दादांच्या कार्याचा गौरव केला.सुरज चोरगे व रोहन दोरगे यांनी आपल्या भाषणात सांगितले की, "अजितदादा म्हणजे कामाचा झपाटा आणि शब्दाचा पक्का माणूस. त्यांच्या जाण्याने केवळ पुणे जिल्ह्याचेच नव्हे, तर संपूर्ण महाराष्ट्राचे कधीही न भरून येणारे नुकसान झाले आहे."दीपक महाराज मोटे यांनी दादांच्या प्रशासकीय शिस्तीचे आणि सामान्यांच्या कामाप्रती असलेल्या तळमळीचे कौतुक केले.मोटे यांनी सांगितले कि,मोठा माणुस कोणाला म्हणावं तर विरोधकाच्याही डोळ्यांतुन अश्रु येतील अशा माणसाला मोठा माणूस म्हणावे. अजितदादा नावाने "दादा" नाही तर कर्तृत्वानेही दादा च होते हे सिद्ध होते.दत्ता दादर, उत्तम गायकवाड आणि रामदास दोरगे यांनी दादांच्या विकासकामांची साक्ष देत.

# सॅमसंगकडून गॅलेक्सी A07 5G चे अनावरण : फोटोग्राफी व बॅटरी पॉवरहाऊस

**गुरूग्राम (दै. संध्या) :**

सॅमसंग हा भारतातील आघाडीचा ग्राहक इलेक्ट्रॉनिक्स ब्रँड फेब्रुवारीच्या पहिल्या आठवड्यात गॅलेक्सी A07 5G लाँच करणार आहे. ए सिरीजमधील हा नवीन स्मार्टफोन भारतातील डिजिटलप्रेमींसाठी डिझाइन करण्यात आला आहे, जे ऑनलाइन मनोरंजन, सोशल मीडियाच्या माध्यमातून व्हिज्युअल कथाकथनाचा आनंद देणारा आणि दिवसभर बॅटरी कार्यरत राहणारा किफायतशीर दरामधील डिवाईसचा शोध घेत आहेत.




गॅलेक्सी A07 5G मध्ये आयकॉनिक ट्रॅक कॅमेरा डेकोसह हाय-रिझॉल्यूशन ड्युअल-कॅमेरा सेटअप आहे, ज्यामध्ये उच्च दर्जाच्या फोटोसाठी 50 मेगापिक्सल ऑटोफोकस कॅमेरा आणि अधिक सुस्पष्टतेसाठी 2 मेगापिक्सल कॅमेरा आहे.

मेन कॅमेराचे एफ.8 अपेंचर, तसेच 2 मेगापिक्सल डेप्थ कॅमेरा मूळ गोष्टींवर लक्ष केंद्रित करत आणि पार्श्वभूमीला अस्पष्ट करत आकर्षक बोकेह इफेक्ट पोर्ट्रेट्स देतात. वाइड-अँगल सेटअप आकर्षक रंगसंगती व सुस्पष्टतेसाठी सुरेखरित्या डिझाइन करण्यात आले आहे, जे सूर्यास्त, रस्त्यावरील आकर्षक दृश्ये किंवा संस्मरणीय क्षणांना कॅप्चर करण्यासाठी अनुकूल आहे. या स्मार्टफोनमधील 8 मेगापिक्सल फ्रण्ट कॅमेरा किमान आवाजासह आकर्षक सेल्फीज व व्हिडिओ कॅप्चर होण्याची खात्री देतो.

ग्राहकांना फोटो कॅप्चर, एडिट व शेअर करण्याचा अनुभव देण्यासाठी गॅलेक्सी A07 5G मध्ये 6.7-इंच एफडी+ डिस्प्लेसह 120 हर्ट्झ रिफ्रेश रेट आहे, ज्यामधून व्हिडिओ व वेब ब्राऊजिंगसाठी सहज ट्रान्झिशन्स व स्क्रॉलिंगची खात्री मिळते. डिस्प्लेचा हाय-ब्राइटनेस मोड (एचबीएम) 800 नीट्सपर्यंत पोहोचत प्रखर सूर्यप्रकाशात देखील डिस्प्ले सुस्पष्टपणे दिसण्याची खात्री देतो. अधिक टिकाऊपणासाठी स्क्रिन 2-स्टेप टेम्पर्ड ग्लासच्या माध्यमातून सुरक्षित आहे.

गॅलेक्सी A07 5G मध्ये 6000 एमएएच बॅटरी आहे, जी पूर्वीच्या डिवाईसच्या तुलनेत 20 टक्के अधिक क्षमतेची आहे. या शक्तिशाली बॅटरीसह 25 वॅट फास्ट चार्जिंग डिवाईस दिवसभर कार्यरत राहण्याची खात्री देते, ज्यासह दीर्घकाळापर्यंत यूट्यूबवर व्हिडिओ स्ट्रीम करता येतात किंवा सोशल मीडिया ब्राऊज करता येते. गॅलेक्सी A07 5G मधील सानुकूल पॉवर मॅनेजमेंट काम व मनोरंजनासाठी विनासायास कार्यक्षमतेची खात्री देते.

गॅलेक्सी A07 5G ची लाँच तारीख, किंमत आणि विशेष ऑफर्सबाबत अधिक माहितीसाठी आमच्याशी जुडलेले राहा.

## दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेस एकत्र येणार ? जयंत पाटील

**मुंबई (दै. संध्या) :**

दिवंगत अजितदादा पवार यांच्या नंतर उत्तराधिकारी कोण ? या चर्चेला राजकिय वर्तुळात आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात जोरदार सुरुवात झाली असताना स्थानिक स्वराज्य संस्थाच्या निवडणुकीनंतर दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेस पक्षांनी एकत्र यावेत.यासंबंधी माझ्यात आणि अजितदादा पवार यांच्यासोबत बऱ्याच बैठका ही झाल्या होत्या.असा गौप्यस्फोट राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे (शरद पवार गट) नेते जयंत पाटील यांनी देवून दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेस केव्हा ही एकत्र येवू शकतात.असे संकेत दिले. स्व.अजितदादा पवार यांच्या अचानक जाण्याने अजितदादा यांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या नेतृत्वाचा प्रश्न निर्माण झाला आहे. त्यातच जिल्हा परिषद निवडणूकांनंतर अजित पवार यांची राष्ट्रवादी आणि शरद पवार यांची राष्ट्रवादी एकत्र येणार असल्याची शक्यता वर्तविण्यात येत होती. तसेच त्या अनुषंगाने अजित पवार आणि सुप्रिया सुळे यांच्याकडून तसे संकेतही देण्यात येत होते. या सगळ्या घडामोडीत राजकारणात नव्याने उतरलेल्या सुनेत्रा पवार यांच्या राजकिय प्रवासाचा निर्णय घेण्यास अजित पवार सक्षम होते. परंतु आता अजित पवार यांचाच अपघाती मृत्यू झाल्याने अजित पवार यांचा गट कोणाचे नेतृत्व मान्य करणार कोण ते नेतृत्व सांभाळणार यावरून अजित पवार यांच्या मृत्यूची घटना जाहिर होताच विचारण्यात येत होता.

## एसबीआय लाइफ इन्शुरन्सकडून ३१ डिसेंबर २०२५ रोजी संपलेल्या कालावधीसाठी ₹३१,३२६ कोटी रुपयांच्या नवीन व्यवसाय प्रीमियमची नोंद.

**मुंबई (दै. संध्या) :**

SBI Life — Apne liye. Apno ke liye.

देशातील अग्रगण्य जीवन विमा कंपन्यांपैकी एक असलेल्या एसबीआय लाइफ इन्शुरन्सने 31 डिसेंबर, 2025 रोजी संपलेल्या कालावधीसाठी ₹31,326 कोटींचा नवीन व्यवसाय प्रीमियम नोंदवला आहे, तर 31 डिसेंबर, 2024 रोजी संपलेल्या याच कालावधीसाठी हा आकडा ₹26,256 कोटी होता. 31 डिसेंबर, 2024 रोजी संपलेल्या संबंधित कालावधीच्या तुलनेत नियमित प्रीमियममध्ये 15% वाढ झाली आहे. संरक्षणावर स्पष्ट लक्ष केंद्रित करून, एसबीआय लाइफचा संरक्षण विभागाचा नवीन व्यवसाय प्रीमियम 31 डिसेंबर, 2025 रोजी संपलेल्या कालावधीसाठी ₹3,411 कोटी होता, ज्यात 22% वाढ नोंदवली गेली. संरक्षण वैयक्तिक नवीन व्यवसाय प्रीमियम 31 डिसेंबर, 2025 रोजी संपलेल्या कालावधीसाठी ₹651 कोटी आहे. वैयक्तिक नवीन व्यवसाय प्रीमियम ₹22,545 कोटी असून, 31 डिसेंबर, 2024 रोजी संपलेल्या याच कालावधीच्या तुलनेत त्यात 14% वाढ झाली आहे. 31 डिसेंबर, 2025 रोजी संपलेल्या कालावधीसाठी एसबीआय लाइफचा करानंतरचा नफा ₹1,666 कोटी होता. 31 डिसेंबर, 2024 रोजी संपलेल्या याच कालावधीच्या तुलनेत त्यात 4% वाढ झाली.

31 डिसेंबर, 2025 रोजी कंपनीचा सॉल्व्हन्सी रेशो रेग्युलेटरी गरजेच्या 1.50 च्या तुलनेत 1.91 इतका मजबूत होता. एसबीआय लाइफच्या व्यवस्थापनाधीन मालमत्तेतही (AUM) वाढ झाली. 31 डिसेंबर 2024च्या ₹4,41,678 कोटींवरून त्यात 31 डिसेंबर 2025 पर्यंत 16%ची वाढ होऊन ती ₹5,11,708 कोटी झाली, ज्यामध्ये कर्ज-इक्विटीचे प्रमाण 59:41 होते. कर्ज गुंतवणुकीपैकी 94.97% गुंतवणूक एएए (AAA) आणि सार्वभौम घटकांमध्ये करण्यात आली आहे. कंपनीकडे 3,53,506 प्रशिक्षित विमा व्यावसायिकांचे एक वैविध्यपूर्ण वितरण जाळे आहे आणि देशभरात 1,176 कार्यालयांसह तिची उपस्थिती मोठ्या प्रमाणात आहे, ज्यात मजबूत बँकाशुरन्स चॅनल, एजन्सी चॅनल, कॉर्पोरेट एजंट, दलाल, पॉइंट ऑफ सेल व्यक्ती (पीओएस), विमा विपणन कंपन्या, वेब एग्रीगेटर्स आणि थेट व्यवसायाचा समावेश असलेल्या इतर माध्यमांचा समावेश आहे.

वैयक्तिक नवीन व्यवसाय प्रीमियम आणि वैयक्तिक रेटेड प्रीमियममध्ये मार्केटमधील अनुक्रमे 28.1% आणि 25.6% हिश्शासह खासगी बाजारात नेतृत्व.

वार्षिक प्रीमियम समतुल्य (APE) ₹18,519 कोटी असून त्यात 16% ची वाढ.

एकूण नवीन व्यवसायाची विमा रक्कम ₹10,83,360 कोटी असून त्यात 68.8% वाढ झाली आहे.

## हिंदुस्तान झिंकने वेदांत मेटल बाजारात झिंक प्राइस केले लाँच

- देशातील एमएसएमईसाठी रिअल-टाइम मार्केट ॲक्सेस वाढवत आहे.
- सर्व प्रकारच्या व्यवसायांसाठी रिअल-टाइम किंमत शोध आणि अधिक लवचिकता प्रदान करणारे अशा प्रकारचे पहिले INR लाइव्ह प्राइसिंग मॉड्यूल
- भारताच्या ७७ व्या प्रजासत्ताक दिनी तंत्रज्ञान-चालित पारदर्शकता आणि स्वावलंबनाची भावना मजबूत करते

**नवी दिल्ली (दै. संध्या) :**



भारताच्या ७७ व्या प्रजासत्ताक दिनी, जगातील सर्वात मोठे एकात्मिक झिंक उत्पादक आणि जागतिक स्तरावरील पाच शीर्ष चांदी उत्पादकांपैकी एक असलेल्या हिंदुस्तान झिंक लिमिटेडने त्यांच्या प्रमुख मेटल ई-कॉमर्स प्लॅटफॉर्म, वेदांत मेटल बाजारवर भारतीय रुपयांमध्ये झिंक प्राइस नावाचे लाइव्ह प्राइसिंग मॉड्यूल लाँच करण्याची घोषणा केली.


धातूच्या किंमतींच्या प्रवेशाचे लोकशाहीकरण करण्यासाठी डिझाइन केलेले, झिंक प्राइस भारतातील व्यवसायांना, विशेषतः एमएसएमई आणि लहान-खंड खरेदीदारांना, जागतिक बेंचमार्कच्या अनुषंगाने भारतीय रुपयांमध्ये पारदर्शक, रिअल-टाइम धातूच्या किमती पाहण्यास, बुक करण्यास आणि लॉक करण्यास सक्षम करते, जे हिंदुस्तान झिंकची अधिक समावेशक, डिजिटली सक्षम आणि स्वावलंबी औद्योगिक परिसंस्था तयार करण्याच्या वचनबद्धतेचे प्रतिबिंब आहे.

२०२२ मध्ये सुरू झालेले वेदांत मेटल बाजार हे भारतातील पहिले ऑनलाइन मेटल मार्केटप्लेस आहे, जे धातू खरेदी प्रक्रिया सुलभ आणि आधुनिक करण्यासाठी डिझाइन केलेले आहे. हे प्लॅटफॉर्म एक अखंड डिजिटल अनुभव देते जे ग्राहकांना थेट किंमती पाहण्यास, ऑर्डर देण्यास आणि संपूर्ण पारदर्शकतेसह एंड-टू-एंड व्यवहार व्यवस्थापित करण्यास अनुमती देते. देशभरातील हजारो व्यवसायांचा विश्वास असलेले, वेदांत मेटल बाजार देशात धातूंच्या स्रोतांमध्ये बदल घडवून आणण्यात एक महत्त्वपूर्ण शक्ती म्हणून उदयास आले आहे. झिंक प्राइसची सुरुवात ही प्लॅटफॉर्मच्या क्षमतांमध्ये लक्षणीय वाढ आहे. ते भारतीय रुपयांमध्ये थेट लँडेड किंमती प्रदान करते, गतिमानपणे लंडन मेटल एक्सचेंजशी जोडलेले आहे, अचूक आणि अद्ययावत किंमत सुनिश्चित करते. ग्राहक एका मजबूत डिजिटल फ्रेमवर्कद्वारे सहजपणे व्यवहार करू शकतात जे विद्यमान प्रतिबद्धता मॉडेल्सना पूरक आहे, तर रिअल-टाइम किंमत दृश्यमानता शोधणाऱ्या खरेदीदारांना अधिक सुरक्षितता प्रदान करते. हे एमएसएमई आणि उदयोन्मुख उद्योगांना धातू बाजारात अधिक सक्रियपणे सहभागी होण्यास सक्षम करते, जलद निर्णय घेण्यास, सुधारित स्पर्धात्मकता आणि देशांतर्गत आणि जागतिक मूल्य साखळींमध्ये मजबूत एकात्मता प्रदान करते. या लाँचिंगप्रसंगी बोलताना हिंदुस्तान झिंकचे सीईओ अरुण मिश्रा म्हणाले, "भारताचे स्वावलंबी भारताचे स्वप्न तेव्हाच साकार होईल जेव्हा प्रत्येक उद्योगाला, आकारमानाचा विचार न करता, समान प्रवेश, पारदर्शकता आणि संधी मिळेल. वेदांत मेटल बाजारावर झिंक किंमत लाँच करून, आम्ही भारतात धातू खरेदी करण्याच्या पद्धतीत मूलभूत बदल करत आहोत, पारंपारिकपणे मोठ्या प्रमाणात व्यवसायांना प्राधान्य देणारे प्रवेश अडथळे दूर करत आहोत. हे व्यासपीठ एमएसएमई आणि लहान खरेदीदारांना मोठ्या संस्थांप्रमाणेच रिअल-टाइम किंमत शोध आणि निर्णय घेण्याचा अनुभव घेण्यास सक्षम करते.

# एअरटेलचा जागतिक स्तरावर ऐतिहासिक उपक्रम

**नवी दिल्ली (दै. संध्या) :**

- एअरटेलकडून ३६ कोटी भारतीय ग्राहकांना अडोबी एक्सप्रेस प्रीमियम मोफत मिळणार !
- एअरटेलच्या सर्व ग्राहकांसाठी ४ हजार किंमतीचे अडोबीचे ए-आय आधारित सुविधा उपलब्ध होत असल्याने आता डिझाईन्स तयार करणे सहज शक्य होणार.




भारताची आघाडीची दूरसंचार सेवा पुरवठादार कंपनी म्हणून प्रसिद्ध असलेल्या भारती एअरटेलने आता आपल्या ग्राहकांसाठी खास सोय उपलब्ध करुन दिली आहे. एअरटेलने ३६ कोटी भारतीय ग्राहकांसाठी अडोबी एक्सप्रेस हे अत्याधुनिक ॲप आता उपलब्ध केले आहे. अडोबी ॲप्लिकेशन हे वापरण्यासाठी अतिशय सोप्पे आहे. शिवाय या ॲप्लिकेशनच्या मदतीने डिजीटल कामही जलदरित्या पूर्ण होते. त्यामुळे सोशल मिडीयाशी संबंधित कोणतेही डिजीटल काम करणे आता सहज शक्य होणार आहे.

भारती एअरटेल आणि अडोबी यांच्यात पहिल्यांदाच या विषयासंदर्भातील ऐतिहासिक करार झाला आहे. या भागीदारीतून एअरटेल आपल्या सर्व ग्राहकांना अडोबी एक्सप्रेस प्रीमियमची सुविधा मोफत उपलब्ध होणार आहे. याद्वारे एअरटेलचे ग्राहक सोशल मिडीया पोस्ट, मार्केटिंग संबंधित डिजीटल काम, छोटे व्हिडिओ आणि इतर कोणतेही डिझाइन अत्यंत कमी श्रमात करु शकतील. या ॲप्लिकेशच्या मदतीने होणारी सर्व कामे उच्च दर्जाची असतील. या ॲप्लिकेशनच्या सबस्क्रिप्शनची मूळ किंमत चार हजार रुपये आहे. मात्र एअरटेलच्या ग्राहकांसाठी प्रीमियम सबस्क्रिप्शन वर्षभरासाठी मोफत असेल. विविध सोयीसुविधांच्या उपलब्धतेमुळे डिझायनिंगचा कोणताही पूर्वानुभव नसलेल्या ग्राहकांनाही आपल्या कल्पकतेच्या बळावर व्यावसायिक दर्जाचे कंटेट तयार करता येतील.अडोबी एक्सप्रेस प्रीमियमचे हे विशेष सबस्क्रिप्शन एअरटेलच्या सर्व ग्राहकांसाठी उपलब्ध असेल. मोबाईल, वाय-फाय आणि डीटीएच सेवा वापरणा-या ग्राहकांना या ॲप्लिकेशनचा वापर करता येईल. या सुविधेचा लाभ घेण्यासाठी ग्राहकांना फक्त एअरटेल थँक्स ॲप्वर लॉग-इन करुन या सर्व सोयीसुविधांना लाभ घेता येईल. हे सबस्क्रिप्शन सुरु करण्यासाठी कोणत्याही क्रेडिट कार्डची आवश्यकता नाही. या भागीदारीबद्दल भारती एअरटेलचे कनेक्टेड होम्सचे मुख्य कार्यकारी अधिकारी आणि मार्केटिंग संचालक सिद्धार्थ शर्मा यांनी आपले मत व्यक्त केले. ते म्हणाले, "अत्याधुनिक एआय साधनांच्या माध्यमातून कोट्यावधी भारतीयांना सर्जनशीलता आणि नवकल्पनांसाठी सक्षम करण्याचा आमचा प्रयत्न आहे. स्वतःचा पहिल्यांदाच रिझ्युम बनवणारा विद्यार्थी असो वा आपल्या व्यवसायाचे पोस्टर डिझाइन करणारा छोटा उद्योजक किंवा फॉलोअर्ससाठी व्हिडिओ एडीट करणारा एखादा क्रिएटर, या एअरटेलच्या सर्व ग्राहकांना स्वतःच्या अभिव्यक्तीसाठी आवश्यक साधने पुरवणे हा आमचा उद्देश आहे. अडोबी एक्सप्रेसमुळे आता जागतिक दर्जाची सर्जनशील साधने ही केवळ चैनीची वस्तू म्हणून मर्यादित न राहता प्रत्येक भारतीयासाठी सहज उपलब्ध होणारे वास्तव ठरत आहे." अडोबीचे डिजीटल मीडिया विभागाचे अध्यक्ष डेव्हिड वाधवानी यांनाही या भागीदारीविषयी माहिती दिली. ते म्हणाले, "आम्ही अडोबी एक्सप्रेस या अत्यंत सोप्या आणि अष्टपैलू ॲप्लिकेशनच्या माध्यमातून प्रत्येकाला आपली स्वतंत्र ओळख निर्माण करण्यासाठी सक्षम करण्यास कटिबद्ध आहोत. एअरटेलसोबत भागीदारी करुन आम्ही भारतातील लाखो लोकांना अडोबी एक्सप्रेस प्रीमियमची सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी अत्यंत उत्सुक आहोत. या उपक्रमामुळे भारतातील गतिमान क्रिएटर इकॉनॉमीला (निर्मिती क्षेत्राला) मोठी चालना मिळेल. लोकांना आपले करिअर घडवण्यासाठी, स्वतःचा व्यवसाय वाढवण्यासाठी किंवा आपल्या आवडीच्या गोष्टींना प्रोत्साहन देण्यासाठी उच्च दर्ज्याचे कंटेंट आता सहजरित्या तयार करता येतील."

अडोबी एक्सप्रेस प्रीमियम हे अडोबीची सर्वोत्तम वैशिष्ट्ये थेट सर्वसामान्यांपर्यंत पोहोचवते. या सबस्क्रिप्शनमध्ये हजारो प्रोफेशनल डिझाईन टेम्पलेट्सचा समावेश आहे. हे सर्व टेम्प्लेट्स भारतीय सण-उत्सव, लग्नसभारंभ आणि स्थानिक व्यवसायांचा गरजा लक्षात घेऊन तयार करण्यात आले आहेत. यामध्ये बॅकग्राउंड काढणे, स्वतःच्या कल्पनेनुसार इमेज तयार करणे आणि एका क्लिकवर व्हिडिओ एडिटिंग करणे यांसारखे अत्याधुनिक एआय फीचर्स मिळतात. यामध्ये ३० हजारांहून अधिक प्रोफेशनल फॉन्ट्स, १०० जीबी क्लाउड स्टोरेज, प्रिमियम स्टक इमेजेस आणि ऑटो-कॅप्शन तसेच इन्संट रिझाईज यांसारख्या प्रगत सुविधा उपलब्ध आहेत. तयार केलेल्या कंटेंटवर कोणताही वॉटरमार्क नसेल आणि ग्राहक आपली कामे विविध उपकरणांवरुन सहजपणे सिंक करु शकतील. अडोबी एक्सप्रेस इंग्रजी भाषेसह हिंदी, तामिळ आणि बंगाली या भारतीय भाषांमध्ये उपलब्ध झाले आहे. या सोयीमुळे ग्राहकांना आता त्यांच्या मातृभाषेतही सर्व फिचर्स वापरता येतील. सणासुदीची शुभेच्छापत्रे, लग्नाची निमंत्रणे, स्थानिक दुकानांसाठी जाहिराती, व्हॉट्सअप स्टेटरचे अपडेट्स हे सर्व आता अडोबी एक्सप्रेसच्या मदतीने सामान्य माणसालाही तयार करता येईल.

## जाहीर नोटीस

तमाम लोकांना विशेषतः गाव पारगाव तर्फे आळे, ता. जुन्नर, जि.पुणे येथिल व आसपासचे लोकांना आमचे अशिल यांनी दिलेल्या प्रत्यक्ष माहितीवरून व सांगितलेवरून कळविणेत येते की,

गाव - पारगाव तर्फे आळे, ता. जुन्नर, जि.पुणे येथील गट नं. २१६/३ क्षेत्र ०१ हे. ६४ आर, खराबा ० हे. ०२ आर, आकार २ रू. ५३ पैसे यापैकी क्षेत्र ० हे. ३२.८० आर, खराबा ० हे. ००.४० आर, आकार ० रू. ५१ पैसे, त्यातील समाईक विहीरीतील पाण्याचे हक्कासह, त्यातील झाडझाडोरा, इतर तदंगभुत वस्तुसहीत व जाणेयेणेचे हक्कासह ही मिळकत सचिन शिवाजी औटी यांची मालकीहक्क कब्जेवहीवाटीची आहे. सदर मिळकतीबाबत आमचे अशिलांनी जमिन मालक यांचेसोबत खरेदीचा व्यवहार ठरवला आहे. तसेच सदर व्यवहाराचा करारनामा जमिन मालक यांनी आमचे अशिलांना लिहुन दिलेला आहे. आमचे अशिलांकडुन जमिन मालक यांनी वरील जमिनीचे खरेदी व्यवहारापोटी बयाणा रक्कम स्विकारलेली आहे. आमचे अशिलांना जमिन मालक यांनी वरील जमिन मिळकत ही निर्वेध, निजोखमी, बोजारहीत असलेचा भरवसा व खात्री दिलेली आहे.

गाव - पारगाव तर्फे आळे, ता. जुन्नर, जि. पुणे येथील गट नं. २१६/३ पैकी क्षेत्र ० हे. ३२.८० आर, खराबा ० हे. ००.४० आर, आकार ० रू. ५१ पैसे या मिळकतीबाबत कोणाचाही, कोणत्याही प्रकारचा वारसाहक्क, करारमदार, साठेखत, खरेदीखत, मृत्युपत्र, मुखत्यारपत्र, कूळ, गहाणदान, पोटगी, लिन, लीज, दावा कोर्ट कचेरी, अगर इतर प्रकारे हक्क असल्यास आमचे अशिलांना सदर नोटीस प्रसिध्द झालेपासुन आठ दिवसांचे आत लेखी कागदपत्रानिशी खात्री पटवुन दयावी अन्यथा, सदर मुदतीत कोणाचीही तक्रार आली नाहीतर त्यांनी त्यांचे वरील मिळकतीतील हक्क जाणीवपुर्वक सोडुन दिलेले आहे हे समजणेत येवुन आमचे अशिल खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील याची नोंद घ्यावी.

**आळेफाटा**
**दि. २२/०१/२०२६**

**येणेप्रमाणे नोटीस**
**खरेदी घेणार यांचेकरीता**
**ॲडव्होकेट व नोटरी संजय किसनराव टेंभे**
**आळेफाटा, जुन्नर, पुणे मो. ९८९०१८४२७८**

## जाहीर नोटीस

सर्व लोकांना या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की. खालील परिशिष्टामध्ये वर्णन करण्यात आलेली मिळकत ही सौ. अंजली बाळकृष्ण घंगाळे, मौजे नारायणगाव, ग्रामपंचायत वारूळवाडी येथील शुभलक्ष्मी या इमारती मधील ९३० चौ.फुट आर.सी.सी. किचन हॉल, बेड व शौचालय बाथरूमसह पहिला मजला A विंग फ्लॅट क्र. १०४, वारूळवाडी नारायणगाव, ता. जुन्नर, जि. पुणे. पिन ४१० ५०४ मालकी हक्काची असून त्यांनी सदर मिळकत ही निर्वेध निजोखमी व बोजाविरहित असल्याचा भरवसा आमच्या अशिलांना दिला आहे. तरी सदर मिळकतीबाबत अगर तिचे अन्य कोणत्याही भागावर कोणाचेही कोणत्याही प्रकारचे हक्क अगर हितसंबंध असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिध्दीपासून ०७ दिवसांच्या आत सर्व कागदपत्रानिशी खालील पत्त्यावर आमची खात्री करून द्यावी. अन्यथा सदर मिळकत निर्वेध, निजोखमी व बोजाविरहीत आहे असे समजून व बोलणी पूर्ण करुन आमचे अशील पुढील व्यवहार पूर्ण करतील व तदनंतर कोणाचीही काहीही तक्रार चालणार नाही, याची कृपया नोंद घ्यावी.

परिशिष्ट :- तुकडी पुणे, पोट तुकडी ता. जुन्नर मे. सब रजिस्ट्रार साहेब नारायणगाव यांचे अधिकार कक्षेतील तसेच पुणे जिल्हा परिषदेचे हद्दीतील पंचायत समिती जुन्नर, जिल्हा पुणे

यांच्या हद्दीतील तसेच महसुली गाव ग्रामपंचायत वारूळवाडी येथील ग्रामपंचायत मिळकत क्र. ३६०२/२५ स.नं. ११३/४ यांसी चतुःसीमा पुढीलप्रमाणे- पूर्वेस ७५८/१ड चा उर्वरित, पश्चिमेस प्लॅट नं. A – १०३, दक्षिणेस जिना व उत्तर बाजूस ७५८/१ड चा उर्वरित

येणेप्रमाणे मिळकत व त्यामधील सर्व रस्त्याचे जाण्यायेण्याचे वहिवाटीचे इजमेंटचे हक्कासहीत जाहीर नोटीस असे.

**ठिकाण : नारायणगाव**
**दिनांकः २९/०१/२०२६**

**श्री. राहुल दगडू गरुड, ॲडव्होकेट सुयोग साम्राज्य बिल्डिंग नविन रजिस्टर कचेरीच्या बाजुला, नारायणगाव, ता. जुन्नर, जि. पुणे, पिन कोड- ४१०५०४.**
**मो.नं. ९९७०६४५५५५**

## ई – निविदा सूचना

महावितरण — महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित

कार्यकारी अभियंता, महावितरण, पुणे नगर रोड विभाग, पुणे महावितरणमध्ये नोंदणीकृत नामांकित परवानाधारक विद्युत ठेकेदारांकडून खालील कामांसाठी ई-निविदा मागविण्यात येत आहे:

| निविदा क्रं. | कामाचे वर्णन | ईएमडी (रु.) |
|---|---|---|
| EE/NRD/Infrastructure Development- NSC/T-01 /2025-26 | नवीन जोडणी/भारवाढ (RCI व इतर, कृषी वगळता) देण्यासाठी पायाभूत सुविधा विकासासाठी संस्थांची नोंदणी-नगर रोड विभाग, रस्तापेठ मंडळ. | 25,000 |
| EE/NRD/HT BD MAINT/ T-02/2025-26 | HT ओव्हरहेड लाईन्स व भूमिगत केबल्सच्या बिघाड दुरुस्तीकरिता संस्थांची नोंदणी-नगर रोड विभाग, रस्तापेठ मंडळ | 10,000 |
| EE/NRD/LT BD MAINT/ T-03/2025-26 | LT ओव्हरहेड लाईन्स, ङ्ढ भूमिगत केबल्स व फ्यूज कॉल्सच्या बिघाड दुरुस्तीकरिता संस्थांची नोंदणी-नगर रोड विभाग, रस्तापेठ मंडळ. | 10,000 |
| EE/NRD/DTC BD MAINT/T-04/2025-26 | वितरण ट्रान्सफॉर्मर केंद्रांच्या बिघाड दुरुस्ती करिता संस्थांची नोंदणी-नगर रोड विभाग, रस्तापेठ मंडळ | 10,000 |

वरील ई निविदा महावितरणच्या http://www.mahadiscom.in/eTender/etender या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात येतील .

**महत्त्वाच्या तारखा**

- **निविदा दस्तऐवज उपलब्धः 01.02.2026 ते 15.02.2026**
- **निविदा सादर करण्याची शेवटची तारीखः 15.02.2026, रात्री 24:00 वाजेपर्यंत.**
- **संपर्क माहिती कार्यालयः** कार्यकारी अभियंता, महावितरण, तलेरा पार्क हाऊसिंग सोसायटीजवळ, कल्याणी नगर, पुणे - 411006
- **संपर्क व्यक्ती :** अतिरिक्त कार्यकारी अभियंता, नगर रोड विभाग.
- **मोबाईल क्रमांक : 7875767355**

**कार्यकारी अभियंता (नगर रोड विभाग) पुणे**

**PRO No. PZ/203/2025-26**

## ई – निविदा सूचना

महावितरण — महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित

नोंदणीकृत ई-निविदा एजन्सी/फर्म/कंपनीकडून खालील अटी व शर्तीच्या अधीन राहून, दोन बोली प्रणालीद्वारे, खाली नमूद केलेल्या कामासाठी महावितरणच्या संकेतस्थळावरून डिजिटल स्वाक्षरीसह ऑनलाईन निविदा मागविण्यात येत आहेत.

| क्र. | निविदा क्र. | कामाचे वर्णन |
|---|---|---|
| 1 | EE/PAD/T-08/ 2025-26 | पद्मावती विभाग आर.पी.यू.सी सर्कलमध्ये एचटी ओव्हरहेड लाईन्स आणि भूमिगत केबल्सच्या बिघाड देखभालीसाठी एजन्सींचे इम्पॅनेलमेंट |
| 2 | EE/PAD/T-09/ 2025-26 | पद्मावती विभाग आर.पी.यू.सी सर्कलमध्ये एलटी ओव्हरहेड लाईन्स, एलटी भूमिगत केबल्स आणि फ्यूज कॉलच्या ब्रेकडाउन देखभालीसाठी एजन्सींचे इम्पॅनेलमेंट. |
| 3 | EE/PAD/T-10/ 2025-26 | पद्मावती विभाग आर.पी.यू.सी सर्कलमधील वितरण ट्रान्सफॉर्मर केंद्राच्या बिघाड देखभालीसाठी एजन्सींचे इम्पॅनेलमेंट. |
| 4 | EE/PAD/T-11/ 2025-26 | पद्मावती विभाग आर.पी.यू.सी मंडळात नवीन कनेक्शन सोडण्यासाठी/भार वाढविण्यासाठी (आर.सी.आय आणि कृषी. वगळता इतर) पायाभूत सुविधा विकासासाठी एजन्सींचे इम्पॅनेलमेंट. |

वरील निविदा कागदपत्रे www.mahadiscom.in या आमच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत. अधिक माहितीसाठी महावितरणचे अधिकृत संकेतस्थळ https://etender.mahadiscom.in/eatApp/ ला भेट द्यावी किंवा कार्यकारी अभियंता, पद्मावती विभाग कार्यालयाशी संपर्क साधावा. सदर निविदा स्वीकृती/नकाराचा सर्व अधिकार हा अधोहस्ताक्षरीकडे राखीव राहील.

**कार्यकारी अभियंता,**
**महा वि वि नि कंपनी, पद्मावती विभाग**

**PRO/PZ.NO. 204/2025-26.**

# पिंपरी-चिंचवडचा ‘शिल्पकार’ हरपला; पहाटे ६ चा तो ‘वचक’ आता कायमचा थांबला!

**पिंपरी (दै. संध्या) :**



पिंपरी चिंचवड शहर आणि अजित पवार हे एक समीकरण बनले होते. सन १९९२ पासून अजितदादांनी पिंपरी चिंचवड शहरात लक्ष घालत या शहराच्या विकासात मोलाचे योगदान दिले. शहराच्या भविष्यातील गरजा ओळखून याठिकाणी भौतिक सोयी-सुविधा उभारल्या. त्यांच्या काळात खऱ्या अर्थाने शहराने गगनभरारी घेतली. शहराच्या राजकारणात त्यांचा जसा दबदबा होता, तसाच वचक प्रशासनावर होता.

त्यांच्या जाण्याने खऱ्या अर्थाने पिंपरी चिंचवड शहराच राजकारण आणि समाजकारण अळणी झालय.बारामती ही अजितदादांची जन्मभूमी. मात्र, पिंपरी चिंचवड ही कर्मभूमी असल्याचे सांगत त्यांनी पिंपरी चिंचवडचा झपाट्याने विकास केला. त्यांच्या राजकीय कारकीर्दीची सुरूवात पिंपरी चिंचवड शहरामधून झाली. सन १९९१ साली त्यांनी पहिल्यांदा बारामती लोकसभा मतदारसंघातून लोकसभेची निवडणूक लढवली. त्यावेळी पिंपरी चिंचवड हे बारामती लोकसभेत होत. त्यावेळी त्यांना शहरातून भरभरून मतदान झाल होत.

ज्या शहरासाठी आपण काही केल नाही त्यांनीही इतक भरभरून मतदान केल्यानंतर अजितदादांनी या शहरासाठी काहीतरी करण्याचे ठरवले. पुढे त्यांना खासदारकीचा राजीनामा देऊन राज्यातील राजकारणात सक्रीय करण्यात आलं. त्यानंतर तर त्यांनी शहरात अधिक झपाट्याने कामे हाती घेतली. अजितदादांच्या नेतृत्वात पिंपरी चिंचवड महापालिकेवर सलग १५ वर्ष राष्ट्रवादी काँग्रेसची एकहाती सत्ता होती.

या कालावधीत पिंपरी चिंचवडचा सर्वांगीण विकास करण्यासाठी त्यांनी विशेष प्रयत्न केले. हे शहर एक मिनी भारत असून याठिकाणी सर्व जाती-धर्माचे लोक गुण्यागोविंदाने राहत आहेत. औद्योगिकनगरी असून भविष्यात शहराची लोकसंख्या प्रचंड वाढणार आहे. हे लक्षात घेत भविष्यातील गरजांवर त्यांनी सखोल अभ्यास केला.भविष्यातील दळणवळणाची गरज ओळखून त्यांनी रस्ते सुसज्ज करण्यास प्राधान्य दिले. जुन्या पुणे मुंबई महामार्गाचे रुंदीकरण करत दापोडी ते निगडी ग्रेडसेपरेटरची बांधणी केली.

नाशिक फाट्यावरून नाशिककडे जाताना भोसरीगावात उड्डाणपुलाची निर्मिती केली. हा उड्डाणपूल सुरूवातीला दोन लेनचा करण्याचा निर्णय घेण्यात आला होता. मात्र, भूमिपूजनाच्यावेळी अजितदादांनी काम वाढवून चार पदरी उड्डाणपूल करण्याचे आदेश दिले. अशा पद्धतीने शहरात अनेक ठिकाणी उड्डाणपूल, ग्रेडसेपरेटर, रस्ते बांधत त्यांनी पिंपरी चिंचवड खऱ्या अर्थाने दळणवळणाच्या बाबतीत समृद्ध केले. ही विकासकामे करत असताना कुठेही पर्यावरणाची हानी होणार नाही याची दक्षता घेतली.

लहान मुले ज्येष्ठ नागरिक यांच्यासाठी शहरात उद्यानांची निर्मिती केली. त्यांच्या काळात शहरात तब्बल दोनशेहून अधिक छोटी-मोठी उद्याने तयार झाली. राज्यामध्ये उपमुख्यमंत्री, अर्थमंत्री, पुणे जिल्ह्याचे पालकमंत्री म्हणून कार्यरत असताना त्यांनी पिंपरी चिंचवडला नेहमीच झुकते माफ दिले. त्यामुळे मोठ्या प्रकल्पांसाठी राज्य व केंद्राचा निधी त्यांनी मिळवून दिला.

त्यांच्या मदतीने पिंपरी चिंचवड शहरामध्ये विकासकामांची गंगा आली. मात्र, त्यांच्या अकाली जाण्याने आज खऱ्या अर्थाने पिंपरी चिंचवड शहराच राजकारण आणि समाजकारण बेचव झालं आहे. कामाचा माणूस केल्याने हे शहर पोरकं झाल्याची भावना राजकीय पदाधिकाऱ्यांसह सर्वसामान्य व्यक्त करत आहे.

केंद्रात व राज्यात काँग्रेस व राष्ट्रवादी काँग्रेसची सत्ता असताना त्यांनी केंद्र सरकारचा तब्बल २६०० कोटी रुपयांचा निधी जवाहरलाल राष्ट्रीय नागरी पुनर्निर्माण अभियानाअंतर्गत मिळूवन दिला. त्यामुळे शहरातील विकाससकामांना गती मिळाली. या निधीतून घनकचरा व्यवस्थापन, जलनिस्सारण, पाणी आणि झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्प मार्गी लागले. त्यासोबतच बस सुविधा जलद होण्यासाठी बीआरटी मार्गाची उभारणी केली. मुंबई पुणे महामार्गावर शहराच्या मध्यवर्ती भागात ३३ एकर जागेमध्ये त्यांच्या दूरदृष्टीने मध्यवर्ती व्यापार केंद्र साकारले जात आहे. मोशी येथे दोनशे एकर जागेमध्ये पुणे आंतरराष्ट्रीय प्रदर्शन केंद्राची त्यांनी उभारणी केली. शहरातील महत्वाचे असलेले सायन्स पार्क त्यांच्या कारकीर्दीत उभारण्यात आले. प्रा, रामकृष्ण मोरे नाट्यगृह, आचार्य अत्रे नाट्यगृहाची उभारणी केली.

महापालिकेत त्यांची सत्ता असताना महिलांसाठी त्यांनी विविध योजना आणल्या. त्यामध्ये बिनव्याजी कर्ज योजना, शिवण यंत्र वाटप योजना, संगणक प्रशिक्षण अशा महत्वाच्या योजनांचा समावेश होता. महाविकास आघाडीची सत्ता असताना त्यांनी पिंपरी चिंचवडमध्ये लक्ष घालत महापालिकेच्या १३ मजली इमारतीच्या बांधकामाला सुरूवात केली.

### वक्तशीरपणाने अधिकाऱ्यांची धावाधाव

पिंपरी चिंचवड ही अजितदादांची कर्मभूमी. ते खऱ्या अर्थाने पिंपरी चिंचवडचे शिल्पकार होते, हे त्यांचे राजकीय विरोधक देखील नाकारू शकत नाही. कामांचा दर्जा व गुणवत्ता राखण्यासाठी त्यांचा विशेष आग्रह असायचा. त्यासाठी प्रत्यक्ष काम सुरू असलेल्या ठिकाणी जाऊन ते पाहणी करायचे. अनेक भूमिपूजन, कामाचे उद्‌घाटन करण्यासाठी भल्या पहाटे ते शहरात दाखल होत. सहा वाजताची वेळ ठरली की त्या सहाच्या ठोक्याला दादा कामाच्या ठिकाणी हजर असत. त्यांच्या या वक्तशीरपणाने पालिकेच्या अधिकाऱ्यांची देखील धावाधाव व्हायची.

## थोडक्यात पण महत्वाचे...

### ‘ते’ शब्द ठरले काळजाचा ठोका चुकवणारे!



पिंपरी (दैनिक संध्या) : आता एआय तंत्रज्ञान आले आहे. पूर्वी आम्हाला कुठे लवकर जायचं असलं की हेलिकॉप्टरने जायचो. त्यामध्ये बसून खाली बघितलं की आता खाली पडतोयं की काय अस वाटायचं. मात्र, आता तंत्रज्ञान खूप पुढे गेले आहे. आमचे पायलट लोकेशन टाकतात आणि निवांत गप्पा मारत बसतात...हे शब्द होते विमान अपघातात मृत्यूमुखी पडलेल्या अजित पवार यांचे. पिंपरी चिंचवड महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर पत्रकारांशी अनौपचारिक गप्पा मारत असताना अजित पवार यांनी त्यांच्या विमान प्रवासाबद्दल माहिती सांगितली होती. ज्या टेक्नोलॉजीविषयी आपुलकी होती, ती टेक्नोलॉजी त्यांना वाचवू शकली नाही.पिंपरी चिंचवड महापालिकेची सार्वत्रिक निवडणूक अजितदादा यांनी प्रतिष्ठेची केली होती. त्यासाठी त्यांनी पिंपरी चिंचवड शहरामध्ये पत्रकार परिषद आणि सभांचा धडाका लावला होता. तसेच पत्रकारांसोबत ८ जानेवारीला अनौपचारिक गप्पांचा कार्यक्रम घेतला होता. त्यावेळी त्यांनी नवीन तंत्रज्ञान व त्यांच्या विमान प्रवासाविषयी मनमोकळ्या गप्पा मारल्या होत्या. अजितदादा म्हणाले होते, “दिवसेंदिवस तंत्रज्ञान प्रगती करत आहे. आम्ही पूर्वी सभांना फिरायचो, तेव्हा हेलिकॉप्टरने जायचो. मधुकर पिचड यांच्या सभेला अकोल्याला जायचं असल की हेलिकॉप्टर कुठेतरी जुन्नरला जायचं. मग वरून साहेब बघायचे आणि अंदाजाने सांगायचे की हे अकोले नाही तर जुन्नर आहे. मग पुन्हा अकोलेच्या दिशेने हेलिकॉप्टर अंदाज घेत निघायचे. त्या हेलिकॉप्टरमध्ये फक्त दोघांना बसता यायचे. खाली बघितले की भीती वाटायची आता पडतयं की काय? मात्र, आता तंत्रज्ञान खूप पुढे गेले आहे, आता एआयचा वापर केला जात आहे. विमानांमध्ये आता दोन पायलट असतात. एकदा विमान चालू केल वर गेल की पायलट लोकेशन टाकतात. त्यानंतर ते निवांत गप्पा मारत बसतात.”हीच टेक्नॉलॉजी असलेल्या विमानाने अजितदादा नेहमी प्रवास करत. शेवटी याच टेक्नॉलॉजीने त्यांचा घात केला असल्याचे दुर्देवाने म्हणाव लागेल.

### पंचायत समिती निवडणुकीचे चित्र स्पष्ट

वडगाव मावळ (दैनिक संध्या) : मावळ तालुक्यातील जिल्हा परिषदेच्या पाच जागांसाठी तर पंचायत समितीच्या जागांसाठी उमेदवार रिंगणात असल्याची माहिती निवडणूक निर्णय अधिकारी सुरेंद्र नवले व सहाय्यक अधिकारी विक्रम देशमुख यांनी दिली. दरम्यान, काही ठिकाणी काँग्रेस, राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचे उमेदवार असल्याने संबंधित ठिकाणी तिरंगी तर इतर सर्व ठिकाणी भाजप राष्ट्रवादी अशी सरळ लढत राहणार आहे. जिल्हा परिषदेच्या पाच जागांसाठी उमेदवारांनी अर्ज दाखल केले होते. तर पंचायत समितीच्या जागांसाठी उमेदवारांनी अर्ज दाखल केले होते. दाखल झालेल्या अर्जांच्या छाननी प्रक्रियेत उमेदवारांचे अर्ज अवैध ठरल्याने उर्वरित अर्ज वैध ठरले होते. दरम्यान, आज उमेदवारी अर्ज मागे घेण्याचा अखेरच्या दिवशी जिल्हा परिषदेच्या व पंचायत समितीच्या उमेदवारांनी आपले उमेदवारी अर्ज मागे घेतले. त्यामुळे जिल्हा परिषदेसाठी व पंचायत समितीसाठी उमेदवार प्रत्यक्ष निवडणूक रिंगणात राहिले आहेत. निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज दाखल केलेल्या उमेदवारांपैकी प्रामुख्याने कुसगाव काले जिल्हा परिषद गटातील भाजपचे ज्येष्ठ नेते माजी सभापती ज्ञानेश्वर दळवी, वराळे गणातील राष्ट्रवादीचे संतोष राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचे तालुकाध्यक्ष दत्तात्रय पडवळ तसेच विजय शिंदे, इंदोरी गणातील राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचे पदाधिकारी रमेश व सोमाटणे गणातील भाजपा किसान मोर्चाचे तालुकाध्यक्ष सुभाष या प्रमुख पदाधिकाऱ्यांसह जणांनी आज उमेदवारी अर्ज मागे घेतले.

## प्रशासकीय काळातील खर्चिक कामांचा फटका

**पिंपरी (दै. संध्या) :**

- पिंपरी-चिंचवड महापालिका आर्थिक विवंचनेत
- दायित्व वाढल्याने नवनिर्वाचित नगरसेवकांना विकासकामांसाठी किमान दोन वर्षांची प्रतीक्षा

पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या तब्बल वर्षांच्या कार्यकाळात प्रमाणात मोठी व खर्चिक कामे करण्यात आली आहेत. खर्चिक आणि भांडवली विकासकामांमुळे तब्बल हजार कोटी रुपयांचे दायित्व झाले आहे. परिणामी, नवनिर्वाचित नगरसेवकांना किमान दोन वर्षे प्रभागातील विकासकामांसाठी प्रतीक्षा करावी लागेल, अशी महापालिकेची परिस्थिती आहे. कोरोना महामारी, ओबीसी आरक्षणाचा वाद, न्यायालयातील प्रलंबित प्रकरणांमुळे महापालिकेची निवडणूक वेळेत होऊ शकली नाही. मार्च ला महापालिका बरखास्त झाल्यानंतर मार्चपासून प्रशासक म्हणून कारभार हाती घेतला. या कालावधीत मोठ्या खर्चिक प्रकल्पांना मंजुरी देण्यात आली. सलग चार वर्षे प्रशासकीय राजवटीत असताना मोठ्या प्रकल्पांना सरसकट मंजुरी देण्यात आली आहे.. अनेक कामे अद्याप सुरू असून, त्यासाठी महापालिकेचा मोठा निधी आधीच खर्च झाला आहे. त्यामुळे महापालिकेची आर्थिक स्थिती सध्या मर्यादित आहे. लोकप्रतिनिधींच्या सुरुवातीलाच नवीन कामांना ब्रेक लागण्याची चिन्हे आहेत. प्रशासकीय राजवटीत सुरू असलेल्या प्रकल्पांमुळे नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांना भूमिका लागणार आहे.

## दापोडीतील शेवटच्या सभेत अजितदादांचा कडक इशारा

**पिंपरी (दै. संध्या) :**

- “चुकीचा सल्ला देणाऱ्यांना सरळ करीन”
- पिंपरी-चिंचवडमध्ये प्रचाराच्या अखेरच्या दिवशी पक्षांतर्गत हस्तक्षेपावर थेट भाष्य



आमचे काही जवळचे सहकारी चुकीचा सल्ला देत आहेत. ते त्यांनी ताबडतोब थांबवावे, अन्यथा त्यांना मला थांबवावे लागले. मी पद देऊ शकतो. तसे दिलेले पद काढू शकतो. वेगळे काही सांगत असले तर, फोन टेप करा. मी बघतो. काय भानगड आहे ती. त्याना असे सरळ करतो की, पुढील सात पिढ्या ते तसे फोन करणार नाहीत, असा निर्वाणीचा इशारा उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी पिंपरी-चिंचवड शहरातील दापोडी येथील शेवटच्या सभेत दिला होता.

दापोडी, फुगेवाडी, कासारवाडी प्रभाग क्रमांक 30 च्या राष्ट्रवादी काँग्रेसच्या उमेदवाराच्या प्रचारार्थ प्रचार संपण्याच्या दिवशी 13 जानेवारीला दुपारी साडेतीनला ती सभा झाली. ती शहरातील अजितदादांची शेवटची सभा ठरली. त्या दिवशीची त्यांची ती पिंपळे गुरव, भोसरीनंतरची तिसरी सभा होती.

अजितदादा म्हणाले की, मी राष्ट्रवादी काँग्रेसचा प्रमुख आहे. मी सांगेल, तसेच करा. कोणी चुकीचे काय करत असेल तर, निर्वाणीचा इशारा द्यायचा आहे. माझ्याकडे अनेक जण लायनीत उभे आहेत, संधी द्या म्हणून. वेगळे काही सांगत असेल तर फोन टेप करा. मी बघतो. काय भानगड आहे ते. त्यांना सरळ करतो, असा इशारा त्यांनी पक्षातील सहकाऱ्यांना दिला.

शिवसेना नवीन जिल्हा करून पिंपरी-चिंचवड त्यात महत्त्वाचे ठिकाण करण्यास माझा विरोध नाही. जनतेची मागणी असल्यास लोकप्रतिनिधी त्याला पाठींबा देतात. कुलाबाचे राजगड, उस्मानाबादचे धाराशीव, औरंगाबादचे छत्रपती संभाजीनगर असे नाव बदल झाले आहेत. भावनिक मुद्दा काढून दोन समाजात तेढ निर्माण केला जात आहे. स्वतःच्या चुका झाकण्यासाठी जातीय रंग दिला जात आहे. एकाला आपलेसे करण्याचा प्रयत्न केला जात आहे. भावनिक करून मुलांना रोजगार मिळणार नाही, असे अजित पवार यांनी स्पष्ट केले. मी जातीभेद पाळत नाही. सर्व जाती धर्मांच्या कार्यकर्त्यांना निवडणुकीत संधी दिली आहे, असे त्यांनी सांगितले. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी जगातील सर्वांत उत्कृष्ट असे संविधान व घटना लिहिली. त्यामुळे आपण एकोपाने राहत आहोत. अडानी, अंबानी व बिर्ला यांना एकच मत देता येते. त्यामुळे समाजातील शेवटच्या माणसालाही एक मत देता येते. ही किमया बाबासाहेबांनी केली आहे. पैसा आणि सत्तेचा माज दाखवत तुम्हाला विकत घेण्याचा प्रयत्न केला जाईल. त्यातून एका दिवसाचा प्रश्न सुटेल.

## शब्द अपुरे, डोळे ओले... मावळचा आधारस्तंभ कोसळला! आमदार सुनील शेळके दादांच्या आठवणींनी झाले भावूक

**पिंपरी (दै. संध्या) :**



काही दुःखं अशीही असतात, ज्यांसाठी शब्द अपुरे पडतात. मन सुन्न होतं, डोळे भरून येतात आणि आवाज गहिवरतो. आज मावळसह संपूर्ण महाराष्ट्राची अवस्था अशीच झाली आहे. राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते अजित पवार यांचे जाणे हे केवळ एका नेत्याचं नाही, तर हजारो कार्यकर्त्यांच्या आधारस्तंभाचं हरपणं आहे, अशा भावना सर्वत्र व्यक्त होत आहेत.

महाराष्ट्राच्या राजकीय, सामाजिक आणि विकासाच्या प्रवासात एक युग संपल्याची जाणीव आज प्रत्येकाच्या मनाला चटका लावत आहे. निर्णयक्षमता, कार्यतत्परता आणि सामान्य माणसाशी असलेली आपुलकी यांचा अद्वितीय संगम असलेलं नेतृत्व अचानक हरपल्याची जाणीव संपूर्ण राज्याला स्तब्ध करून टाकणारी आहे. अजित पवार यांचं जाणं अजूनही मनाला स्वीकारता येत नाही, अशा शब्दांत मावळचे आमदार सुनील शेळके यांनी भावना व्यक्त केल्या आहेत.

दादा आता आपल्यात नाहीत, हे शब्द उच्चारायलाही जड वाटतंय. मन मानायला तयार नाही, डोळे उघडे असूनही सगळं एका वाईट स्वप्नासारखं वाटतंय, दादांच्या विमानाबाबतची बातमी कळताच काही क्षणांतच मनात अक्षरशः धस्स झालं, त्या क्षणांचं वर्णन करताना शेळके भावूक झाले. काहीतरी वाईट घडलंय, ही जाणीव पहिल्याच क्षणी झाली होती. पण इतकं मोठं दुःख आपल्या वाट्याला येईल, याची कल्पनाही नव्हती. काही क्षणांत सगळंच संपल्याची बातमी आली आणि सगळंच बदलून गेलं, मावळच्या विकासासाठी अजितदादांनी दिलेलं योगदान शब्दांत मोजता येणार नाही, असेही आमदार शेळके म्हणाले.

गेल्या सहा-सात वर्षांतील सहवासातील प्रत्येक क्षण आज डोळ्यांसमोर उभा राहतो आहे. एकेक प्रसंग आठवतो आणि दादा समोर उभे राहतात. जाहीर सभांमध्ये मला उद्देशून केलेली मिश्किल टिप्पणी आणि कामाबद्दलची पाठीवरची थाप, हे सगळं आज आठवतंय आणि मन अधिकच भरून येतंय, असे सांगताना शेळकेंनी आठवणींचा पूर मोकळा केला.

मावळातील जनतेवर असलेलं दादांचं विशेष प्रेम त्यांनी केवळ शब्दांत नाही तर कृतीतून दाखवून दिलं. कुठल्याही गावात, कुठल्याही कार्यकर्त्याच्या कार्यक्रमात ते मनमोकळेपणाने सहभागी होत असत. दादांकडे गेलं की कधीच परकेपणाची जाणीव झाली नाही. ते नेहमीच आपल्यातले वाटले, अशी भावनाही त्यांनी व्यक्त केली. मावळ तालुका राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष गणेश खांडगे यांनी भावूक शब्दांत आपल्या भावना व्यक्त करताना सांगितले, निःशब्द, मन सुन्न आहे, डोळे भरून आले आहेत. आमचे नेते अजित पवार यांचे जाणे आमच्यासाठी अत्यंत दुःखद आणि वेदनादायक आहे. मावळ तालुक्याच्या सर्वांगीण विकासात त्यांचा सिंहाचा वाटा होता. सामान्य माणसाच्या प्रश्नांसाठी ते नेहमी ठामपणे उभे राहत. त्यांचे नेतृत्व आणि आत्मविश्वास आम्हा कार्यकर्त्यांना दिशा देणारे होते. आज त्यांच्या जाण्याने केवळ एक नेता नाही, तर आमचा आधार हरपला आहे. मनात खोलवर न भरून येणारी पोकळी निर्माण झाली आहे. भावनाही व्यक्त करता येत नसल्याचे खांडगे यांनी सांगितले. ज्येष्ठ नेते आणि माजी मंत्री मदन बाफना यांनीही आपल्या भावनिक प्रतिक्रिया व्यक्त करताना दादांच्या नेतृत्वाचा वेगळाच पैलू उलगडला. दादा म्हणजे महाराष्ट्राच्या राजकारणातलं सळसळतं व्यक्तिमत्त्व होतं. ते असतील तरच खरं राजकारण वाटायचं. प्रतिक्रियांची भीती न बाळगता, जे मनात आहे ते स्पष्ट बोलायचे.

### विकासाचा वारसा कायम जिवंत

आज दादा शरीराने आपल्यात नसले तरी त्यांनी दिलेली दिशा, त्यांनी निर्माण केलेला विकासाचा वारसा आणि त्यांनी घडवलेली माणसं कायम जिवंत राहतील, अशी भावना कार्यकर्त्यांपासून ज्येष्ठ नेत्यांपर्यंत सर्वत्र व्यक्त केली जात आहे. मावळ तालुक कार्यकर्ते, पदाधिकारी आणि सामान्य नागरिकांमध्ये शोककळा पसरली आहे. मन सुन्न आणि डोळे भरले आहेत. प्रत्येकाच्या मनात एकच भावना दाटून आली आहे, असा नेता पुन्हा होणं नाही.

## उद्योगनगरीचा पालक हरपला! पिंपरी-चिंचवडला जागतिक ओळख मिळवून देणाऱ्या महामेरूचा अकाली अंत

**पिंपरी (दै. संध्या) :**



अजितदादा केवळ उपमुख्यमंत्रीच नव्हे तर पुण्याचे पालकमंत्री देखील होते. जिल्ह्याचे पालकमंत्री असलेले दादा पिंपरी-चिंचवडचे पालक असल्यासारखेच होते. गेल्या तीन दशकांमध्ये अजित पवार यांच्या दूरदृष्टी आणि विकासकामांच्या धडाक्याने शहराला जागतिक पातळीवर उद्योगनगरी अशी ओळख मिळवून दिली.आज त्यांच्या मृत्यूने खऱ्या अर्थाने शहराचा पालक हरपल्याची भावना पिंपरी-चिंचवडकर व्यक्त करत आहेत.

उद्योगांचे शहर उद्यानांचे शहर प्रशस्त रस्ते असलेले शहरपायाभूत सुविधांनी सज्ज असलेले शहर शेतीपासून आयटीपर्यंत प्रत्येक उद्योग आणि व्यवसाय जिथे भरभराटीस येत आहे, असे शहर अर्थात पिंपरी-चिंचवड. या शहराला विविध बिरुदे मिळवून देण्यात अजितदादांचा सिंहाचा वाटा होता, असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. शहराची प्रत्येक गरज ओळखून नियोजन करणाऱ्या दादांनी शहराला भरभरुन दिले.

अजित पवारांच्या नेतृत्त्वाखाली या शहराने विकासाची गगनभरारी घेतली आहे. अवघ्या दोन ते तीन दशकांमध्ये पिंपरी-चिंचवडचा अद्भुत विकास पहावयास मिळाला आहे. राष्ट्रवादीचे सर्वेसर्वा शरदचंद्र पवारांनी आरंभ केलेली विकासयात्रा अखेरपर्यंत अजितदादांनीच चालविली. यामुळेच या शहराला पूर्वेचे डेट्रॉइट असेही म्हटले जाते.

अजित पवारांच्या नेतृत्वाखाली पिपरी-चिंचवड हे एक आदर्श शहर म्हणून नावारूपास आले आहे. पादचारी मार्ग, उन्नत मार्ग, फ्लायओव्हरचे समूह, आंतरराष्ट्रीय स्तरावरील प्रदर्शन केंद्र, हिरवीगार झाडे जोपासना, वेगवान औद्योगिक बेल्ट विकसित करणे, स्वच्छतागृह, स्वच्छ पाणी, नियोजित रिंग रोड ह्या सर्व अजित पवारांच्या आणि पर्यायाने राष्ट्रवादी काँग्रेसच्या अनेक उपलब्धींपैकी काही आहेत.

अजित पवारांच्या सक्षम मार्गदर्शनाखाली पिंपरी-चिंचवडच्या विकासाचा वेग वाढला. आज या शहरात दहा हजारांहून अधिक उद्योग आहेत. या उद्योगांना आवश्यक असणाऱ्या सुविधा देण्यात राष्ट्रवादी काँग्रेसचा मोठा वाटा आहे. 2000 च्या दशकाच्या सुरुवातीपासूनच या शहराचा नियोजनबद्ध विकास सुरु झाला. अजित पवार यांनी केलेले नियोजन आणि लावलेल्या शिस्तीमुळे महापालिकेला विविध सुविधा व सेवांसाठी विविध सन्मानाने गौरविण्यात आले आहे.

ज्यात शहर स्वच्छता आणि ई-गव्हर्नन्स निगडीत महत्त्वपूर्ण सन्मानांचा समावेश आहे. पिंपरी-चिंचवड महापालिकेचे सर्वांत मोठे यश म्हणजे ही एक संपूर्ण ई-गव्हर्नन्स परिपूर्ण महापालिका आहे. जेथे सर्व समस्यांचे निवारण एकाच ठिकाणी होते, तेही विशिष्ट कालावधीत. पीसीएमसीचा ई-गव्हर्नन्स प्रकल्प हा राष्ट्रीय मिशन मोड प्रोजेक्ट अंतर्गत जवाहरलाल नेहरू राष्ट्रीय शहरी पुनर्नवीकरण मिशन (जेएनएनयुआरएम) च्या सुधारणा आवश्यकतेनुसार मंजूर करण्यात आला आहे.

आज महापालिकेच्या स्वतःच्या शंभरहून अधिक शाळा आहेत. समाजातील तळा-गाळातील कुटुंबांनादेखील आपल्या मुलांना उच्च शिक्षण देता यावे, यासाठी महापालिकेच्या शाळा आणि तेथील शिक्षण व्यवस्था सातत्याने कार्यरत असते. यामागेदेखील अजित पवार यांची दूरदृष्टी दिसून येते. शहराचा विकास होत असताना देशाच्या काना-कोपर्यातून नागरिक पोट भरण्यासाठी येथे येणार त्यांच्या मुलांना निःशुल्क उच्च गुणवत्तेचे शिक्षण मिळावे यासाठी त्यांनी शहराच्या प्रत्येक भागांत महापालिकेच्या शाळांचे जाळे उभारले.

### वैज्ञानिक दृष्टीकोण

नव्या पिढीने विज्ञानाची कास धरावी, यासाठी अजित पवार पालिकेच्या शाळांमध्ये विविध सुविधा तर दिल्याच परंतु सोबतच पिंपरी-चिंचवड सायन्स पार्क (पीएसएसपी) हे एक अनोखे विज्ञान शिक्षण केंद्र देखील उभारले. नॅशनल कौन्सिल ऑफ सायन्स म्युझियम (एनसीएसएम) आणि पिंपरी चिंचवड महापालिकेच्या संयुक्त विद्यमाने विकसित या सायन्स पार्कची स्थापना केली गेली. या सायन्स पार्कमध्ये दरवर्षी हजारो विद्यार्थी विज्ञान आणि खगोलशास्त्राच्या गूढ संकल्पना आत्मसात करतात.

### पायाभूत सुविधांसाठी स्वतः घातले लक्ष

शहरातील रस्ता आणि वाहतूक व्यवस्थापनामध्ये प्रचंड वेगाने विस्तार दिसून आला आहे, चांगले रस्ते विकासाचा महामार्ग ठरतात, असे सांगणाऱ्या अजितदादांनी पायाभूत सुविधा विकसित करण्यासाठी स्वतः जातीने लक्ष घातले. शहरात आज दिसणारे अनेक उड्डाणपूल, प्रशस्त रस्ते अजित पवारांच्या दूरदृष्टी आणि नियोजनबद्ध विकासाची साक्ष आहेत. आधुनिक पिंपरी-चिंचवड घडवताना शहराच्या मूलभूत समस्यांची यादी दादांनी बनवली. सुलभ दळणवळणाच्या दृष्टिकोनातून सार्वजनिक वाहतूक सेवा सक्षम कशी होईल, याचाही पूरक अभ्यास केला. यात चांगल्या दर्जाचे रस्ते, सार्वजनिक बससेवा वाढवणे, पर्यायी वाहतुकीचे मार्ग उपलब्ध करून देणे आदीचा समावेश आहे. मेट्रोचे काम वेगाने व्हावे, यासाठी देखील जातीने ते लक्ष घालत होते.

## थोडक्यात पण महत्वाचे...



### चाकण बंद ठेवून सर्व पक्षीयांची दादांना श्रद्धांजली

चाकण (दैनिक संध्या) : राज्याचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या निधनाबद्दल तीव्र दुःख व्यक्त करून चाकण करांनी गुरुवारी चाकण शहर बंद ठेवून दादांना भावपूर्ण श्रद्धांजली वाहिली. यावेळी राष्ट्रवादीचे चाकण शहर अध्यक्ष राम गोरे, नगरसेवक साहेबराव कड, आकाश जाधव, विजया तोडकर, विकास धाडगे, अशोकराव जाधव, शेखर पिंगळे, स्वामी कानपिळे, पांडुरंग गोरे, मोबीन काझी, सचिन पानसरे, अनिल देशमुख आदींसह समस्त चाकणकर, सर्वपक्षीय कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.



### उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी घेतले उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे अंतिम दर्शन

बारामती (दैनिक संध्या) : विधान परिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी आज बारामतीतील विद्या प्रतिष्ठान येथे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या पार्थिवावर पुष्पचक्र अर्पण करून अखेरचे दर्शन घेतले. यावेळी त्या अत्यंत भावुक झाल्या असून, त्यांच्या डोळ्यांतून अश्रू अनावर झाले. डॉ. गोऱ्हे यांनी ज्येष्ठ नेते खासदार शरद पवार, खासदार सुनेत्रा पवार आणि खासदार सुप्रिया सुळे यांची भेट घेऊन त्यांचे सांत्वन केले. "वेळेवर येणारे दादा वेळेआधीच गेले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासोबत सरकारमध्ये त्यांचे उत्तम जमले होते. असे अर्ध्यावर डाव सोडून गेल्याने खूप वाईट वाटत आहे," अशी भावना डॉ. गोऱ्हे यांनी व्यक्त केली.




### चाकण भागात डिजिटल युगातही पारंपारिक प्रचाराला पसंती : डॉ. दत्तात्रय खांडेभराड

चाकण (दैनिक संध्या) : सोशल मीडिया आणि डिजिटल युगात पारंपारिक प्रचाराचा बाज आजही कायम असल्याचे चित्र स्पष्ट दिसत आहे. भाषण, लाऊड स्पीकर, पत्रके, ध्वज, गमजा, मफलर, टोपी प्रचारात प्रभावी ठरत आहे. आजच्या डिजिटल युगातही पुणे जिल्हा परिषद व पंचायत समितीसाठी हाय व्होल्टेज प्रचार मोठ्या धुमधडाक्यात सुरू असून, प्रचाराला वेग आला आहे. जिल्हा परिषदेच्या निवडणूकीच्या प्रचाराची मोठी राळ उडाली आहे. या निवडणुकीत सध्या डिजिटल यंत्रणेवर भर असला तरी पारंपारिक आणि जुन्या पद्धतीच्या मंडपाच्या माध्यमातून उमेदवारांनी प्रचारावर भर दिला असल्याचे भाजपाचे जिल्हा उपाध्यक्ष डॉ. दत्तात्रय खांडेभराड यांनी सांगितले. पूर्वी पेंटर कडून भिंती रंगवून, प्रचार, बॅनर तयार केले जात असत. रिक्षा व इतर वाहनांच्या माध्यमातून ध्वनीक्षेपकाद्वारे मतदानाचे आव्हान करावे लागत होते. प्रचार पत्रके वाटावीच लागतात. ध्वज, गमजा, मफलर व टोपी यांची क्रेझ कायम आहे. डिजिटलचे गुणगान कितीही गायले तरी पारंपारिक प्रचाराचा बाज आजही कायम असल्याचे जिल्हा परिषदेच्या निवडणूकीत दिसत असल्याचे डॉ. दत्तात्रय खांडेभराड यांनी सांगितले. सध्याचा काळ हा सोशल मीडियाचा आहे. व्हाट्सअप, फेसबुक, ट्विटर, इंस्टाग्राम आदी माध्यमातून प्रत्येक जण व्यक्त होऊ शकतो. राजकारणातही या माध्यमाचा वापर मोठ्या खुबीने सध्या केला जात आहे.

### अजितदादा पुन्हा होणे नाही - दीपकभाऊ ताटे

चाकण (दैनिक संध्या) : मृत्यू हे जीवनाचं अंतिम आणि अटल सत्य आहे. तो कुणाला कधी, कुठे आणि कसा भेटेल याचा काहीही नेम नाही. त्याचप्रमाणे अजित दादा पवार पुन्हा होणे नाही, अशा शब्दांत भापसे पार्टीचे राष्ट्रीय अध्यक्ष दीपकभाऊ ताटे यांनी अजित पवार यांना भावपूर्ण श्रद्धांजली वाहिली. ताटे यांनी सांगितले की, सकाळी हसत घराबाहेर पडलेली व्यक्ती संध्याकाळी परत येईलच याची खात्री नसते. तरीही आपण हे सत्य विसरून रोजच्या धावपळीत, ताणतणावात आणि अपेक्षांच्या ओझ्याखाली जगत राहतो. उद्याची चिंता, भविष्याची भीती आणि अजून मिळवायचं आहे या विचारात आजचा क्षण निसटून जातो. आजूबाजूला घडणाऱ्या दुःखद घटना आपल्याला क्षणभर थांबवतात. मन सुन्न होतं, डोळे पाणावतात आणि आयुष्य किती नाजूक आहे, याची जाणीव दादांच्या अचानक जाण्याने होते. त्यावेळी लक्षात येतं की पैसा, पद, प्रतिष्ठा, सत्ता या सगळ्या गोष्टी तिथेच थांबतात. माणसासोबत जातं ते फक्त त्याने कमावलेलं प्रेम, केलेली माणुसकी आणि लोकांच्या मनात उरलेली अजित दादांसारखी मनमोकळी आठवण. म्हणूनच नात्यांकडे दुर्लक्ष करू नका. आई वडिलांशी बोला, मित्रांशी मन मोकळं बोला. मनात राग, मत्सर, अहंकार साठवू नका. माफ करणं शिका, कारण वेळ कोणासाठीही थांबत नाही. भौतिक सुख क्षणिक आहेत. सगळी मोहमाया आहे पण समाधान, प्रेम आणि शांतता हीच खरी कमाई आहे. उद्या काय होईल हे माहित नाही. म्हणून आजचा दिवस जगा, मनापासून जगा, प्रामाणिकपणे जगा. अजित दादा पवार यांनी अकाली निरोप घेतला, त्यांच्या आत्म्यास शांती लाभावी.

### ‘दादा’ पर्व संपले...‘दादा’ नावाचं वादळ शांत झालं!

चाकण (दैनिक संध्या) : महाराष्ट्राच्या राजकारणातील एक धगधगतं नेतृत्व आणि जनसामान्यांच्या मनावर अधिराज्य गाजवणारे आमचे ‘दादा’ आज आपल्यात नाहीत, ही वार्ता पचवणं खरोखरच कठीण आहे. कधीकधी नियती इतकी क्रूर असू शकते की, आयुष्यात पहिल्यांदाच एखादी बातमी ‘फेक न्यूज’ ठरावी असं मनापासून वाटू लागतं. अशी प्रतिक्रिया माझी गृहमंत्री दिलीप वळसे पाटील यांनी व्यक्त केली. उपमुख्यमंत्री अजित पवार यांची महाराष्ट्राच्या कल्याणासाठी, विकासासाठी आणि इथल्या मातीतील शेवटच्या माणसाच्या प्रगतीसाठी रात्रंदिवस धावणारी ती पावलं, अशी अचानक थांबतील, असं स्वप्नातही कोणाला वाटलं नव्हतं. काळाने आपल्यावर झडप घातली आणि एका पहाडासारख्या व्यक्तिमत्वाचा अंत झाला, ज्याने राज्याच्या सामाजिक आणि राजकीय परिघात एक कधीही न भरून निघणारी पोकळी निर्माण केली आहे.

# जेजुरीत राज्य घडशी समाज कला महोत्सव संपन्न

## “भारतीय संगीत हृदयाशी संवाद करते, सनईचे सूर मांगल्य निर्माण करतात” – प्रा डॉ. नारायण टाक

**जेजुरी (दै. संध्या)**

भारतीय संगीताची परंपरा ही केवळ श्रवणानुभव न राहता थेट माणसाच्या हृदयाशी संवाद साधणारी आहे. सनईचे सूर मांगल्य, शुभत्व आणि सकारात्मक ऊर्जेचे प्रतीक आहेत,सनई व चौघाडा वाजवण्याची परंपरा घडशी समाजाने पिढ्यान्‌पिढ्या जपली असून शेकडो वर्षांपासून ही कला त्यांनी जतन केली आहे. देशात पाश्चात्त्य संगीताचे प्रभाव वाढत असताना देखील घडशी समाजाने भारताच्या प्राचीन संगीत संस्कृतीचे जतन करून ती पुढील पिढ्यांपर्यंत पोहोचवली आहे.असे विचार लेखक,व माजी प्राचार्य डॉ नारायण टाक यांनी व्यक्त केले.

महाराष्ट्र राज्यअखिल घडशी समाजाच्या वतीने तीर्थक्षेत्र जेजुरी नगरीत संगीतकार कै विश्वनाथ मोरे यांच्या स्मृतीपित्यर्थ युवाकला महोत्सव व कलेच्या क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या समाज बांधवांना पुरस्कार प्रदान कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.या कार्यक्रम प्रसंगी डॉ नारायण टाक बोलत होते.

या युवा कला महोत्सवाचे उदघाटन जेजुरी नगरपरिषदेचे नगराध्यक्ष जयदीप बारभाई उपाध्यक्ष गणेश निकुडे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी जेजुरी देवसंस्थान चे प्रमुख विश्वस्त मंगेश घोणे, माजी विश्वस्त डॉ प्रसाद खंडागळे महाराष्ट्र राज्य घडशी समाज संघाचे अध्यक्ष



अनिल पवार उपस्थित होते .

मंदिर संस्कृतीचे उपासक म्हणून कला संस्कृती आणि धार्मिक मांगल्याचे सनई वादक म्हणून घडशी समाज ओळखला जातो.तीर्थक्षेत्र जेजुरी नगरीत कुलदैवत खंडोबा देवाची सेवा करणारा हा समाज माझ्या हृदयात आहे भाव उद्गार नगराध्यक्ष जयदीप बारभाई यांनी आपल्या भाषणातून व्यक्त केले.

समाजाने आयोजित केलेल्या समाज युवा कला महोत्सवात मुंबई, सातारा, सांगली, कोल्हापूर सह राज्यातील विविध जिल्ह्यातून कलाकारांनी हजेरी लावली. चौघडा या लोकपारंपरिक वाद्यांवर आणि सेक्सोफोन या वेस्टर्न वाद्यवर वंदना साळुंखे या महिला कलाकारने आपली कला सादर करीत रसिकांना मंत्रमुग्ध केले.

या वेळीं माजी विश्वस्त संदीप जगताप, नगरसेवक, अस्लम पानसरे, रोहित खोमणे, शिवाजी जगताप, प्रशांत लाखे, दादा उबाळे, सुनील असवलिकर सचिन खोमणे, माऊली खोमणे आदी उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक घनश्याम मोरे, तर निवेदन नगरसेवक समीर मोरे यांनी केले.

# ...ही दादांची सभा नव्हे दोस्ता, अखेरच्या निरोपाची वेळ आहे!

## विविध रंगछटा व हास्यमुद्रेतील दादांचे १२ फ्लेक्स पाहून कार्यकर्ते गहिवरले

**बारामती (दै. संध्या)**

उपमुख्यमंत्री अजित पवार यांची सभा म्हटली की जोरदार तयारी, नीटनेटकेपणा आणि सभेच्या ठिकाणचे दादांचे फोटो, मोठमोठे कटआउट लक्ष वेधून घेतल्याशिवाय राहत नव्हते. गुरुवारी बारामती येथील विद्या प्रतिष्ठानच्या मैदानावर ही हास्यमुद्रेतील दादांचे भले मोठे फोटो ही सगळ्यांचे लक्ष वेधून घेत होते, मात्र दादांच्या फोटोंनी गजबजलेले हे ठिकाण सभेचे नव्हे दोस्ता, तर दादांना अखेरचा निरोप देण्याचे आहे, हे सत्य सांगणाऱ्या मित्राकडे पाहताना कार्यकर्ते काही क्षण गहिवरल्याचे चित्र मैदानात दिसत होते.

लोकसभा, विधानसभा, निवडणुकांपाठोपाठ महापालिका निवडणुकीच्या वेळी उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी पुण्यासह महाराष्ट्रभर सभा गाजवल्या. प्रत्येक सभेच्या ठिकाणच्या बैठक व्यवस्थेपासून ते मंडप, ध्वनी व्यवस्थेपर्यंत सर्व काही व्यवस्थित असावे, याबाबत पवार चांगलेच



आग्रही असत. विशेषत: सभेच्या ठिकाणी पवार यांची छायाचित्रे असलेले फ्लेक्स, बॅनर चांगले असतील, याकडे त्यांच्या टीमचे अधिक लक्ष असे. त्यादृष्टीने दादांचे चांगले फोटो, फ्लेक्स, कटआउट निवडण्यात येत असे. त्यामुळे सभेच्या वातावरण निर्मितीमध्ये वेगळीच भर पडत असे.

बुधवारी बारामती येथे पवार यांचे विमान अपघातात निधन झाले. तर दुसऱ्या दिवशी गुरुवारी बारामती येथील विद्या प्रतिष्ठानच्या मैदानावर पवार यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात येणार होते. त्यासाठीचे आवश्यक नियोजन करण्यात आले होते. त्याचवेळी अंत्यसंस्काराच्या ठिकाणी पवार यांचे हास्यमुद्रेतील ७ ते ८ मोठे फोटो मैदानात लावण्यात आले होते. काळा, पिवळा, निळा व गुलाबी रंगातील कोट, गळ्यात पक्षाचे उपरणे व डोक्यावर टोपी, पारंपरिक व रंगीत फेटा बांधलेला, पांढरा शर्ट परिधान केलेला असे विविध रंगछटा असणारे १२ फ्लेक्स लावण्यात आले होते. सर्व फोटोमध्ये पवार यांची हास्यमुद्रा लक्ष वेधून घेणारी होती. दादांचे फ्लेक्स व लाखोंची गर्दी, त्यामुळे दादांची सभा असल्याचा भास निर्माण होत असल्याचे कार्यकर्त्यांमध्ये चर्चा होती. मात्र पुढच्याच क्षणी ही सभा नाही, आपल्या लाडक्या दादांना निरोप देण्याची वेळ आणि ठिकाण असल्याची जाणीव अन्य कार्यकर्त्यांकडून करून दिल्यानंतर संबंधित कार्यकर्त्याच्या डोळ्यांमध्ये आपसूकपणे अश्रु तरळल्याचे चित्र मैदानात ठिकठिकाणी दिसत होते.

# पाणीपुरवठा वाहिनीच्या कामात निकृष्टपणा टाळा : रूपालीताई कांडगे



**चाकण (दै. संध्या)**

जीर्ण झालेल्या पाईप लाईन बदलून त्याच ठिकाणी चाकण नगरपरिषदेच्या माध्यमातून नवीन पाइपलाइन टाकण्याचे काम युद्धपातळीवर सुरू झाले आहे. याठिकाणी होणाऱ्या नवीन पाणीपुरवठा वाहिनीच्या कामाची प्रत्यक्ष पाहणी चाकण नगरपरिषदेच्या नगरसेविका रूपाली कांडगे यांनी केली आहे. चाकण येथील चक्रेश्वर कॉलनी परिसरात पाणीपुरवठा वाहिनीच्या कामास सुरुवात झाली आहे. उन्हाळ्यात येथील नागरिकांना पिण्याचे मुबलक पाणी वेळेत मिळाले पाहिजे. त्यासाठी आगामी काळात लोकोपयोगी उपक्रमांवर भर दिला जाणार आहे. कामे सुरू असताना प्रशासनाकडून नागरिकांचे कोणतेही नुकसान होणार नाही.

चक्रेश्वर कॉलनीचा पाणी प्रश्न कायमस्वरूपी सोडवणे आणि कामाच्या दर्जात पारदर्शकता ठेवणार असल्याचे कांडगे यांनी स्पष्ट केले. चाकण मधील पाणीपुरवठा, सांडपाणी, कचरा, वाहतूक, स्वच्छता, औद्योगिक परिसरात नागरी सुविधा पुरविण्याबरोबरच चाकण नगरपरिषदेचा कारभार नियोजनबद्ध होण्यासाठी प्रयत्न केले जाणार आहेत. दरम्यान, रूपाली कांडगे यांनी नवीन पाणीपुरवठा वाहिनीच्या कामाची पाहणी करून काम निकृष्ट न करता दर्जेदार करण्याच्या सूचना संबंधित ठेकेदाराला दिल्या आहेत.

# बारामती शहर शोकसागरात

**बारामती (दै. संध्या)**

कार्यकर्तृत्वाच्या जोरावर विकासकामांचा दादा माणूस असा ठसा उमटविलेले उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे विमान अपघातात निधन झाल्याचे वृत्त वाऱ्यासारखे पसरल्यानंतर संपूर्ण बारामती शहर नि:शब्द झाले. हजारो कार्यकर्ते, पदाधिकारी, दादाप्रेमींनी शहरातील पुण्यश्लोक आहिल्यादेवी होळकर शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाकडे धाव घेतली. यावेळी बारामतीकरांना अश्रू अनावर झाले. शहरात सन्नाटा पसरला होता. अजित पवार यांचे आज सकाळी विमान अपघातात निधन झाल्याचे वृत्त बारामतीकरांना समजल्यानंतर काही क्षण बारामतीकरांचा यावर विश्वासच बसत नव्हता. अजित पवार यांच्या कारकीर्दीला नियतीची दृष्ट लागली. बारामती पोरकी झाली, अशा शब्दांत बारामतीकरांनी आपल्या शोकाकुल भावना व्यक्त केल्या. अनेकांना आपले लाडके दादा आपल्यात नाहीत या अघटीत वृत्तावर विश्वास ठेवणे अवघड झाले होते. ज्या ठिकाणी विमान अपघात झाला त्या ठिकाणी व शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात लोकांनी धाव घेत या माहितीची खातर जमा करण्याचा प्रयत्न केला. ही बातमी खरी असल्याचे समजल्यानंतर अनेक जण धाय मोकलून रडत होते. आपला नेता असा अचानक आपल्याला सोडून गेल्याचे दुःख कार्यकर्त्यांना पचवता येणे अवघड झाले होते.एकमेकांच्या गळ्यात पडून कार्यकर्ते हमसाहमशी रडत होते. दादा आपल्यात नाहीत ही भावना त्यांना अस्वस्थ करून सोडणारी होती. अडचण आणि संकटाच्या काळात एखाद्या मोठ्या भावासारखा खंबीरपणे पाठीशी उभा राहणारा आपला थोरला भाऊ आपल्यातून निघून गेल्याची जाणीव बारामतीकरांना होत असल्याचे शोकाकूल वातावरण शहरात होते.

# शिरूरचा ‘आधारस्तंभ’ कोसळला!

शिरूर (दै. संध्या) : महाराष्ट्राच्या राजकारणात धडाडीचे आणि विकासाभिमुख नेतृत्व म्हणून ओळखले जाणारे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अपघाती निधनामुळे शिरूर तालुक्यात मोठी राजकीय व सामाजिक पोकळी निर्माण झाली आहे. त्यांच्या जाण्याने राज्यासह शिरूर तालुक्याची कधीही भरून न निघणारी हानी झाली असून, याचा थेट परिणाम भविष्यातील विकासकामांवर होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. अजित पवार यांचे शिरूरशी जिव्हाळ्याचे नाते होते; पाणीप्रश्न, रस्ते, औद्योगिक वसाहती आणि सिंचन प्रकल्पांसाठी त्यांनी नेहमीच निर्णायक भूमिका बजावली होती.शिरूर तालुक्यातील अनेक रखडलेले प्रकल्प अजित पावार यांच्या हस्तक्षेपामुळे मार्गी लागले होते. मंत्रालयातून थेट फोन करून प्रश्न सोडवण्याची त्यांची कार्यशैली सर्वश्रुत होती, म्हणूनच त्यांना तालुक्याचा आधारस्तंभ मानले जाई.

# स्पष्टवक्तेपणा ही अजित दादांची ओळख - डॉ. दत्तात्रय खांडेभराड

**चाकण (दै. संध्या)**

स्पष्टवक्तेपणा ही राज्याचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांची ओळख होती. त्यांच्यातील हा चांगला गुण अनेकांना शंभर टक्के भावणारा होता. दादांनी चुकीच्या माणसांना आणि चुकीच्या कामाला कधीच थारा दिला नाही, असे मत भारतीय जनता पार्टीचे पुणे जिल्हा उपाध्यक्ष व उद्योजक डॉ. दत्तात्रय खांडेभराड यांनी व्यक्त केले.

डॉ. खांडेभराड यांनी सांगितले की," महाराष्ट्रावर आज दुःखाचा डोंगर कोसळला आहे. अत्यंत वेदनादायी, धक्कादायक ही घटना आहे. महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनाचा धक्का संपूर्ण महाराष्ट्रासाठी आणि वैयक्तिक माझ्यासाठी प्रचंड मोठा आहे. एक दिलखुलास मनमिळावू, कर्तुत्ववान, अभ्यासू आणि रोखठोक नेता आपण आज गमावला. दादा



आपल्यात नाहीत. आणि इथून पुढेही ते आपणाला दिसणार नाहीत. ही कल्पना सुद्धा मनाला पटत नाही. पवार कुटुंबावरही काळाने घाला घातलाय. त्यांच्यासाठी हा क्षण अत्यंत दुःखद असून त्यांच्या सांत्वनासाठी कोणतेही शब्द अपुरेच पडणार आहेत. अजितदादा यांनी सहा वेळा उपमुख्यमंत्री पद भूषवले. वित्त, नियोजन, सिंचन, जलसंसाधान, ऊर्जा या खात्यामध्ये दादांनी अत्यंत उल्लेखनीय आणि लोकाभिमुख काम केलं आहे."


कडाचीवाडीच्या उपसरपंच रूपालीताई खांडेभराड यावेळी म्हणाल्या की," अजित दादा यांना कृषी व सहकार क्षेत्राची खडानखडा माहिती होती. आर्थिक घडामोडीचे अचूक भान त्यांना होतं. महाराष्ट्राच्या राजकीय सामाजिक विषयांची त्यांना जाणीव होती. त्यांची मजबूत पकड होती. अर्थमंत्री म्हणून राज्याची आर्थिक घडी दादांनी कधी विस्कटू दिली नाही. विकास कामांना खिळ बसू न देता जाहीर केलेल्या लाडकी बहिणी योजनेला निधी कमी पडू दिला नाही. त्यांचा आदर्श आजच्या युवा पिढीला चालना व प्रेरणा देणारा एक चालता बोलता इतिहास आहे. विकासासाठी झटणारा महत्त्वाचा नेता काळाने आपल्यातून हिरावून नेला याचे दुःख वाटते."

# क्रिएटिव्ह शिक्षणाची नवी क्रांती; ART FX SCHOOL OF ANIMATION चे जंगी उद्घाटन

**पनवेल (दै. संध्या)**

पनवेल शहरातील उद्योजक तथा युवासेना पनवेल विधानसभा अधिकारी श्री. अजय अरुणा अंकुश पाटील यांच्या ART FX SCHOOL OF ANIMATION या नव्या शैक्षणिक उपक्रमाचा भव्य उद्‌घाटन सोहळा शिवसेना उपनेते, राज्य संघटक व माजी आमदार श्री. बाळ माने यांच्या शुभहस्ते मोठ्या उत्साहात पार पडला.

गेल्या १५ वर्षांपासून अजय पाटील यांनी आपल्या अकॅडमीच्या माध्यमातून शेकडो तरुणांना ॲनिमेशन व क्रिएटिव्ह क्षेत्रात करिअरच्या संधी उपलब्ध करून दिल्या आहेत. आता स्वतःच्या स्वतंत्र ब्रँड ART FX SCHOOL OF ANIMATION सुरू करत त्यांनी पनवेल व आसपासच्या परिसरातील



नवतरुणांसाठी दर्जेदार शिक्षणाचा नवा मार्ग खुला केला आहे.

या अकॅडमीमध्ये Degree in Animation, Master in Animation FX Game Design & Development, Master in FX Animation & Game Design, Master in Animation, Master in Visual Film Making, Master in FX & Compositing, Master in Architectural Visualization, तसेच 3D Motion Graphics with the Power of Gen AI असे विविध आधुनिक व उद्योगाभिमुख कोर्सेस विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध करून देण्यात आले आहेत.

उद्‌घाटनप्रसंगी शिवसेना उपनेते श्री. बबनदादा पाटील, शिवसेना सहसंपर्क प्रमुख श्री. अनिल चव्हाण, उपजिल्हाप्रमुख श्री. भरत पाटील, युवासेना जिल्हाप्रमुख श्री. पराग मोहिते, महानगर प्रमुख श्री. अवचित राऊत, तालुका प्रमुख श्री. संदिप तांडेल, तालुका संघटक श्री. रामदास पाटील, विधानसभा चिटणीस श्री. सुशांत सावंत, विधानसभा समन्वयक श्री. अरविंद कडव, तालुका अधिकारी श्री. मनोज कुंभारकर, विभागप्रमुख श्री. धनंजय पाटील, शहर अधिकारी श्री. निखिल भगत, विभागप्रमुख श्री. हनुमंत खंडागळे यांच्यासह अनेक शिवसैनिक उपस्थित होते.

तसेच Ace Production च्या माध्यमातून अभिनेत्री तृप्ती राणे, अभिनेत्री अंकिता भगत, अभिनेता रितेश कांबळे, संगीतकार प्रशांत नाकटी, गायक प्रवीण कोळी, अभिनेता विशाल फाले यांचीही विशेष उपस्थिती लाभली.

हा उद्‌घाटन सोहळा यशस्वी करण्यासाठी जनजागृती सेवा संस्थेच्या सचिव व ART FX School of Animation च्या अकॅडेमिक हेड संचिता भंडारी, 2D ॲनिमेटर सतीश पाटील, ग्राफिक ट्रेनर मिलिंद साळवे, 3D ॲनिमेटर सोहम महाडिक, गेम डिझायनर महेश दीक्षित तसेच जलदीप पाटील, मिताली घोष, मनस्वी देशमुख, सुप्रिया देढिया, दीप्ती पाटील, विधी म्हात्रे, भाग्यश्री कणसे, योगिता झगडे व सर्व विद्यार्थ्यांनी मोलाचे सहकार्य केले.

या कार्यक्रमादरम्यान विद्यार्थ्यांना विविध बक्षिसांचे वाटप करण्यात आले. तसेच दरवर्षीप्रमाणे ‘स्टुडन्ट ऑफ द इयर’ पुरस्कार हरिओम उमासरे यांना प्रदान करण्यात आला. ग्राफिक्स, व्हिडिओ एडिटिंग व ॲनिमेशन क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी केलेल्या जुन्या विद्यार्थ्यांचाही यावेळी सन्मान करण्यात आला.

ART FX SCHOOL OF ANIMATION च्या माध्यमातून पनवेलमध्ये ॲनिमेशन, VFX व डिजिटल क्रिएटिव्ह शिक्षणाला नवी दिशा मिळणार असून, स्थानिक तरुणांना रोजगाराभिमुख व आधुनिक तंत्रज्ञानाधारित शिक्षण मिळण्याची मोठी संधी निर्माण झाली आहे. येत्या काळात ही अकॅडमी राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर दर्जेदार कलाकार घडवेल, असा विश्वास उपस्थित मान्यवरांनी व्यक्त केला.

## थोडक्यात पण महत्वाचे...



### केवल निर्गुणने पटकावले खुल्या गटाचे विजेतेपद

■ विनायक नवयुग मित्र मंडळ आणि हिंद शक्ती सोशल फाउंडेशनच्या वतीने १७ वी एकदिवसीय राज्यस्तरीय जलद बुद्धिबळ स्पर्धा

पुणे (दैनिक संध्या) : विनायक नवयुग मित्र मंडळ आणि हिंद शक्ती सोशल फाउंडेशनच्या वतीने आयोजित श्रेयसी नरहर गोडबोले स्मृती १७व्या एकदिवसीय राज्यस्तरीय जलद बुद्धिबळ स्पर्धेत केवल निर्गुण याने खुल्या गटाचे विजेतेपद पटकावले. महाराष्ट्र बुद्धिबळ संघटना आणि पुणे जिल्हा बुद्धिबळ सर्कलच्या मान्यतेने ही स्पर्धा भांडारकर रोडवरील साने डेअरी चौक येथील मिलेनियम टॉवर्स येथे झाली. खुल्या गटात सात फेऱ्यांअखेर केवल निर्गुण, प्रियांशू पाटील आणि पृथू देशपांडे यांचे समान सहा गुण झाले. मात्र, टायब्रेकमध्ये सरस ठरल्याने केवल अव्वल क्रमांकावर राहिला. प्रियांशू दुसऱ्या, तर पृथू तिसऱ्या क्रमांकावर राहिला. सातव्या आणि अखेरच्या फेरीत पहिल्या पटावर प्रियांशू आणि अविरत यांच्यातील डाव बरोबरीत सुटला, तर पृथू आणि केवल यांनी आपापल्या प्रतिस्पर्ध्यावर विजय मिळवला. स्पर्धेच्या उद्घाटनप्रसंगी पुणे महानगरपालिकेच्या नगरसेविका मंजुश्री खर्डेकर, दत्तप्रबोध गोडबोले, सीमा गोडबोले, सई गोडबोले, विनायक नवयुग मित्र मंडळ ट्रस्टचे कार्याध्यक्ष नगरसेवक सुनील पांडे लोहगावकर, क्रीडा समिती अध्यक्ष समीर हाळंदे, आर्बिटर अथर्व गोडबोले, वरुण जकातदार, योगेश माळी, महेश माळी, ऋषिकेश आर्य उपस्थित होते. सातव्या व अंतिम फेरीचे काही निकाल – खुला गट - प्रियांशू पाटील (६) बरोबरी वि. अविरत चौहान (५.५), पृथू देशपांडे (६) वि. वि. सौरभ म्हामणे (५), केवल निर्गुण (६) वि. वि. राम लथिक (५), मिहीर सरवदे (५.५) बरोबरी वि. अलौकिक सिन्हा (५.५), स्वराज शंकर (५.५) वि. वि. दगडू गायकवाड (४.५), पद्मानंद मेनन (५.५) वि. वि. श्रीराम चक्रदेव (४.५), आर्यन देशपांडे (५) वि. वि. कश्यप अचितंगा (४), ओम लामकाणे (५) वि. वि. चिराग खत्री (४), प्रतिका नंदी (४) पराभूत वि. पुष्कराज बेडेकर (५), ज्योतिम सिंघ (४) पराभूत वि. प्रणव बुरली (५), पृथ्वीराज पाटील (५) वि वि. उदयसिंह तेज (४).




### टाटा प्ले बिंजकडून 'शॉट्स'चे अनावरण; मायक्रो-ड्रामासाठी नवे व्यासपीठ

पुणे (दैनिक संध्या) : मोबाईलवर कंटेंट पाहण्याची सवय वेगाने बदलत असताना, टाटा प्ले बिंजने 'शॉट्स' ही नवी कंटेंट श्रेणी सादर करत आपल्या डिजिटल विश्वाचा विस्तार केला आहे. जगातील पहिला डेस्टिनेशन अॅग्रीगेटिंग मायक्रो-ड्रामा म्हणून ओळख मिळवणारे 'शॉट्स' हे फक्त मोबाईलसाठी डिझाइन केलेले, व्हर्टिकल स्वरूपातील सूक्ष्म नाट्यप्रयोगांचे व्यासपीठ आहे. 'शॉट्स' हे सर्व अॅक्टिव्ह टाटा प्ले बिंज सबस्क्राइबर्ससाठी कोणत्याही अतिरिक्त शुल्काशिवाय उपलब्ध असून, जाहिरातींसह चालणारे (Ad-supported) माध्यम आहे. जीवनातील छोट्या-छोट्या क्षणांसाठी तयार केलेल्या १ ते २ मिनिटांच्या भागांमधून हे व्यासपीठ प्रवास, रांगा किंवा लहान ब्रेक्सदरम्यान मनोरंजनाचा नवा अनुभव देण्याचा प्रयत्न करत आहे. लाँचच्या टप्प्यावर बुलेट आणि स्टेज हे पहिले कंटेंट पार्टनर्स असून, अॅक्शन, ड्रामा आणि थ्रिलर प्रकारांतील १६० हून अधिक मायक्रो-ड्रामा प्रेक्षकांसाठी उपलब्ध असतील. येत्या काही महिन्यांत आणखी भागीदार या उपक्रमात सहभागी होणार असून, एकूण ११० तासांहून अधिक शॉर्ट-फॉरमॅट कंटेंट प्लॅटफॉर्मवर दाखल होणार आहे. पूर्णतः व्हर्टिकल वापरासाठी तयार केलेल्या 'शॉट्स'मध्ये स्क्रॉल-फ्रेंडली इंटरफेस, ऑटो-नेक्स्ट प्लेबॅक आणि स्मार्ट डिस्कव्हरी फीचर्सचा समावेश आहे. टाटा प्ले बिंज अॅपमध्ये समर्पित होम-पेज रील आणि स्वतंत्र 'शॉट्स' विभागाद्वारे हे कंटेंट सहज उपलब्ध करून देण्यात आले आहे. त्यामुळे अॅप बदलण्याची किंवा वेगळे सबस्क्रिप्शन घेण्याची गरज उरत नाही. लाँचवेळी हिंदीसह तमिळ, तेलुगू, बंगाली, मराठी आदी प्रमुख प्रादेशिक भाषांमध्येही मायक्रो-ड्रामा सादर केले जात आहेत. इश्क किल्स, तलाक के लिए कुछ भी करेगा, रेंट ए बॉयफ्रेंड, मैं हूं अपराजिता (हिंदी), वन लास्ट राइड (तेलुगू) तसेच आफत या प्यार, हॉरर हवेली (राजस्थानी) यांसह १२ वी वाला प्यार आणि गौरव की स्वीटी (हरियाणवी) यांसारखी शीर्षके यात समाविष्ट आहेत. या नव्या उपक्रमाविषयी टाटा प्लेच्या मुख्य कमर्शियल आणि कंटेंट ऑफिसर पल्लवी पुरी म्हणाल्या, "व्हर्टिकल आणि शॉर्ट-फॉर्म कथाकथन हे मोबाईलवर कंटेंट पाहण्याचे प्रमुख माध्यम बनत आहे. प्रेक्षकांच्या बदलत्या सवयी लक्षात घेऊन 'शॉट्स' हा एक नैसर्गिक विस्तार आहे.

# 'मूटकोर्ट'मुळे विद्यार्थ्यांमध्ये युक्तिवाद, न्यायालयीन कौशल्य विकसित होतात

## न्यायमूर्ती मिलिंद जाधव यांचे मत; आयएलएस विधी महाविद्यालयात अप्रत्यक्ष करावर तिसऱ्या राष्ट्रीय मूटकोर्ट स्पर्धेची अंतिम फेरी उत्साहात

पुणे (दै. संध्या)




"मूटकोर्ट स्पर्धांमुळे विद्यार्थ्यांच्या युक्तिवाद कौशल्याला, कायदेशीर संशोधनाला आणि न्यायालयीन प्रक्रियेच्या आकलनाला चालना मिळते. त्यातून भविष्यातील निष्णात वकील, करतज्ज्ञ तयार होतात. महाविद्यालयीन स्तरावर अशा स्पर्धा नियमितपणे व्हाव्यात," असे मत मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती मिलिंद जाधव यांनी व्यक्त केले.

इंडियन लॉ सोसायटीच्या (आयएलएस) आणि चेंबर ऑफ टॅक्स कन्सल्टंट्स (सीटीसी) यांच्या संयुक्त विद्यमाने आयएलएस विधी महाविद्यालयामध्ये अप्रत्यक्ष करांवर आयोजित तिसऱ्या राष्ट्रीय मुटकोर्ट स्पर्धेची अंतिम फेरी नुकतीच झाली. अप्रत्यक्ष कर कायद्यावर आधारित ही देशातील एकमेव राष्ट्रीय मूटकोर्ट स्पर्धा म्हणून ओळखली जाते. आयएलएस विधी महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. दीपा पातुरकर आणि प्राध्यापिका डॉ. दिव्या मित्तल, 'सीटीसी'चे माजी अध्यक्ष अॅड. अजय सिंग आणि विद्यार्थी समितीच्या अध्यक्षा सीए नम्रता देढिया आदी उपस्थित होते.

डिसेंबर-जानेवारी महिन्यात झालेल्या प्राथमिक, उपांत्यपूर्व व उपांत्य फेऱ्यांनंतर दोन संघ अंतिम फेरीत दाखल झाले होते. या दोन्ही संघानी न्यायमूर्ती मिलिंद जाधव आणि निवृत्त न्यायमूर्ती श्रीकांत कुलकर्णी यांच्या न्यायपीठासमोर आपली बाजू प्रभावीपणे मांडली. पूर्व-जीएसटी उत्पादन शुल्क आदेशांची अंमलबजावणी, कर वर्गीकरण व अधिकार क्षेत्राशी संबंधित गुंतागुंतीच्या कायदेशीर मुद्द्यांचा या युक्तिवादात समावेश होता. या स्पर्धेत रायपूरच्या हिदायतुल्ला नॅशनल लॉ युनिव्हर्सिटीतील (एचएनएलयू) माही अग्रवाल, अनन्या मिश्रा आणि अंबाती नुपूरराव यांच्या संघाने प्रथम क्रमांक पटकावत १५ हजार रुपयांचे पारितोषिक मिळवले, तर भोपाळच्या नॅशनल लॉ इन्स्टिट्यूट युनिव्हर्सिटीच्या (एनएलआययू) साहिल यादव, हिया सक्सेना आणि प्रियम सोनी यांच्या संघाने द्वितीय क्रमांक मिळवत १० हजार रुपयांचे पारितोषिक जिंकले. पाच हजार रुपयांचा सर्वोत्तम मेमोरियल पुरस्कार पुण्यातील सिंबायोसिस विधी महाविद्यालय (मन्नत कौर सोधी, शश्वत शिवम आणि स्नेहा गुप्ता) संघाला मिळाला. सर्वोत्तम वक्ता पुरस्कार तामिळनाडूच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर विधी विद्यापीठातील हरिरूपन माथनला, तर गुजरातच्या नॅशनल लॉ युनिव्हर्सिटीच्या सिमर घुमनला मिळाला.

या स्पर्धेत अहमदाबाद, भुवनेश्वर, भोपाळ, बंगळुरू, चेन्नई, गांधीनगर, गोवा, हैदराबाद, पुणे, रायपूर, छत्रपती संभाजीनगर, तिरुचिरापल्ली आणि त्रिपुरा येथील नामांकित विधी महाविद्यालयांतील १६ संघांनी सहभाग घेतला होता. प्राथमिक व उपांत्य फेऱ्यांचे परीक्षण सीए नरेश शेट्टी, सीए राजीव लुथिया, अॅड. अनिल बलानी आणि अॅड. के. एस. नवीनकुमार यांनी केले. स्पर्धेचे संयोजन सीए नम्रता देढिया, सीए चार्मी शाह व सीए मानसी नगडा, प्रा. डॉ. दिव्या मित्तल आणि प्रा. भूमिका राठोड यांनी केले.

## योगेश त्रिपाठी यांनी जीवनातील अनपेक्षित वळणाबाबत सांगितले

### ज्यामुळे अभिनय क्षेत्रात त्यांचा प्रवास सुरू झाला

मुंबई (दै. संध्या)



एण्ड टीव्हीवरील मालिका हप्पू की उलटन पलटनमधील योगेश त्रिपाठी ऊर्फ दरोगा हप्पू सिंग आज त्यांची अद्वितीय विनोदीशैली आणि लक्षवेधक अभिनयासाठी ओळखले जातात. पण त्यांचा हा अभिनय प्रवास असामान्य व धाडसी निर्णयासह सुरू झाला होता. शिक्षणामध्ये रूजलेल्या कुटुंबामधील असल्यामुळे त्यांनी सुनिश्चित व कौटुंबिक सदस्यांप्रमाणे आपले करिअर घडवावे अशी सर्वांची अपेक्षा होती. पण, अभिनय क्षेत्रात करिअर घडवण्याच्या प्रबळ महत्त्वाकांक्षेमधून प्रेरित होत योगेश यांनी धाडसी पाऊल उचलले, ज्यामुळे त्यांच्या जीवनाला मोठी कलाटणी मिळाली. या प्रवासाबाबत सांगताना योगेश त्रिपाठी म्हणाले, मी अशा कुटुंबामधून आलो आहे, जेथे शिक्षणाला अधिक महत्त्व देण्यात येत होते. कुटुंबातील सर्वांची मी सुरक्षित व कौटुंबिक सदस्यांप्रमाणे करिअर घडवावे अशी इच्छा होती. मी माझ्या वडिलांना रेल्वेची परीक्षा द्यायलाजात असल्याचे खोटे सांगितले, कारण अभिनय क्षेत्रात करिअर घडवायचे आहे हे सांगण्याचे धाडस माझ्यामध्ये नव्हते. मला माहित होते की खोटे बोलल्यामुळे त्यांचे मन दुखावेल आणि त्यांची चिंता वाढेल. मुंबईमध्ये आल्यानंतर जीवन खूप आव्हानात्मक ठरले. मी काही लहानसहाननोकऱ्या केल्या, पैशांची अडचण जाणवली आणि माझ्या स्वतःच्या निर्णयाबाबत अनेक वेळा शंका व्यक्त केली. पण कुठेतरी मनाला वाटत होते की, माझे स्वप्न पूर्ण होईल. बालपणी मी स्वप्नामध्ये धावणाऱ्या ट्रेन्स, विशेषतः मुंबईकडे जाणाऱ्या ट्रेन्स पाहायचो आणि मला ते खूप आवडायचे. मुंबई कधीच न थांबणारी स्वप्ननगरी वाटली, जेथे अनेक संधी मिळतील. मी ट्रेनला स्पर्श करायचो आणि इच्छा बोलायचो की कधीतरी मी ट्रेनमध्ये बसून तेथे जाईन.

## लहान मुलांसाठी दैनंदिन प्रवास अधिक सुरक्षित बनवणे

मुंबई (दै. संध्या)




ही फीचर्स लक्ष वेधणारी नाहीत, तर शांतपणे काम करणारी आहेत आणि चालक आणि मागे बसलेल्या प्रवाशासाठी प्रवास अधिक सुरक्षित करणारी आहेत.आणि असेच असले पाहिजे. सुरक्षेचा विचार दुय्यम असता कामा नये. सुरक्षा ही दुचाकी वापराच्या संपूर्ण अनुभवाचा - वाहन असो किंवा डोक्यावर घातलेले हेल्मेट असो- अभिन्न भाग असला पाहिजे.

भारतात, अनेक कुटुंबे दैनंदिन प्रवास करण्याची प्राथमिक पद्धत म्हणून दुचाकींवर विसंबून असतात. सकाळी शाळेत जाण्याच्या घाईपासून ते संध्याकाळी वाणसामान आणण्यापर्यंत कुटुंबांसाठी स्कूटर आणि बाईक्स हा सर्वात व्यावहारिक पर्याय असतो. भारतीय रस्त्यांवर अंदाजे 260 मिलियन दुचाकी फिरत असतात (डेटा फॉर इंडिया अनुसार). दुचाकी जवळपास जाण्यासाठी सर्वात सामान्य आणि सोयीस्कर साधन आहेत. दुचाकींचा वापर इतका व्यापक प्रमाणात होत असल्यामुळे वाहन चालक आणि त्याच्या मागच्या सीटवर बसणारी व्यक्ती यांच्या सुरक्षिततेची खातरजमा करणे महत्त्वाचे ठरते. गेल्या काही वर्षांपासून मार्ग सुरक्षेविषयीची जागरूकता वाढली आहे, खास करून हेल्मेटच्या बाबतीत. प्रत्येक वेळी वाहन चालवताना आधी हेल्मेट घालून बसण्याचे महत्त्व आता प्रौढांनी ओळखले आहे. परंतु, अजूनही असा एक समूह आहे, जो दुर्लक्षित आहे. मागे बसून प्रवास करणारी लहान मुले.यामागचे कारण जागरुकतेचा अभाव असल्यापासून ते लहान मुलांना व्यवस्थितबसतील अशी हेल्मेट न मिळणे हे देखील असू शकते. पण याचे परिणाम मात्र गंभीर होतात. रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्रालयाच्या (MorTH) वार्षिक अहवाल 2023 अनुसार, मार्ग अकस्मातात मृत्युमुखी पडलेल्या दुचाकी चालक आणि मागे बसणाऱ्या प्रवाशांपैकी 54,000 पेक्षा जास्त असे प्रवासी होते, ज्यांनी हेल्मेट घातलेले नव्हते.ही संख्यादेशातील मार्ग अकस्मातात मृत्युमुखी पडणाऱ्या एकूण लोकांपैकी 31% पेक्षा जास्त आहे.विशेषतः लहान मुले त्यांची शारीरिक वाढ, लहान चण आणि धोक्याच्या काळात प्रतिक्रिया देण्याच्या मर्यादित क्षमतेमुळे अधिक नाजुक असतात.

सिटीझन कन्झ्युमर अँड सिविक अॅक्शन ग्रुप (CAG) यांनी केलेल्या 2024 च्या सर्वेक्षणात देखील लहान मुलांमध्ये हेल्मेट घालण्याचे प्रमाण चिंताजनकरित्या कमी आहे. आणि तरीही, जागतिक आरोग्य संघटनेनुसार,योग्य हेल्मेट घातल्यामुळे मृत्यूचा धोका सहा पटींनी कमी होऊ शकतो, तर मेंदूला इजा होण्याचा धोका 74% टक्क्यांनी कमी होऊ शकतो. ही केवळ आकडेवारी नाही. आपण हे लक्षात ठेवले पाहिजे की, जेव्हा आपण सुरक्षेकडे दुर्लक्ष करतो, तेव्हाकिती मोठा धोका पत्करत असतो. सुदैवाने, दुचाकींवरून प्रवास करणाऱ्या लहान मुलांची सुरक्षा याबाबत अधिक चर्चा होऊन विचार होऊ लागला आहे. लोकांना हे समजू लागले आहे की, सुरक्षेची सवय लहान वयातच लावावी लागते. यातच हे देखील आले की, लहान मुलांच्या बाबतीत हेल्मेट घालण्याबाबत देखील हायगय करून चालणार नाही. ब्रँड देखील आता विचारपूर्वक कृती करू लागले आहेत. एथरसारख्याएखाद्या कंपनीने खास लहान मुलांसाठी बनवलेली हेल्मेट आणली आहेत, ज्यांना एथर ज्युनियर हेल्मेट म्हणतात. हेहेल्मेट केवळ प्रौढांच्या हेल्मेटची छोटी आवृत्ती नाही.ही हेल्मेट ISI प्रमाणित आहेत आणि आकर्षक डिझाईन व योग्य फिटिंगमुळे ती लहान मुलांना आवडतील आणि मुले दैनंदिन प्रवासात घालण्यास प्रोत्साहित होतील अशी आहेत.

शिवाय, वाहनांच्या रचनेत देखील त्यांचे डिझाईन कसे असावे याबाबत विचार करताना सुरक्षेचा प्रामुख्याने विचार केला जात आहे. दुचाकी उत्पादक आता अकस्मात होण्याआधीच ते रोखण्यास मदत करतील अशी फीचर्स वाहनात दाखल करत आहेत. उदाहरणार्थ, एथर इलेक्ट्रिक स्कूटर्समध्ये अशी टेक्नॉलॉजी आहे की, वाहन खाली पडले की पॉवर आपोआप बंद होते. त्यामुळे अधिक इजा होण्याचे टळते. या गाड्यांमध्ये अशा प्रणाली आहेत ज्या उंच-सखल रस्त्यांवर चाक घसरत असल्याचे ओळखून वाहन स्थिर ठेवण्यास मदत करतात. यामध्ये अशीही काही फीचर्स आहेत, की चालक, गाडी चालवत असताना, आपल्या फोनचा उपयोग न करता आपल्या कुटुंबासोबत लाईव्ह लोकेशन शेअर करू शकतात.

## टाटा डब्ल्यूपीएल २०२६ मध्ये किंगफिशर प्रीमियम पॅकेज्ड ड्रिंकिंग वॉटरने चाहत्यांना दिले अद्भुत आणि प्रभावी अनुभव

पुणे (दै. संध्या)



प्रेक्षकसंख्येच्या बाबतीत जागतिक पातळीवर दुसऱ्या क्रमांकावर असलेल्या टाटा महिला प्रीमियर लीगच्या (डब्ल्यूपीएल) चौथ्या हंगामात किंगफिशर प्रीमियम पॅकेज्ड ड्रिंकिंग वॉटर अधिकृत गुड टाइम्स पार्टनर म्हणून सहभागी झाले. त्यातून चाहत्यांच्या सहभागाची एक नवीन लाट उसळली आहे. डीएनए एंटरटेनमेंट नेटवर्क्स प्रायव्हेट लिमिटेडच्या भागीदारीत किंगफिशर प्रीमियम पॅकेज्ड ड्रिंकिंग वॉटरमुळे स्टेडियमधील प्रेक्षकांसाठी समरस, अतिप्रभावी इंटिग्रेशनच्या संयोगांची मालिका जिवंत झाली आहे. चाहत्यांच्या उच्च-ऊर्जेचा सहभाग, संगीत आणि प्रसारणाचे नाविन्यपूर्ण उपक्रम यांच्या मिलाफाद्वारे सामन्याचा अनुभव अधिक समृद्ध करण्यावर या भागीदारीमध्ये भर देण्यात आला. या हंगामात किंगफिशर प्रीमियम पॅकेज्ड ड्रिंकिंग वॉटरने एक धमाकेदार ब्रँड फिल्मसुद्धा सादर केली आहे. तिच्याद्वारे 'ओ ला ला ला लिओ' या तिच्या सुपरिचित आवाजी (सोनिक) आयडेंटिटीला नवे रूप देण्यात आले आहे. 'छोरी आई. हट ले ब्रो! ऊ ला ला ला , ऊ लिओ' या खेळकर, उत्साही चित्रपटात एकीकडे महिला क्रिकेट केंद्रस्थानी येत असताना महिला क्रिकेटच्या चाहत्यांचा उत्साह, आत्मविश्वास आणि विकसित होत असलेली कथा कैद झाली आहे. सोनिक एक्स्पीरियंसचा पडद्याच्या पलीकडे विस्तार करत, या सदाबहार ट्रॅकमध्ये स्टेडियममधील मनोरंजन सहजपणे गुंफण्यात आले आहे. त्यातून प्रेक्षकांच्या गर्दीमध्ये उत्साह संचारून महत्त्वाच्या सामन्यांच्या मध्यंतरात संवादाचे क्षण निर्माण होतील. या प्रसारण अनुभवाला एक विशिष्ट आयाम जोडत, आयकॉनिक स्पायडी कॅमेराला किंगफिशर बर्ड कॅम असे नाव देण्यात आले. मैदानावरील घडामोडींना नेत्रदीपक हवाई कोनातून टिपण्यासाठी त्याची रचना करण्यात आली आहे. या कॅमेऱ्याद्वारे टिपलेले सर्व फुटेज विहंगावलोकनाच्या रूपात चित्रित करण्यात आले असून, समालोचकांनी एकत्रीकरणाची प्रशंसा केली आणि या अनोख्या दृष्टिकोनातून जिवंत झालेल्या घडामोडींची माहिती दिली. खेळातील अत्यंत परिणामकारक क्षणांशी असलेले आपले नाते आणखी मजबूत करत, किंगफिशर प्रीमियम पॅकेज्ड ड्रिंकिंग वॉटरने मैदानावरील एक विशेष दाद देणेसुद्धा सुरू केली. पॉवर-हिटिंग आणि सामना फिरविणाऱ्या कामगिरीचा गौरव करण्यासाठी स्पर्धेत सर्वाधिक षटकार मारणाऱ्या फलंदाजाला किंगफिशरने केएफ बर्ड असलेले ट्रॉफी देऊन सन्मानित केले. युनायटेड ब्रुअरीज लिमिटेडचे मुख्य मार्केटिंग अधिकारी विक्रम बहल म्हणाले: "चाहते जेव्हा खरोखरच खेळाशी जोडलेले असतात तेव्हा उत्तम क्रीडा क्षण अनुभवता येतात, यावर आमचा विश्वास आहे. स्टेडियमच्या आत आणि पडद्यावर दोन्ही ठिकाणी प्रेक्षकांना खेळाच्या जवळ आणणाऱ्या, तल्लीन करणाऱ्या चाहत्यांच्या अनुभवाची निर्मिती करण्यावर आमचा असलेला भर टाटा महिला प्रीमियर लीगशी आमच्या संबंधातून दिसून येतो."


लाईव्ह मनोरंजन, प्रसारणातील नाविन्यपूर्ण उपक्रम आणि खेळाडूंना दाद या मल्टी-टचपॉइंट इंटिग्रेशनद्वारे, बीसीसीआय आणि डीएनए एंटरटेनमेंट नेटवर्क्स प्रायव्हेट लिमिटेडच्या सौजन्याने, किंगफिशर प्रीमियम पॅकेज्ड ड्रिंकिंग वॉटर ने खेळ, ,सेलिब्रेशन आणि सामायिक अनुभवांशी आपले संबंध अधिक बळकट केले.

# एअरटेलचा जागतिक स्तरावर ऐतिहासिक उपक्रम

नवी दिल्ली (दै. संध्या)

■ एअरटेलकडून ३६ कोटी भारतीय ग्राहकांना अडोबी एक्सप्रेस प्रीमियम मोफत मिळणार !

■ एअरटेलच्या सर्व ग्राहकांसाठी ४ हजार किंमतीचे अडोबीचे ए-आय आधारित सुविधा उपलब्ध होत असल्याने आता डिझाईन्स तयार करणे सहज शक्य होणार




भारताची आघाडीची दूरसंचार सेवा पुरवठादार कंपनी म्हणून प्रसिद्ध असलेल्या भारती एअरटेलने आता आपल्या ग्राहकांसाठी खास सोय उपलब्ध करून दिली आहे. एअरटेलने ३६ कोटी भारतीय ग्राहकांसाठी अडोबी एक्सप्रेस हे अत्याधुनिक एप आता उपलब्ध केले आहे. अडोबी एप्लिकेशन हे वापरण्यासाठी अतिशय सोप्पे आहे. शिवाय या एप्लिकेशनच्या मदतीने डिजीटल कामही जलदरित्या पूर्ण होते. त्यामुळे सोशल मिडीयाशी संबंधित कोणतेही डिजीटल काम करणे आता सहज शक्य होणार आहे.

भारती एअरटेल आणि अडोबी यांच्यात पहिल्यांदाच या विषयासंदर्भातील ऐतिहासिक करार झाला आहे. या भागीदारीतून एअरटेल आपल्या सर्व ग्राहकांना अडोबी एक्सप्रेस प्रीमियमची सुविधा मोफत उपलब्ध होणार आहे. याद्वारे एअरटेलचे ग्राहक सोशल मिडीया पोस्ट, मार्केटिंग संबंधित डिजीटल काम, छोटे व्हिडिओ आणि इतर कोणतेही डिझाइन अत्यंत कमी श्रमात करु शकतील. या एप्लिकेशच्या मदतीने होणारी सर्व कामे उच्च दर्ज्याची असतील. या एप्लिकेशनच्या सबस्क्रिप्शनची मूळ किंमत चार हजार रुपये आहे. मात्र एअरटेलच्या ग्राहकांसाठी प्रीमियम सबस्क्रिप्शन वर्षभरासाठी मोफत असेल. विविध सोयीसुविधांच्या उपलब्धतेमुळे डिझायनिंगचा कोणताही पूर्वानुभव नसलेल्या ग्राहकांनाही आपल्या कल्पकतेच्या बळावर व्यावसायिक दर्ज्याचे कंटेट तयार करता येतील.

अडोबी एक्सप्रेस प्रीमियमचे हे विशेष सबस्क्रिप्शन एअरटेलच्या सर्व ग्राहकांसाठी उपलब्ध असेल. मोबाईल, वाय-फाय आणि डीटीएच सेवा वापरणाऱ्या ग्राहकांना या एप्लिकेशनचा वापर करता येईल. या सुविधेचा लाभ घेण्यासाठी ग्राहकांना फक्त एअरटेल थँक्स एपवर लॉग-इन करुन या सर्व सोयीसुविधांला लाभ घेता येईल. हे सबस्क्रिप्शन सुरु करण्यासाठी कोणत्याही क्रेडिट कार्डची आवश्यकता नाही.

या भागीदारीबद्दल भारती एअरटेलचे कनेक्टेड होम्सचे मुख्य कार्यकारी अधिकारी आणि मार्केटिंग संचालक सिद्धार्थ शर्मा यांनी आपले मत व्यक्त केले. ते म्हणाले, "अत्याधुनिक एआय साधनांच्या माध्यमातून कोट्यावधी भारतीयांना सर्जनशीलता आणि नवकल्पनांसाठी सक्षम करण्याचा आमचा प्रयत्न आहे. स्वतःचा पहिल्यांदाच रिझ्युम बनवणारा विद्यार्थी असो वा आपल्या व्यवसायाचे पोस्टर डिझाइन करणारा छोटा उद्योजक किंवा फॉलोअर्ससाठी व्हिडिओ एडीट करणारा एखादा क्रिएटर, या एअरटेलच्या सर्व ग्राहकांना स्वतःच्या अभिव्यक्तीसाठी आवश्यक साधने पुरवणे हा आमचा उद्देश आहे. अडोबी एक्सप्रेसमुळे आता जागतिक दर्ज्याची सर्जनशील साधने ही केवळ चैनीची वस्तू म्हणून मर्यादित न राहता प्रत्येक भारतीयासाठी सहज उपलब्ध होणारे वास्तव ठरत आहे."

अडोबीचे डिजीटल मीडिया विभागाचे अध्यक्ष डेव्हिड वाधवानी यांनाही या भागीदारीविषयी माहिती दिली. ते म्हणाले, "आम्ही अडोबी एक्सप्रेस या अत्यंत सोप्या आणि अष्टपैलू एप्लिकेशनच्या माध्यमातून प्रत्येकाला आपली स्वतंत्र ओळख निर्माण करण्यासाठी सक्षम करण्यास कटिबद्ध आहोत. एअरटेलसोबत भागीदारी करुन आम्ही भारतातील लाखो लोकांना अडोबी एक्सप्रेस प्रीमियमची सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी अत्यंत उत्सुक आहोत. या उपक्रमामुळे भारतातील गतिमान क्रिएटर इकॉनॉमीला (निर्मिती क्षेत्राला) मोठी चालना मिळेल. लोकांना आपले करिअर घडवण्यासाठी, स्वतःचा व्यवसाय वाढवण्यासाठी किंवा आपल्या आवडीच्या गोष्टींना प्रोत्साहन देण्यासाठी उच्च दर्ज्याचे कंटेंट आता सहजरित्या तयार करता येतील."

**मार्केटर्स :** मार्केटिंग क्षेत्रातील व्यावसायिक आणि जाहिरातदारांसाठी हे साधन अत्यंत उपयुक्त ठरेल. मार्केटर्स आणि जाहिरात क्षेत्रातील व्यावसायिकांना अडोबी एक्सप्रेसच्या मदतीने आपल्या मूळ ब्रँण्डच्या ओळखीशी सुसंगत आणि आकर्षक दृश्य सामग्री आणि प्रभावी मोहिमा आता सहज आखता येतील. या जाहिराती, मोहिमांमध्ये भारतीय संस्कृती, परंपरा आणि स्थानिक वातावरणाचे सुयोग्य प्रतिबिंब दिसेल. यामुळे नेहमीच्या साच्यातील तसेच सामान्य वाटणाऱ्या डिझाईन्स यापलीकडे जाऊन ग्राहकांना आकर्षित करणारे आणि स्वतःचे वेगळेपण सिद्ध करणारे दर्जेदार व्यावसायिक साहित्य तयार करणे आता सोप्पे होईल. ग्राहकांना मिळणारा लाभ हा सध्याच्या सबस्क्रिप्शनच्या आधारे केवळ एका वर्षाकरिता असेल. नियम व अटी लागू.

**लहान व्यावसायिक आणि उद्योजक :** आपला स्वतःचा व्यवसाय किंवा प्रोफेशनल ब्रँण्ड प्रस्थापित करु इच्छिणाऱ्या लघुउद्योजकांना आता सोशल मिडीयावर जाहिराती तयार करणे आता सहज शक्य आहे. यासह मार्केटिंग पोस्टर्स, क्यूआर कोड आणि लोगो यांसारख्या गोष्टीही काही मिनिटांत तयार करता येतील. या सुविधेमुळे वेळेची बचत होईल. डिझाईनिंगचा खर्च कमी होईल.

## थोडक्यात पण महत्वाचे...



### खेड तालुका पत्रकार संघाच्यावतीने अजित दादा यांना श्रध्दांजली अर्पण

राजगुरुनगर (दैनिक संध्या) : महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री व पुणे जिल्ह्याचे पालकमंत्री अजितदादा पवार यांना खेड तालुका पत्रकार संघाच्या वतीने श्रद्धांजली वाहण्यात आली. बुधवार दिनांक २८ रोजी उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या दुखद, अपघाती निधनाने संपूर्ण महाराष्ट्र राज्य हळहळला.अजित दादा पवार यांच्या आकस्मिक व दुर्दैवी निधनाची बातमी अत्यंत वेदनादायी व धक्कादायक आहे. जनतेच्या सेवेसाठी अविरत कार्य करणारा एक कर्तव्यदक्ष, परखड आणि प्रभावी नेता आज आपल्यातून निघून गेला, ही संपूर्ण महाराष्ट्रासह विशेषता पुणे जिल्ह्यासाठी मोठी हानी आहे. या दुखद प्रसंगी खेड तालुका पत्रकार संघाच्या वतीने खेड पंचायत समिती येथील पत्रकार संघाच्या कार्यालयात शोक संवेदना व्यक्त करून लोकनेते अजितदादा यांना श्रंदाजली वाहण्यात आली.यावेळी पत्रकार संघाचे अध्यक्ष ॲड.निलेश आंधळे,सुनील थिगळे,राजेंद्र लोथे,रामचंद्र सोनवणे,महेंद्र शिंदे, नाजीम इनामदार,प्रभाकर जाधव,किरण खुडे,बाळासाहेब सांडभोर,अशोक कोरडे, उपस्थित होते.यावेळी अध्यक्ष ॲड.निलेश आंधळे,प्रभाकर जाधव,सुनील थिगळे,रामचंद्र सोनवणे,यांनी उपमुख्यमंत्री ,लोकनेते अजितदादा यांच्या आकस्मिक दुखद अपघाती निधन प्रति शोकसंवेदना व्यक्त केले.

### जिल्हा रुग्णालयात तिरळेपणावर मोफत शस्त्रक्रिया शिबिराचे आयोजन

पिंपरी (दैनिक संध्या) : तिरळेपणावर उपचारासाठी खासगी रुग्णालयात लाखोंचा खर्च येत असताना, सर्वसामान्य रुग्णांना मोठा अर्थिक दिलासा देणारे तिरळेपणावरील २९७ वे मोफत शस्त्रक्रिया शिबिर औंध जिल्हा रुग्णालयात आयोजित करण्यात आले आहे. जिल्हा रुग्णालयातील जिल्हा अंधत्व नियंत्रण सोसायटी, पुणे नेत्रसेवा प्रतिष्ठान, रोटरी क्लब ऑफ पुणे आणि समता फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने शिबिर आयोजित केले आहे. डॉ. जिल्हा शल्यचिकित्सक डॉ.नागनाथ यमपल्ले यांच्या मार्गदर्शनाखाली होत असून शिबिराअंतर्गत शुक्रवारी (दि. ३०) सकाळी ९ वाजता तसेच शनिवारी (दि. ३१) सकाळी १० वाजता तपासणी होणार आहे. पात्र रुग्णांवर रविवारी (दि. १ फेब्रुवारी) सकाळी १० वाजता मोफत शस्त्रक्रिया करण्यात येणार आहे. तिरळेपणावर वेळीच शस्त्रक्रिया केल्यास दृष्टीदोष, व्यंग आणि मानसिक न्यूनगंड सहज दूर करता येतो. विशेषतः लहान मुलांमध्ये लवकर उपचार केल्यास भविष्यातील गंभीर गुंतागुंत टाळता येते. शिबिरांद्वारे शेकडो रुग्णांवर मोफत शस्त्रक्रिया यशस्वीपणे करण्यात आल्या आहेत, औंध जिल्हा रुग्णालयाच्या जिल्हा नेत्रचिकित्सक डॉ. अंजली कुलकर्णी यांनी सांगितले.

### 'अजित पवारांच्या रुपाने राज्याचा द्रष्टा नेता काळाच्या पडद्याआड गेला' - विजय गुप्ता

चिंचवड (दैनिक संध्या) : पुणे, पिंपरी-चिंचवड शहराच्या औद्योगिक, नागरी आणि पायाभूत विकासासाठी राज्याचे उपमुख्यमंत्री स्व. अजितदादा पवार यांनी सातत्याने प्रयत्न केले. शहरातील रस्ते, पाणीपुरवठा योजना, वाहतूक सुधारणा, औद्योगिक गुंतवणूक आणि नागरिकांच्या सोयीसुविधांसाठी घेतलेले निर्णय आजही विकासाच्या टप्प्यांवर दिसून येतात. त्यामुळेच शहराच्या प्रगतीमध्ये त्यांचे मोठे योगदान आहे. अजित दादांसारखा विकासपुरुष पुन्हा होणे नाही, असं मतं शिवसेना (उद्धव ठाकरे) पिंपरी विधानसभा शिवसेना समन्वयक विजय गुप्ता यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे व्यक्त केले आहे. प्रसिद्धीपत्रकात गुप्ता यांनी म्हटले की, "राज्याच्या राजकारणात ठसा उमटवणारे आणि विकासाभिमुख नेतृत्व म्हणून ओळख असलेले राज्याचे उपमुख्यमंत्री स्व. अजितदादा पवार यांच्या निधनाने संपूर्ण महाराष्ट्र शोकसागरात बुडाला आहे. विशेषतः पुणे आणि पिंपरी-चिंचवड शहरातून हळहळ व्यक्त होत असून त्यांच्या कार्याची सर्वत्र आठवण काढली जात आहे. "अजितदादा हे काम करणारे आणि निर्णयक्षम नेते होते. त्यांनी नेहमीच सर्वसामान्यांच्या प्रश्नांना प्राधान्य दिले. पिंपरी-चिंचवड शहराच्या विकासासाठी त्यांनी मोठे योगदान दिले. त्यांचे जाणे ही केवळ राजकीय नव्हे तर राज्याच्या विकासासाठी मोठी हानी आहे." विकासाभिमुख नेतृत्व, प्रशासनावर पकड आणि काम पूर्णत्वास नेण्याची क्षमता यामुळे अजितदादा पवार यांचे नाव महाराष्ट्राच्या राजकीय इतिहासात कायम स्मरणात राहील, अशी भावना व्यक्त करत विजय गुप्ता यांनी अजितदादांच्या कार्याला भावपूर्ण श्रद्धांजली वाहिली.

### 'दगडूशेठ' गणपती ट्रस्टच्या पुढाकाराने महाराष्ट्रातील 1771 दिव्यांगांना कृत्रिम अवयव



पुणे (दैनिक संध्या) : श्रीमंत दगडूशेठ हलवाई सार्वजनिक गणपती ट्रस्ट, सुवर्णयुग तरुण मंडळाच्या पुढाकाराने जय गणेश रुग्णसेवा अभियानांतर्गत महाराष्ट्रातील १७७१ दिव्यांगांना कृत्रिम अवयव देण्यात येत आहेत. थोरले बाजीराव पेशवे रस्त्यावरील ट्रस्टच्या आरोग्य सेवा केंद्र, हिराबाग कोठी येथे हे शिबीर आठवडाभर चालणार आहे. टाटा ऑटोकॉम सिस्टिम्स, पिनॅकल इंडस्ट्रीज आणि श्री भगवान महावीर विकलांग सहाय्यता समिती जयपूर फूट इंदौर यांच्या सहकार्याने हे शिबीर आयोजित करण्यात आले आहे. शिबीराच्या उद्घाटनप्रसंगी टाटा ऑटोकॉम सिस्टिम्स लि. चे व्हाईस चेअरमन डॉ.अरविंद गोयल, सुमती गोयल, पिनॅकल इंडस्ट्रीज लि.चे चेअरमन डॉ.सुधीर मेहता, ट्रस्टचे अध्यक्ष सुनील रासने, कोषाध्यक्ष महेश सूर्यवंशी, सहचिटणीस अमोल केदारी, उत्सव प्रमुख अक्षय गोडसे, सुवर्णयुग तरुण मंडळाचे अध्यक्ष प्रकाश चव्हाण यांसह सुवर्णयुग तरुण मंडळ सर्व पदाधिकारी आणि कार्यकर्ते आदी उपस्थित होते. उपक्रमाचे हे ४ थे वर्ष आहे. डॉ.सुधीर मेहता म्हणाले, आपण एकत्रितपणे जे कार्य करू शकतो, ते एकटे राहून करता येत नाही. त्यामुळे सगळ्या संस्था मिळून एकत्रितपणे रुग्णसेवेचे कार्य करीत आहेत. गरजू रुग्णांपर्यंत पोहोचणे हा आमचा उद्देश आहे. आपल्याला अवयव नाहीत, तर काम बंद ही अनेकांची मानसिकता असते. पण कृत्रिम अवयव लावल्यानंतर आपण काम करायला हवे, असेही त्यांनी सांगितले. पुण्याप्रमाणेच नागपूर, विदर्भ या भागात देखील भविष्यात शिबीर आयोजित केले जाईल. तसेच दिव्यांगांना रोजगार निर्मिती होईल, या दृष्टीने देखील प्रयत्न होतील, असे डॉ. अरविंद गोयल यांनी सांगितले. प्रास्ताविकात महेश सूर्यवंशी म्हणाले, पुण्यासह लातूर, पराभणी, सोलापूर, सांगली, सातारा, कोल्हापूर, अहिल्यानगर, धाराशिव येथून अनेक दिव्यांग शिबीरासाठी आले असून गोवा राज्यातून देखील रुग्ण आले आहेत. आजपर्यंत ट्रस्टच्या पुढाकाराने ७ हजार दिव्यांगांना कृत्रिम अवयव देण्यात आले आहेत. शिबीरामध्ये व्हीलचेअर, कुबड्या, काठ्या, कॅलिपर, जयपूर फूट देण्यात येत आहेत. विशेष म्हणजे पोलिओग्रस्त लहान बालकांसाठी विशेष व्हीलचेअर देखील देण्यात आली आहे.

## दृष्टीबाधितांसाठी देशातील पहिल्या टॅक्टाइल गणित प्रयोगशाळेची

# 'एमआयटी ॲकॅडमी ऑफ इंजिनिअरिंग, आळंदी'तर्फे उभारणी

पुणे (दै. संध्या)



आळंदी येथील एमआयटी अकॅडमी ऑफ इंजिनिअरिंगच्या पुढाकारातून, टेक महिंद्रा फाउंडेशनच्या 'अराईज प्लस' कार्यक्रमांतर्गत सीएसआर सहाय्याने दृष्टीबाधित विद्यार्थ्यांसाठी 'एनएफबीएम जागृती स्कूल फॉर ब्लाइंड गर्ल्स' येथे उभारण्यात आलेल्या देशातील पहिल्या टॅक्टाइल गणित प्रयोगशाळेचे उद्घाटन झाले. दृष्टीबाधित विद्यार्थ्यांना गणितीय संकल्पना अनुभवातून शिकता येणार आहेत.

केंद्रीय प्राप्तिकर विभागाचे प्रधान आयुक्त संग्राम गायकवाड, स्कूल ऑफ ह्युमॅनिटीज अँड इंजिनिअरिंग सायन्सेसच्या प्रमुख डॉ. पूजा वर्मा, प्रकल्प समन्वयक प्रा. हुसैन शेख, 'अराईज प्लस'च्या प्रतिनिधी प्रिया कुलकर्णी, प्राध्यापक डॉ. ज्ञानेश्वर जाधवर, प्रा. बी. आर. पाटील, प्रा. गव्हाणे सर, तसेच जागृती स्कूलच्या मुख्याध्यापिका वानखेडे मॅडम, विद्यार्थी समन्वयक राजवीर पाटील, वैष्णवी बनसोडे, ओमकुमार राजपूत आणि ओम कोलते उपस्थित होते.

संग्राम गायकवाड म्हणाले, "अशा प्रकारचे प्रकल्प विद्यार्थ्यांमध्ये केवळ तांत्रिक कौशल्यच नव्हे, तर संवेदनशीलता आणि सहवेदना विकसित करतात. समाजातील वंचित घटकांसाठी कार्य करणे हेच खरे सामाजिक कार्य असून, राष्ट्रीय सेवा योजनेसारख्या युनिट्सनी अशा उपक्रमांमध्ये अधिक सक्रिय सहभाग घ्यावा. दृष्टीबाधितांच्या विशेष शैक्षणिक गरजा लक्षात घेऊन उभारलेली ही प्रयोगशाळा समावेशक शिक्षणाच्या दिशेने एक महत्त्वपूर्ण टप्पा आहे."

या गणित प्रयोगशाळेतील सर्व स्पर्शाधारित (टॅक्टाइल) गणितीय मॉडेल्स एमआयटी अकॅडमी ऑफ इंजिनिअरिंगच्या विद्यार्थ्यांनी 'वेव्ह्स' उपक्रमाअंतर्गत विकसित केली आहेत. दृश्य घटकांशिवाय स्पर्श, आकार, पोत, प्रमाण व हालचाल यांच्या आधारे गणितीय संकल्पना समजावून सांगणे, हे अत्यंत आव्हानात्मक कार्य विद्यार्थ्यांनी यशस्वीरीत्या पूर्ण केले, हे या प्रकल्पाचे वैशिष्ट्य आहे.

हा उपक्रम तांत्रिक शिक्षण, सामाजिक बांधिलकी आणि समावेशक शिक्षणाचा आदर्श संगम असून, दृष्टीदोषित विद्यार्थ्यांच्या शिक्षणप्रवासात नवे दालन उघडणारा ठरेल, असा विश्वास उपस्थितांनी व्यक्त केला.

## 'ब्रह्मोत्सवात' यंदा शैक्षणिक शिष्यवृत्ती, धान्यतुला आणि पालखी उत्सव

पुणे (दै. संध्या)

धार्मिक, सामाजिक, सांस्कृतिक उपक्रमांनी दरवर्षी साजऱ्या होणाऱ्या श्री महालक्ष्मी मंदिर सारसबाग च्या ब्रह्मोत्सवात यंदा शैक्षणिक शिष्यवृत्ती, धान्यतुला आणि पालखी उत्सव यांसह विविध कार्यक्रम होणार आहेत. श्री बन्सीलाल रामनाथ अग्रवाल धार्मिक व सांस्कृतिक ट्रस्ट, श्री महालक्ष्मी मंदिर सारसबागच्या ४२ व्या वर्धापनदिनानिमित्त ब्रह्मोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. दिनांक ३१ जानेवारी ते २ फेब्रुवारी दरम्यान मंदिरात हा उत्सव होणार असून त्यामध्ये पुण्यातील ३०० हून अधिक गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक शिष्यवृत्ती देण्यात येणार आहे, अशी माहिती ट्रस्टच्या प्रमुख विश्वस्त अमिता राजकुमार अग्रवाल यांनी दिली. राजस्थान डिडवाना येथील अनंत श्री विभुषित जगतगुरु रामानुजाचार्य झालरिया पीठाधीपती पूज्य श्री श्री १००८ स्वामीजी घनश्यामाचार्यजी महाराज यांच्या उपस्थितीत विविध धार्मिक, सामाजिक व सांस्कृतिक कार्यक्रम होणार आहेत. सामाजिक उपक्रमांतर्गत पुण्यातील हुजूरपागा मुलींची शाळा, रेणुका स्वरूप मुलींची शाळा, विद्या विकास विद्यालय प्रशाला, न्यू इंग्लिश स्कूल टिळक रस्ता, मॉडर्न हायस्कूल, अहिल्यादेवी मुलींची शाळा, विमलाबाई गरवारे हायस्कूल या शाळांमधील ३०० हून अधिक गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक शिष्यवृत्ती देण्यात येणार आहे. त्यांचे शैक्षणिक शुल्क ट्रस्टतर्फे भरण्यात येणार असून शनिवार, दि. ३१ जानेवारी रोजी दुपारी ४.३० वाजता मंदिरात हा कार्यक्रम होणार आहे.

## शुभांगी पाटणकर यांचा सहस्रचंद्रदर्शन कार्यक्रम संपन्न

पुणे (दै. संध्या)



ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्त्या व लायन्स सिनिअर सिटीझन क्लबच्या खजिनदार शुभांगी पाटणकर यांचा सहस्रचंद्रदर्शन कार्यक्रम अरण्येश्वर येथिल सुपर्ण सभागृहात मोठ्या उत्साहात संपन्न झाला.सहस्रचंद्रदर्शन समारंभाच्या वेळी होमहवनादी धार्मिक विधी व शुभांगी पाटणकर यांची गुळाच्या ढेपेने तुला करण्यात आली

यावेळी लायन्स क्लब इंटरनॅशनलचे लाईफ मेंबर व माजी प्रांतपाल लायन शरदचंद्र पाटणकर,लायनचे माजी प्रांतपाल नरेंद्र भंडारी,सदानंद शेट्टी ,रमेश शहा, इस्कॉनचे प्रमुख संजय भोसले,प्रसिद्ध गायक किशोरकुमार भक्त मकरंद पाटणकर,उद्योजक नितीन पाटणकर, लायन प्राचार्य श्याम भुर्के. नातेवाईक,समाजसेवक व मित्रपरिवार मोठ्या संख्येने उपस्थित होते. आपले मनोगत व्यक्त करतांना शुभांगी पाटणकर म्हणाल्या "मला समाजसेवेचे बाळकडू शालेय जीवनात मिळाले. लहानपणापासून खेळाची आवड असल्याने चांगले आरोग्य प्राप्त झाले.शिक्षण आणि आरोग्य क्षेत्रात कार्य करत आहे.मुलांच्या चांगल्या प्रगतीसाठी चांगले पालकत्व असणे गरजेचे आहे असा सल्ला त्यांनी सर्व पालकांना दिला.

श्याम भुर्के म्हणाले "शुभांगी पाटणकर यांची सकारात्मक वृत्ती,मोठे मन,बोलका स्वभाव,माणसे जोडून ठेवणे या वैशिष्ट्यामुळे त्यांचा जनसंपर्क मोठा आहे. अयोध्येतील राम मंदिर,जनसेवा फौडेशनचा वृद्धाश्रम, बाबा आमटे याचे आनंदवन,महाराष्ट्र मुख्यमंत्री निधी, इस्कॉन मंदिर अशा विविध १५ संस्थांना त्या दरवर्षी देणग्या देत आहेत."

संजय भोसले यांनी पाटणकर दाम्पत्याच्या सामाजिक कार्याचा उत्साह व कामाची उर्जा याचे कौतुक केले." शरदचंद्र पाटणकर यांनी गणेश वंदना तर मकरंद पाटणकर यांनी गीत सादर केले.

या प्रसंगी शुभांगी पाटणकर यांनी रुकारी यांच्या शिव मंदिर व सानिया पाटणकर यांच्या नवप्रेरणा दिव्यांग कलाकार संगीत संध्या यांना देणग्या दिल्या.

## 'एमआयटी-एडीटी' विद्यापीठाने राखले विजेतेपद

### बी.के. बिर्ला रात्र महाविद्यालय दुसरे, तर एम.ई.एस. गरवारे महाविद्यालय तिसऱ्या क्रमांकावर



पुणे (दै. संध्या)

आठव्या विश्वनाथ स्पोर्ट मीट (व्हीएसएम-२०२६) या वर्षातील सर्वांत मोठ्या राष्ट्रीय आंतरमहाविद्यालयीन/आंतरविद्यापीठीय क्रीडा स्पर्धेत यजमान एमआयटी आर्ट, डिझाईन व टेक्नॉलॉजी विद्यापीठ (एमआयटी-एडीटी), विश्वराजबाग, पुणेच्या खेळाडूंनी जबरदस्त कामगिरी करत तब्बल १० सुवर्ण व २४ रौप्यपदकांसह पदकतालिकेत वर्चस्व राखत स्पर्धेचे विजेतेपद कायम ठेवले.

एमआयटी-एडीटी विद्यापीठानंतर मुंबईतील बी.के. बिर्ला रात्र महाविद्यालयाच्या संघाने एकूण ५ सुवर्ण व ४ रौप्य पदकांसह दुसरा क्रमांक पटकाविला, तर पुण्यातील एम.ई.एस. गरवारे महाविद्यालयाने ५ सुवर्ण व ३ रौप्य पदकांसह तिसरा क्रमांक मिळविला. एमआयटी-एडीटी विद्यापीठाने गतवर्षीही विजेतेपद पटकाविले होते. भारत सरकारच्या फिट इंडिया चळवळीच्या प्रचारासाठी क्रीडा भारती व बँक ऑफ इंडिया यांच्या प्रमुख सहयोगाने ही स्पर्धा यशस्वीरित्या पार पडली.

तब्बल १५ क्रीडा प्रकारांत, १५०हून अधिक शिक्षण संस्थांमधील ६,००० पेक्षा अधिक विद्यार्थ्यांच्या सहभागाने झालेल्या या स्पर्धेचे बक्षीस वितरण पद्मश्री व अर्जुन पुरस्कारप्राप्त तसेच रोईंगमधील आशियाई सुवर्णपदक विजेते कॅप्टन बजरंग लाल ताखर (व्हीएसएम), ऑलिम्पियन व अर्जुन पुरस्कार विजेते जलतरणपटू विरधवल खाडे, तसेच मेजर ध्यानचंद पुरस्कारप्राप्त रोवर स्मिता शिरोळे-यादव, विद्यापीठाचे कार्याध्यक्ष तथा प्र-कुलगुरू प्रा. डॉ. मंगेश कराड, कुलगुरू प्रा. डॉ. राजेश एस., प्र-कुलगुरू डॉ. रामचंद्र पुजेरी, डॉ. मोहित दुबे, कुलसचिव डॉ. महेश चोपडे, विद्यार्थी कल्याण विभागाचे संचालक डॉ. सुराज भोयार, क्रीडा संचालक प्रा. पद्माकर फड आदी मान्यवरांच्या उपस्थितीत पार पडले. यावेळी विद्यार्थ्यांना १० लाख रुपयांपर्यंत रोख पारितोषिके, पदके व करंडक प्रदान करण्यात आले.

बॅडमिंटन पुरुष गटाच्या अंतिम सामन्यात डी.वाय. पाटील आंतरराष्ट्रीय विद्यापीठाने यजमान एमआयटी-एडीटी विद्यापीठाचा ३-२ असा पराभव करून सुवर्णपदक पटकाविले. महिला गटात विश्वकर्मा इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजीने एमआयटी-एडीटी विद्यापीठाचा २-१ अशा फरकाने पराभव करत सुवर्णपदक जिंकले.

बुद्धिबळ पुरुष गटात पार्थ बढेकरच्या कामगिरीच्या जोरावर एमआयटी विश्वशांती विद्यापीठाने यजमान एमआयटी-एडीटी विद्यापीठाचा, तर महिलांतही एमआयटी विश्वशांती विद्यापीठाने यजमान संघाचा पराभव करून सुवर्णपदक पटकाविले.

## उपमुख्यमंत्री अजित पवार यांना भव्य रंगावलीतून अभिवादन

पुणे (दै. संध्या)

महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे विमान अपघातात नुकतेच आकस्मिक निधन झाले. त्यांना बुधवार पेठेतील शतकोत्तर परंपरा लाभलेल्या श्रीमती लक्ष्मीबाई दगडूशेठ हलवाई दत्तमंदिर ट्रस्टतर्फे भव्य रंगावलीतून अभिवादन करण्यात आले आहे. या प्रसंगी ट्रस्टचे अध्यक्ष ॲड. शिवराज कदम जहागिरदार यांसह कार्यकारी विश्वस्त ॲड. रजनी उकरंडे, कोषाध्यक्ष युवराज गाडवे, उत्सव प्रमुख महेंद्र पिसाळ, उप उत्सवप्रमुख अक्षय हलवाई, विश्वस्त ॲड. प्रताप परदेशी, डॉ. पराग काळकर, सुनिल रुकारी, राजेंद्र बलकवडे आणि सेवेकरी व भाविक देखील उपस्थित होते. ट्रस्टचे अध्यक्ष ॲड. शिवराज कदम जहागिरदार म्हणाले, रांगोळी ही जमिनीवर साकारणारी कलाकृती आहे. अजितदादा हे महाराष्ट्राच्या मातीशी नाळ जोडलेले नेते होते. त्यामुळे रांगोळीद्वारे त्यांना आदरांजली अर्पण करण्यात




आली. तसेच अजितदादा पवार यांच्या सोबत असताना अपघातात निधन पावलेल्या मुंबई पीएसओ एचसी विदीप जाधव, पायलट कॅप्टन सुमित कपूर, कॅप्टन संभवी पाठक, फ्लाईट अटेंडंट पिंकी माळी यांना देखील श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. मंदिरासमोर ही रंगावली साकारण्यात आली असून रविवार, दि. १ फेब्रुवारी पर्यंत ठेवण्यात येणार आहे. श्रीरंग कलादर्पण फाऊंडेशनच्या कलाकारांनी ही रंगावली साकारली आहे. तब्बल २० बाय २५ फूट आकारातील ही भव्य रंगावली पाहण्यासाठी आणि अजितदादा पवार यांना अभिवादन करण्यासाठी पुणेकरांनी मोठी गर्दी केली होती.

# जीवनात मानसिक स्वास्थ्य, सकारात्मक दृष्टिकोन जोपासण्यावर भर द्यावा

### बीके मंगल दीदी यांचे प्रतिपादन; 'सूर्यदत्त'मध्ये 'वंदे मातरम'चे १५० वे वर्ष व ७७ वा प्रजासत्ताक दिन उत्साहात

पुणे (दै. संध्या)




'वंदे मातरम्' हे केवळ दोन शब्द नसून, आपल्या राष्ट्रीय अस्मितेचे प्रतीक आहे. या गीताच्या १५० वर्षांच्या गौरवशाली प्रवासाचा वारसा पुढच्या पिढीपर्यंत पोहोचवणे, हे आपले कर्तव्य आहे, असे मत सूर्यदत्त ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूट्सचे संस्थापक अध्यक्ष प्रा. डॉ. संजय बी. चोरडिया यांनी व्यक्त केले. जीवनात मानसिक स्वास्थ्य, आत्मचिंतन आणि सकारात्मक दृष्टीकोन जोपासण्यावर भर द्यायला हवा, असे प्रतिपादन राजयोग आत्मचिंतन गुरु बीके मंगल दीदी यांनी केले. सूर्यदत्त ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूट्समध्ये ७७वा प्रजासत्ताक दिन, तसेच भारतीय स्वातंत्र्यलढ्याचा प्राण असलेल्या 'वंदे मातरम्' गीताचे १५० वे वर्ष अत्यंत आदराने आणि उत्साहात साजरे करण्यात आले.

प्रा. डॉ. संजय बी. चोरडिया यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित कार्यक्रमावेळी सामाजिक कार्यकर्ते कृष्णन सुब्रमणी, बावधन पोलीस स्टेशन पोलीस निरीक्षक भास्कर कदम, राजयोग आत्मचिंतन गुरु बीके मंगल दीदी, 'सूर्यदत्त'च्या उपाध्यक्षा सुषमा चोरडिया, सहयोगी उपाध्यक्षा स्नेहल नवलखा, अधिष्ठाता प्रा. डॉ. प्रतीक्षा वाबळे, मुख्य कार्यपालन अधिकारी अक्षित कुशल यांच्यासह विविध विभागांचे प्रमुख, प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कृष्णन सुब्रमणी यांनी 'शिक्षणासोबतच सजग नागरिकत्व हीच खरी प्रगती असून, प्रत्येकानी आपली जबाबदारी योग्यरीत्या निभवावी, असे सांगितले. बीके मंगल दीदी यांनी मन:शांती आणि बौद्धिक संतुलनानेच माणूस खऱ्या अर्थाने पुढे जातो. त्यामुळे शांत मन आणि स्वच्छ विचार जपण्याचा सल्ला त्यांनी दिला. प्रा. डॉ. संजय बी. चोरडिया यांनी 'वंदे मातरम्'च्या ऐतिहासिक महत्त्वाला विशेष अधोरेखित केले. देशाला स्वातंत्र्यलढ्यात एकत्र गुंफण्याचे काम 'वंदे मातरम्'ने केले. आजच्या पिढीने या गीतातील राष्ट्रभक्तीचा वारसा आत्मसात करायला हवा, असे त्यांनी नमूद केले. देशाची एकता, शांतता आणि सुरक्षा अबाधित ठेवण्यासाठी सर्वांनी कटिबद्ध असावे असे आवाहन भास्कर कदम यांनी केले.

'सूर्यदत्त'च्या बावधन कॅम्पसमध्ये आयोजित सोहळ्यात मान्यवरांच्या हस्ते ध्वजारोहण झाले. राष्ट्रध्वजाला वंदन करून राष्ट्रगीत गायले. तिरंग्याच्या साक्षीने विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर नृत्य, गीते आणि सादरीकरणांनी प्रेक्षकांची मने जिंकली. विद्यार्थ्यांच्या वैविध्यपूर्ण कलाविष्कारांनी चैतन्य भरले. 'वंदे मातरम्'च्या १५० व्या वर्षपूर्तीच्या औचित्याने सादर सांस्कृतिक कार्यक्रमाने उपस्थितांची वाहवा मिळवली. डॉ. सारिका झांबड आणि प्रा. केतकी बापट यांनी संयोजन केले. या सोहळ्याचे नेटके सूत्रसंचालन फार्मसी विभागातील आदित्य कांबळे व समीक्षा चोरडिया आणि विधी विभागातील आख्या उपमन्यू व श्रुती वैद्य यांनी केले.

नृत्य व योगशास्त्र शिक्षिका सोनाली ससार यांनी बसवलेला बहारदार आविष्कार आणि योग शिक्षिका मीनल गावंडे यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांनी सादर केलेली योगासनांची प्रात्यक्षिके, यातून भारतीय संस्कृती आणि राष्ट्रभक्तीचा सुंदर संगम पाहायला मिळाला. विद्यार्थ्यांनी मराठी, हिंदी आणि इंग्रजी अशा तिन्ही भाषांतून केलेली प्रेरणादायी भाषणे आणि 'ऐ वतन' या गीताच्या हृदयस्पर्शी सादरीकरणाने उपस्थितांच्या डोळ्यांच्या कडा पाणावल्या. राष्ट्रप्रेमाचा हा ओसंडून वाहणारा उत्साह आणि विद्यार्थ्यांची ही समर्पित भावना पाहून संपूर्ण वातावरण खऱ्या अर्थाने भारावून गेले होते.